# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०२/ २०१२** **दिनांक १९.०२.२०१२**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ-सकाळी १०.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दिनांक १९.०२.२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५७६६-२०१२, दिनांक १४.०२.,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १९.०२.२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष,
०३. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे,
०५. मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे
०६. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०७. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.डॉ.प्यारेलाल तिवारी

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ना राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्री समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा,मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये व मा.सौ.समित्रा कैलास कोते यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पाअंतर्गत श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारित कथानक (Story Board) लेजर व्हीजन लि.,हाँगकाँग यांचे मार्फत सादरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी आध्यात्मिक व मनोरंजनात्मक उद्यान (बगीचा) उभारण्याचे दृष्टीने मा. व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभांमध्ये वेळोवेळी चर्चा झालेली असून, त्यास अनुसरुन निर्णय घेण्यात आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, मौजे निमगांव को-हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या २० एकर जमिनींमध्ये आध्यात्मिक व मनोरंजनात्मक उद्यान अंतर्गत (साई गार्डन) - लेजर शो उभारण्यासाठी निविदा मागविणेत येवून, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९७४ अन्वये मे.लेजर व्हिजन लि. हाँगकाँग यांना USD ५५,००,०००/- only (अंदाजे भारतीय रक्कम रुपये २४,७५,००,०००/-मात्र) सदरचे काम देणेत आलेले आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करणेत आला आहे.

| S.N. | Particulars | |
|---|---|---|
| 1. | **Show Controls:** | |
| | **Equipments:** | • 1 X Digital Data ~ Pump Series III Media Server |
| | **Show Production:** | • 1 X 10 minute spectacular, inter weaving all effects and creative of the Shri Saibaba Sansthan Trust for the re-telling of a single episode from the Sai Satcharita. |
| | **Scheduler/ Triggers:** | |
| 2. | **Mediums:** | |
| | **Aqua screens:** | • 2 X 22 meter diameter A/Screen of 170 sq.meter surface area<br>• 1 X 36 meter diameter A/Screen of 450 sqmeter surface area |
| | **Audio System:** | • 1 X Audio surround sound system for 5000 Pax amphitheatre |
| | **Fountains:** | • 1 X Musical Fountain |
| | **Laser ray systems:** | • 2 X By Dual colour OPSL sting ~ Ray Laser ray System's<br>• 1 X RGB Full Colour OPSL Light ~ Ray Laser ray System |
| | **Lighting** | • 8 X Moving head CMY high intensity Beam Lights ( IP 55)<br>• 4 X Static Head CMY high intensity Beam Lights ( IP 55) |
| | **Pyro -Fireworks** | • 2 X12 meter Flame Cannon<br>• 1 X 25 meter Flame Cannon |
| | **Special FX** | • 8 X smoke Factories<br>• 8X double machines |
| | **Video High Definition** | • 4X HD high intensity Projection Systems |

| | | |
|---|---|---|
| 3. | **Project Main** | • **Onsite Office**<br>• **Laser vision Office** |

लेजर शोसाठी तयार करावयाच्या श्री साईंच्या जिवनावरील प्रासंगीक कथनकांसाठी (Story Board) दिनांक १८ ऑगस्ट, २०११ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये सात (०७) कथा निवडण्यात येवून निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त दिनांक १८ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व निवडण्यात आलेल्या कथांची थोडक्यात माहिती / गोषवारा सोबत माहितीस्तव तथा अवलोकनार्थ सादर केला आहे. या निवडण्यात आलेल्या कथांची शिर्षके खालील प्रमाणे आहे.

०१.बाबांचे शिर्डीत प्रगटीकरण.
०२.श्री खंडोबा मंदिरातील आओ साई.
०३.बाबांनी पाण्याने लावलेले दिवे.
०४.उदीचा प्रभाव.
०५.साईबाबांचा ब्रम्हांडनिवास.
०६.दासगणूंचे प्रयागस्नान.
०७.बाबांचे अन्न शिजविणे.

सदरहू बैठकीत ठरल्याप्रमाणे दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजी उपरोक्त कथांच्या तपशिलवार पुन्हश्च: चर्चा होऊन, त्यांना सदरहू कथांची माहिती / गोषवारा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०११ रोजी ई-मेल पत्राव्दारे जनसंपर्क विभागाकडून पाठविणेत आले आहेत.

उपरोक्त प्रसंग विचारात घेवून लेजर व्हिजन यांनी कथानक (Story Board) तयार केले असून, त्याचे सादरीकरण मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांसमोर सादर करुन त्यामध्ये काही सुधारणा असल्यास त्यांचा समावेश करुन अंतिम कथानक तयार करणार असल्याचे लेजर व्हिजन यांचे प्रतीनिधी John Kehoe, Director of Business Development - International यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

तरी श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पाअंतर्गत श्री साईबाबांचे जिवन चरित्रावर आधारीत कथानक (Story Board) लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे मार्फत सादरीकरण करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१७१** **आजचे सभेत श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पाअंतर्गत श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत कथानक (Story Board) लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे मार्फत चित्रफितीव्दारे सादरीकरण व कथेचे विश्लेषण करण्यात आले. तसेच मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे त्यांनी समर्पक उत्तरे दिली व सदस्यांनी श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत कथानक (Story Board) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्त्या सुचविल्या.**

| अ.नं. | Story no. | विषय | इतिवृत्त |
|---|---|---|---|
| 1. | Story no.1 | श्रीं चे प्रकटीकरण | ज्योती ऐवजी चार समया दर्शविणे |
| 2. | Story no.2 | "आओ साई" | श्री साईबाबा चॉंद पाटलाचे व-हाडाबरोबर शिर्डीत आले. व-हाड व बैलांचे घुगरांचा आवाज घेणे.<br>चॉंदपाटलाचे घोडीला बिजली हाक मारणे हा साऊंड इफेक्ट घेणे. |
| 3. | Story no.3 | बाबांनी पाण्याचे लावलेले दिवे | दिवे लावलेनंतर दिवाळी म्युझीक इफेक्ट घेणे. |
| 4. | Story no.4 | उदी विभुती | जळगांव स्टेशन दाखविणे<br>हातातुन निघणाऱ्या लेजर किरणांव्दारे बाळाला आर्शिवाद देतांना दाखविणे. |
| 5. | Story no.5 | ब्रम्हांड गमन | धार्मिक चिन्हाऐवजी प्रत्येक धर्माची मानसे/ व्यक्ती दाखवणे. |
| 6. | Story no.6 | दासगणूंचे प्रयागतिर्थ गमन | No addition |
| 7. | Story no.7 | बाबांनी अन्न शिजवणे | म्युझियम हॉल मधील भांडेप्रमाणे स्वयंपाक भांडे घेणे.<br>डिश ऐवजी पत्रावळ, केळीचे पान दाखविणे. |
| 8. | Finale | | अल्लाह मालिक ऐवजी श्रद्धा, सबुरी व सबका मालीक एक घेणे.<br>शेवटी सच्चिदानंद आप्पा यांचे "तुला खांदयावर घईन " पालखी भजन घेणे. |

अशाप्रकारे बदल करुन लेजर व्हिजन यांना माननीय व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत सादरीकरण करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२ दिनांक १४.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१७२** दिनांक १४.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.१०मध्ये शेवटचे वाक्य-**

सदर मटेरियल खरेदी संस्थानचे मागणी मटेरियलप्रमाणे दर न आल्याने फेर दरपत्रके मागविण्यात यावेत असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**सदर मटेरियल खरेदी संस्थानचे मागणी मटेरियलप्रमाणे न आल्याने याकामी फेर दरपत्रके मागविण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**(०२) निर्णय क्र.११**

सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कंपनीचे नाव | M/s. Cool Breeze,Katraj, Pune | | Luky Refrigeration,Nashik | | M/s. Speedfrost Services, Sandhurst Road (w.) Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | मुळ दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | मुळ दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
| 01 | Voltas | 3,94,962/- | 4,10,800/- | 4,52,812/- | 4,30,171/- | 5,19,372/- | 5,08,985/- |
| 02 | L.G. | 4,14,462/- | 4,01,700/- | -- | -- | 5,30,812/- | 5,20,196 |
| 03 | Blue Star | 4,82,062/- | 3,88,700/- | -- | -- | 5,40,432/- | 5,29,623/- |
| 04 | Onida | 3,97,562/- | 3,70,500/- | 4,39,812/- | 4,26,618/- | 5,06,502/- | 4,96,372/- |
| 05 | Samsung | 3,94,962/- | 3,97,800/- | -- | -- | 5,30,812/- | 5,20,196/- |
| 06 | Godrej | 4,07,962/- | ---- | -- | -- | 5,30,812/- | 5,20,196/- |
| 07 | Daikn | 4,97,662/- | 4,44,600/- | 5,43,812/- | 5,05,745/- | 5,62,662/- | 5,51,409/- |
| 08 | Hitachi | 5,75,662/- | 4,38,100/- | 8,82,062/- | 8,82,062/- | 5,62,662/- | 5,51,409/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी व कॅथलॅब विभागाकरिता मे.कुलब्रिज,कात्रज, पुणे यांचे Onida कंपनीचे Split A.C. कंपनीचे निम्नतम दर एकूण रक्कम रुपये ३,७०,५००/- चे (Bybackरक्कम वजा जाता) स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**(०३) निर्णय क्र.२८-**

**यावर चर्चा होऊन दोन्ही रुग्णालयाकरीता रेमंड कंपनीचे गुलमर्ग या ब्लँकेटचा नमुना सर्वानुमते पसंत झालेला असुन त्या ब्लँकेटकरीता मे.चंपालाल ॲन्ड कंपनी ,नाशिक यांनी २३ टक्के सुट देऊ केलेली आहे. त्यांचेकडुन सुटीनंतरचे दर प्रती नग रु.६४६.२९ या दराने ५५० ब्लँकेट खरेदी करण्यात यावे यावे असे ठरले.**

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर चर्चा होऊन दोन्ही रुग्णालयाकरीता रेमंड कंपनीचे गुलमर्ग या ब्लँकेटचा नमुना सर्वानुमते पसंत झालेला असुन त्या ब्लँकेटकरीता मे.चंपालाल ॲन्ड कंपनी ,नाशिक यांनी २३ टक्के सुट देऊ केलेली आहे. त्यांचेकडुन सुटीनंतरचे दर प्रती नग रु.६७५.२९ या दराने ५५० ब्लँकेट खरेदी करण्यात यावे यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(०४) विषय क्र.३६ मध्ये -M/s Life Care Devices Pvt. Ltd., Mumbai यांचा वॉरंटी कालावधी तुलनात्मक तक्यात चुकुन ३ वर्ष दर्शविण्यात आला होता, परंतू, तो ०१ वर्षाचा ग्राह्य धरण्यात यावा.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(०५) निर्णय क्र.४४ -**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**ओरिएंटल बँक कॉमर्स, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेत याव्यात,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०२** **दिनांक १४.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१७२** दिनांक १४.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०६) निर्णय क्र.१२५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजुस संस्थान मालकीचे नगरपंचायत मिळकत नं.७०६ व सिटी सर्व्हे नं.२० मध्ये चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पूर्वीचेच अटी शर्ती प्रमाणे दिनांक २०.०२.२०१२ पासून पूढे ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविण्यास देण्यास व त्यांचेकडून सध्या घेण्यात येत असलेल्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करण्यात यावी, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजुस संस्थान मालकीचे नगरपंचायत मिळकत नं.७०६ व सिटी सर्व्हे नं.२० मध्ये चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पूर्वीचेच अटी शर्ती प्रमाणे दिनांक **२०.०१.२०१२** पासून पूढे ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविण्यास देण्यास व त्यांचेकडून सध्या घेण्यात येत असलेल्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**(०७) निर्णय क्र.१३१-**

श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांचे हंगामाकरीता विजयी पहिलवानांना सस्थान मार्फत बिदागी म्हणून एकूण रक्कम रु.७०,२७०/- वाटप करणेत आले, त्यास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांचे हंगामाकरीता विजयी पहिलवानांना सस्थान मार्फत बिदागी एकूण रक्कम **रु.७०,७२०/-** वाटप करणेत आले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**(०८) निर्णय क्र.१४१**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.जयपाल राज कंत्राटी पद्धतीने वाहन चालक,मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.जयपाल राज कंत्राटी पद्धतीने वाहन चालक,मुंबई कार्यालय यांना पूर्वीचेच अटी व शर्तीवर एक वर्ष मुदतवाढ देण्यात यावी.**

**तसेच,मुंबई कार्यालयाकडे असलेले वाहन Logan MH-17 Y3636 या वाहनावरील दुरुस्ती व देखभालीचा खर्च वाढल्याने सदर वाहन शिरडी येथे आणून त्याची लिलावाने विक्री करण्यात यावी, व त्याऐवजी सध्या शिरडी येथे वापरात असलेले Swift Desire MH-17 AJ 1691 हे वाहन मुंबई कार्यालयाचे वापरासाठी पाठविण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/वाहन विभागप्रमुख)

---

**(०९) निर्णय क्र.१४८**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. २१८ मधिल ०१ हेक्टर क्षेत्र निश्‍चित करण्यात यावे. तसेच या कामासाठी मे.निकम पाटील असोसिएटस्.श्रीरामपूर यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करुन त्यांचेमार्फत नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करण्यात यावे असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. २१८ मधिल ०१ हेक्टर क्षेत्र निश्‍चित करण्यात यावे. तसेच या कामासाठी श्री पुष्कर कानविंदे द ऑडी ग्रुप,पुणे यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करुन त्यांचेमार्फत नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**(१०) निर्णय क्र.१४९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग १ व २ करिता आवश्यक असणारे ३१ नग वॉटर कुलर आर.ओ प्लॅन्टस खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग १ व २ करिता आवश्यक असणारे **८९ नग** वॉटर कुलर आर.ओ प्लॅन्टस खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**(११) निर्णय क्र.१७०(०६)**

शिरडी शहरातील कचरा डेपोसाठी संस्थानचे नावावर जागा घेऊन सदरहू जागा भाडे तत्वावर नगरपंचायतीस देण्यात यावी.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

संजीवनी सहकारी साखर कारखान्याने शहरातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प सुरु केलेला असून,शिर्डी शहरातील घन कचरा या ठिकाणी पाठविल्यास त्यावर प्रक्रिया करण्यास ते तयार आहेत,अशी माहिती मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष यांनी सभेस दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त ठिकाणी शिर्डी शहरातील घनकचरा पाठविणेकामी शिर्डी नगरपंचायतीचे नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३ दिनांक २१.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१७३** दिनांक २१.०१.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१ श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयांकरिता PHISIOTHERAPIST, M.R.I. TECHNICIAN, DIALYSIS TECHNICIAN,JR.P.F.T.TECHNICIAN, JR.BIOMEDICALEQUIPMENT ENGINEER व PHARMACIST या पॅरामेडिकल पदांवर कंत्राटदारांमार्फत नेमणेकामी उमेदवारांच्या मुलाखती घेणे.**

उपरोक्त पदांसाठी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जदारांच्या आजचे समितीसमोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

**अ) पदाचे नाव- ज्यु. फिजिओथेरापिस्ट**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | कु. ज्योती गंगाधर विखे | BPT-2010 |
| 2 | कु. प्रियंका लक्ष्मण विखे | BPT-2008, |
| 3 | श्री अभिजित निशिकांत सात्रळकर | BPTH- 2008, MPTH - 2011 |
| 4 | श्री प्रितेश प्रविण येवले | BPTH - 2008, MPTH - 2011 |
| 5 | श्रीमती राखी आर. अहलुवालिया | BHMS-1999 BPTH-2011 |

**ब) पदाचे नाव- एम आर आय टेक्निशियन**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | श्री मारुती रंगनाथ भोंडे | Dip in MRI - 2011 BSc - Appear |
| 2 | श्री भुषण सुभाष कुलकर्णी | H.S.C.-2009 MRI Tech - 2010, SYBCom |
| 3 | श्री अनिल अशोक उंबरकर | HSC (MCVC) -2008 |

**क) पदाचे नाव- डायलेसिस टेक्निशियन**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | श्री अनिल सुभाष गुडघे | HSC, Dip in Dialysis Tech. |
| 2 | श्री विनोद शामराव गायकवाड | HSC(Art)-2003 Dialysis Tech-2008 |
| 3 | श्री दादासाहेब बाबासाहेब कलांगडे | BSc- 2004, DMLT-2005 MSCIT - 2004 |
| 4 | श्री संदीप भास्कर डांगे | HSC-2000,CMLT - 2002 FYBSC - 2005 |

**ड) पदाचे नाव- ज्यु. पीएफटी टेक्निशियन**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | श्री मारुती रखमा उंबरकर | HSC- 1991, X-ray Tech Course - 1994, BSC (MLT) PFT Tech PIMS Dimeed University |

**इ) पदाचे नाव- ज्यु. बायोमेडिकन इक्युपमेंट इंजिनिअर**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | श्री सागर बाळासाहेब विखे | HSC (Sci),Dip Medical Electronics |
| 2 | श्री सचिन बाळासाहेब जगताप | BE (E & TC), Dip in E & TC |
| 3 | श्रीमती सविता जगन्नाथ गायकवाड | Dip in Medical Electronics |

**ई) पदाचे नाव- फार्मासिस्ट-**

| अ.नं | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | कु. कविता अशोक टेंबरे | HSC -2005, D.Pharm- 2007 B.Pharm - 2010 | |
| 2 | सौ. ज्योती सचिन दंडवते | HSC-2000, D.Pharm-2010 | |
| 3 | श्री प्रविण भाऊसाहेब कासार | HSC-2008, D.Pharm-2010 MS-CIT(Appear) | |
| 4 | श्री अनिल सुभाष गायकवाड | HSC-2008, D.Pharm-2008 | अनुपस्थित |
| 5 | श्रीमती रेणुका सुरेश जाधव | HSC-1997, D.Pharm-2008 | |
| 6 | श्री संदीप शामराव क्षिरसागर | HSC,D.Pharm, MS-CIT | |
| 7 | श्री रविंद्र भिकाजी गाजरे | HSC-2006, D.Pharm-2008 | |
| 8 | श्री नंदकिशोर नामदेव गडगे | HSC-2001, D.Pharm-2011 MS-CIT-2006 | |
| 9 | श्री सचिन विजय पंडीत | HSC-2003, B.Pharm-2009 MBA Appear | अनुपस्थित |
| 10 | श्री निलेश गिताराम घोलप | HSC-2007, D.Pharm-2009 | |
| 11 | श्री सागर नंदू विखे | D.Pharm | |
| 12 | कु. शर्मिला उत्तमराव दिघे | D.Pharm - 2009, B.Sc. Appear | |
| 13 | श्री धनंजय रामनाथ देशमुख | B.Pharm | |

उपरोक्त पदांचे मुलाखतींच्या वेळी आर एम ओ या पदासाठी हजर असलेल्या खालील उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

**उ) पदाचे नाव- आर एम ओ**

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | डॉ. संदिप भाऊसाहेब मोरे | एमबीबीएस-२००७ |
| २ | डॉ. नितिन तुकाराम जगताप | एमबीबीएस-२०११ |
| ३ | डॉ. राकेश नाथा आवटे | एमबीबीएस-२००५ डीजीओ |

उपरोक्तप्रमाणे पॅरामेडिकल पदांसाठी उमेदवार कंत्राटदारामार्फत घेणेकरीता व आर एम ओं च्या स्थायी पदावर नेमणूकीसाठी मुलाखती घेण्यात आलेल्या असून, त्यावर उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारसी केल्या त्या मान्य करण्यात आल्या.

**(अ) ज्यु. फिजिओथेरापिस्ट-** या पदाचे मुलाखतीसाठी ०५ उमेदवार हजर होते. त्यापैकी कु. ज्योती गंगाधर विखे व श्रीमती राखी आर अहलुवालिया (खुराणा) यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून प्रत्येकी मासिक रु. ११,०००/- मेहनताना देऊन श्री साईनाथ रुग्णालयाकडे कामावर घेण्यात यावे, असे ठरले आहे.

**(ब) एम आर आय टेक्निशियन-** या पदाचे मुलाखतीसाठी ०३ उमेदवार हजर होते. त्यापैकी श्री अनिल अशोक उंबरकर यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून मासिक रु. ११,०००/- मेहनताना देऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कामावर घेण्यात यावे. तसेच एम आर आय विभागामध्ये सध्या कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कु. प्रतिभा मुठे यांना कंत्राटदारामार्फत रु.११,०००/- मासिक मेहनताना देण्यात यावा, असे ठरले आहे.

**(क) डायलेसिस टेक्निशियन-** या पदाचे मुलाखतीसाठी ०४ उमेदवार हजर होते. त्यापैकी श्री अनिल सुभाष गुडघे व श्री विनोद शामराव गायकवाड यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून प्रत्येकी मासिक रु. ११,०००/- मेहनताना देऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कामावर घेण्यात यावे, असे ठरले.

**(ड) ज्यू. पी एफ टी टेक्निशियन-** या पदाचे मुलाखतीसाठी श्री मारुती रखमा उंबरकर हे एकमेव उमेदवार उपस्थित असून त्यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून मासिक रु. ११,०००/- मेहनताना देऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कामावर घेण्यात यावे, असे ठरले आहे.

**(इ) ज्यू. बायोमेडिकल इक्युपमेंट इंजिनिअर-** या पदाचे मुलाखतीसाठी ०३ उमेदवार हजर होते. त्यापैकी श्री सचिन बाळासाहेब जगताप यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून मासिक **रु.**

**११,०००/-** मेहनताना देऊन श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कामावर घेण्यात यावे व श्री सागर बाळासाहेब विखे यांना ट्रायल बेसेसवर दोन महिने कालावधीसाठी कंत्राटदरामार्फत कंत्राटी पध्दतीने घेऊन त्यांना मासिक **रु. ११,०००/-** मेहनताना देण्यात यावा, असे ठरले आहे.

**(ई) फार्मासिस्ट-** या पदाचे मुलाखतीसाठी १३ उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी ११ उमेदवार हजर होते. मुलाखतीस हजर उमेदवारांपैकी सौ. ज्योती सचिन दंडवते, श्री रविंद्र भिकाजी गाजरे व कु. शर्मिला उत्तमराव दिघे यांना कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कामावर घेण्यात यावे, असे ठरले आहे.

**(उ) आर एम ओ-** या पदाचे मुलाखतीसाठी ०३ उमेदवार हजर होते. त्यापैकी डॉ. संदिप भाऊसाहेब मोरे यांची श्री साईनाथ हॉस्पिटलकडे व डॉ. राकेश नाथा आवटे यांची श्री साईबाबा रुग्णालयाकडे प्रत्येकी रु. २७,०००/- एकत्रित मासिक वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

**(ऊ)** मा. विश्वस्तांच्या सूचना-डॉ. नानासाहेब कृष्णराव होन, रा. पोहेगाव, ता. कोपरगाव (शिक्षण-बी.एच.एम.एस.) यांना १० वर्ष कामाचा अनुभव आहे.ते बहिरेपणा आलेल्या रुग्णांवर विनाशस्त्रक्रिया उपचार करतात. त्यांनी नासिक, कोलकाता, हैद्राबाद, नवी दिल्ली येथे कॅम्प घेऊन जवळ जवळ १५ हजार रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर उपचार केलेले आहे. त्यांची नुकतीच देशाचे राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे डॉक्टर पॅनलवर निवड झालेली आहे. तरी त्यांचा वैद्यकिय सेवेचा अनुभव लक्षात घेऊन त्यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे महिन्यातील तिन दिवस मानद व्हिजीटींग वैद्यकिय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी व तपासणी पॅकेजनुसार मानधन देणेसंबंधी मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये सविस्तर प्रस्ताव ठेवावा. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे अर्धवेळ शिक्षणसेवक तसेच प्रयोगशाळा सहाय्यक पदांच्या मुलाखती घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२८ ऑगष्ट २००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा कनिष्ठ मूाविद्यालय, शिर्डी या महाविद्यालयाकरीता अर्धवेळ शिक्षण सेवक व प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे भरणेकामी दि.०३.०९.२०११ रोजी दै.लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालील उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

अर्जाचा तपशिल-

०१) अर्धवेळ शिक्षण सेवक(रसायनशास्त्र)-एकूण ०६
(त्यापैकी ०२ अर्ज पात्र असून ०४ अर्ज अपात्र आहेत)

०२) अर्धवेळ शिक्षण सेवक (गणित) -०१

०३)प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र)-एकूण ०६ (त्यापैकी०३ अर्ज पात्र असून ०३ अर्ज अपात्र आहेत.)

०४) प्रयोगशाळा सहाय्यक (माहिती तंत्रज्ञान) या पदासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही

उपरोक्त पदावरील खालीलपात्र उमेदवारांना आजचे सभेत समक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते.

**०१) अर्धवेळ शिक्षण सेवक (रसायनशास्त्र) -**

०१) तिजोरे विकास योहान,मु.पो.कासार पिंपळगांव ता.पाथर्डी जि,अहमदनगर
एम.एसस्सी, बी.एड

०२) श्री पोटे माहित किसन,मु.पो.ता.राहाता जि.अहमदनगर
एम.एसस्सी, बी.एड

**०२) अर्धवेळ शिक्षण सेवक (गणित)**

०१) श्री धाकतोडे गणेश शिवाजी, मु.पो.रांजणगांव देशमुख ता.कोपरगांव जि.अहमदनगर
एम.एसस्सी, बी.एड

**०३) प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र**

०१) श्रीमती बनसोडे सोन्याबाई रंगनाथ, मु.पो.ता.कोपरगांव जि.अहमदनगर
बी.एसस्सी, बी.एड (वनस्पतीशास्त्र)

०२) श्री घोडके नितिन शांताराम, मु.पो.मिरजगांव ता.कर्जत जि.अहमदनगर
बी.एसस्सी (प्राणीशास्त्र)

०३) श्री चक्रनारायण दिपक कचरु, मु.पो.नागापुर ता.नेवासा जि.अहमदनगर
बी.एसस्सी, बी.एड (वनस्पतीशास्त्र)

उपरोक्त उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन खालील उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**नियुक्तीसाठी -**

**०१) अर्धवेळ शिक्षण सेवक (रसायनशास्त्र) -**

श्री पोटे माहित किसन

०२) **अर्धवेळ शिक्षण सेवक (गणित)**

श्री धाकतोडे गणेश शिवाजी

०३) **प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र**

एकही पात्र उमेदवार मिळाला नसल्याने नियुक्तीसाठी निवड होऊ शकली नाही.

(कार्यवाही-प्राचार्य,ज्युनिअर कॉलेज )

**०३ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे कोपा (कॉम्प्यूटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट) निदेशक पदाच्या मुलाखती घेणे.**

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट -(COPA) निदेशक पदाच्या ०२ जागा (दोन) अनुसुचित जमाती (ST) संवर्गासाठी राखीव आहेत. त्यासाठी दि.३१-१०-२००९ रोजी दै.सकाळ मध्ये जाहीरात दिली. तसेच सेवायोजन कार्यालयाकडील यादी (ST) उमेदवारांची यादी मागवून दि. १४ /१० /२०१० रोजी १५ उमेदवारांना लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेसाठी पत्र पाठविले. त्यापैकी फक्त ०१ उमेदवार सौ. कविता संजय गांगड यांनी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा दिली. त्यानंतर त्यांना मुलाखतीसाठी पत्र पाठविले परंतु सदर उमेदवार उपस्थित राहील्या नाहीत.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०२/११ मधील निर्णय क्र.०२(३)अन्वये मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार कोपा निदेशक ०२ पदाच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेतील एकमेव पात्र उमेदवार उपस्थित न राहील्याने व प्रशिक्षणार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे आरक्षणानुसार अपात्र ठरलेल्या तथापि शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या ०९ उमेदवारांच्या मुलाखती स्थानिक विश्वस्तांचे उपसमिती सभेत घेण्यात याव्यात व त्यांना ०१ वर्षासाठी तात्पुरती नेमणूक देण्यात याव्यात, असा निर्णय झाला.

त्यानुसार आजचे सभेत खालीलप्रमाणे उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले.

| अ. नं. | उमेदवाराचे नांव | गांव |
|---|---|---|
| ०१ | कु. मुसमाडे अंजली जालिंदर | राहुरी |
| ०२ | कु. गडाख अर्चना कारभारी | संगमनेर |
| ०३ | श्री रोकडे अक्षय राजू | अ.नगर |
| ०४ | श्री गाडेकर चेतन सुभाष | राहाता |
| ०५ | श्री बनसोडे प्रशांत सबाजीराव | दाढ बु// |
| ०६ | कु वैद्य प्राजक्ता दत्तात्रय | श्रीरामपूर |
| ०७ | श्री राहाणे तुषार भिकसेन | कोपरगांव |
| ०८ | श्री जाधव विलास दत्तात्रय | कोल्हार बु// |
| ०९ | कु.भुसाळ सध्या बापूसाहेब | उंबरी |

वरील उमेदवारांना आजचे सभेत मुलाखतीस उपस्थित रहाणेबाबतचे मुलाखत पत्र व त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात आले. यापैकी अ.नं.२,३,५, व ७ चे उमेदवार तसेच विलंबाने अर्ज सादर केलेले श्री.जेजूरकर अरविंद भास्कर रा.ममदापूर(ता.श्रीरामपूर) हे उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस हजर होते.मुलाखत घेणेकामी तज्ञ परिक्षक म्हणून शासकिय तंत्र निकेतन,नाशिक येथील आय.टी. विभागप्रमुख व लेक्चरर श्रीमती माधुरी सदाशिव आरडे हयाना निमंत्रित केलेनुसार त्या उपस्थित होत्या.

वरील पाच उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येऊन खालील उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड करण्यात आली.

| अ. नं. | नांव |
|---|---|
| ०१ | श्री बनसोडे प्रशांत सबाजीराव |
| ०२ | श्री राहाणे तुषार भिकसेन |

उपरोक्त उमेदवारांना रु.१२,०००/- दरमहा संकलित वेतनावर एका प्रशैक्षणिक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात (३१ जुलै २०१२ पर्यंत) सदर पदावर नेमणूक द्यावी.

सदर पदे आरक्षणानुसार भरण्यासाठी जाहिरातीसह पुढील प्रक्रिया सुरु करावी. सदर प्रक्रियेस कालावधी लागणार असल्यास व या उमेदवारांची सेवा समाधानकारक राहिल्यास त्यांना त्यापुढील प्रशैक्षणिक वर्षासाठी तात्पूरती नेमणूक द्यावी. तथापि या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास प्रशैक्षणिक वर्ष संपणेपुर्वीही त्यांची सेवा संपुष्ठात येईल, ही अट पुर्ननियुक्ती आदेशात देण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय )

**०४. श्री साईबाबा संस्थानचे लेखा विभागाकडील स्ट्रॉंग रुम ची पहाणी करणे.**

सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**०५. <u>द्वितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसित करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांबाबत..</u>**

शिर्डी नगरपंचायतीने दि.१०/०६/२०११ रोजीचे पत्रान्वये केलेल्या मागणीवरुन शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्यगटातील २४ रस्त्यांचे विकसनास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११रोजीचे सभेतील नि.क्र.५३८ अन्वये भुसंपादनखर्चासह अंदाजे रक्कम रु. १२६.१० कोटीचे अंदाजीत खर्चास मान्यता देणेत आली आहे.

प्रथम प्राधान्य गटातील सुमारे रुपये ८८ कोटी इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु असून याकामी प्रथम व द्वितीय प्राधान्यगटातील रस्त्यांचे कामांना व याकामी येणारे सुमारे रु. (८८+१२६.१०)= २१४.१० कोटी खर्चास शासनमान्यता मिळणेबाबत मा. विधी व न्याय विभाग, यांचेकडे पाठपुरावा करणेत येत आहे.

उपरोक्त निर्णयान्वये भूसंपादनाची आवश्यकता नसलेले व साईभक्त/नागरीकांचे दैनंदिन वापरात असलेले व्दितीय प्राधान्य गटातील २४ रस्त्यांपैकी १७ रस्ते विकसीत करणेचे ठरले आहे. त्यानुसार प्रकल्प सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे यांचेकडून रु. ३३,९५,०७,४६१/- रकमेचे कोरे निविदा फॉर्म तयार करणेत येवून या कामासाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. निविदांमधील तांत्रीक माहितीचा लिफाफ्यातील (Technical Bid) कागदपत्रांचे मुल्यांकन करून सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे यांनी दि. ०३/११/२०११ रोजी मुल्यांकन अहवाल सादर केलेला होता. सल्लागार यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार <u>सहाही ठेकेदार पुर्वपात्रताविषयक पात्रतेचे निकष पुर्ण करीत असल्याचे कळविले होते.</u> सहा ठेकेदारांपैकी केजे इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टस (इं) प्रा.लि., पुणे यांनी फक्त तिन वर्षे सार्वजनिक बांधकाम विभागासाठी कामे केल्याचे व प्रकाश कन्स्ट्रोवेल प्रा.लि., नाशिक यांना रस्तेविषयक कामाचा अनुभव दिसत नाही, या कारणांसाठी अर्थिक देकार उघडणेबाबत शिफारस केलेली नव्हती. तसेच पाटील कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे ही कंपनी गेल्या वर्षीच प्रा.लि.कंपनी झाल्याने व त्यानी लिटिगेशनविषयी अपुर्ण माहिती सादर केल्याने त्यांचेबाबत संस्थानने निर्णय घ्यावा असे कळविले होते. उर्वरीत खालील तिन ठेकेदारांचे अर्थिक देकार उघडणेबाबत शिफारस केलेली होती.

१. अशोका बिल्डकॉन लि. नाशिक,
२. आयव्हीआरसीएल लिमिटेड, पुणे,
३. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि., नवी मुंबई

वरीलप्रमाणे सल्लागार यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेवून, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११रोजीचे सभेत सविस्तर चर्चा झाली व विषयांकीत कामासाठी आलेले सर्व सहाही पात्र ठेकेदारांचे निविदेतील अर्थिक देकार उघडणेबाबत निर्णय घेणेत आला. त्यामध्ये ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी सर्वात कमी स्वरुपाचे (११.०५ % कमी ) दर देवू केले होते. ठेकेदार यांचे दरपृथ्थ:करण सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे यांचेकडून तपासणी घेण्यात यावी. पाटील कन्स्ट्रक्शन हे या दरात काम करणेस सक्षम असल्यास त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे या निर्णयान्वये ठरले आहे.

त्यानुसार ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे यांनी दि.०७/१२/२०११ चे पत्रान्वये दरपृथ्थ:करण व त्याबाबत स्पष्टीकरण सादर केले आहे. यावर सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा लि. पुणे यांनी तपासणी करून दि.१३/१२/२०११चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

'.... from foregoing paras it is clear that the project is not viable with quoted contract sum i.e.11.50% (11.05 %) below estimated cost. This is only viable incase the party is disparate to use his idle resources and minimise losses (considering that idling cost is more than one could loose in works cotract by quoting low be in market). In view of above, SSST may take chance if deemed approriate.'

सदर अहवालाचे अवलोकन होवून ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे यांना कार्यादेश देणेबाबतचा विषय मा. कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावत नमूद केलेप्रमाणे, मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी विषयांकित कामासाठी सादर केलेल्या निविदेतील दरांबाबतचे दिनांक ०७ डिसेंबर, २०११ रोजीचे दरपृथ:क्करणाबाबत प्रकल्प सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांनी सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करणेत आली.

यावेळेस प्रकल्प सल्लागार यांनी, मे. पाटील यांनी नमूद केलेल्या निम्नतम दरात विषयांकीत काम पूर्ण होऊच शकत नसल्याबाबतची कारणमीमांसा विषद केली. सदर प्रकल्पाचे कामांबाबत /

निविदेबाबत चर्चा करणेसाठी निम्नतम निविदाधारक यांना बोलविणेत आले होते. तथापि, ते हजर राहीले नाहीत.

प्रकल्प सल्लागार यांनी दिलेला अभिप्राय, त्यांनी विषद केलेली कारणमीमांसा,आदी बाबी विचारात घेऊन, विषयांकीत कामाची संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, निविदेसाठी प्राप्त झालेल्या बयाना रकमा संबंधितांना परत करणेत याव्यात. तसेच विषयांकीत कामासाठी पुनःश्च निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**०६. साई गार्डन प्रकल्पाचे ठेकेदार केआरआर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.यांचे कामाचे प्रगतीबाबत. .**

मौजे निमगांव को-हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या जमिनींमध्ये साई गार्डन-लेजर शो उभारण्यासाठी निविदा मागविणेत येवून, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.९७४ अन्वये मे. लेजरव्हिजन मेगा~मिडिया लि. हाँगकाँग यांना USD ५५,००,०००/- (अंदाजे भारतीय रक्कम रुपये २४,७५,००,०००/-) सदरचे काम देणेत आलेले आहे.

**(अ)** सदर कामाचे सिव्हील कामांपैकी पहिल्या टप्प्यातील लेजरशोकरिता आवश्यक असणारे वॉटरबॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा (कार्यालय, नियंत्रण कक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदि)चे बांधकाम के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस लि. हैद्राबाद यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२००११चे सभेतील निर्णयानुसार देणेत आलेले आहे.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्टये-**

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे स्थळ | गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मौजे निमगाव को-हाळे |
| जागेचे एकुण क्षेत्रफळ | ८ हेक्टर २० आर (२०.२५ एकर) |
| इमारतींचा एकुण बिल्ट-अप एरिया | १५६१३चौ.मी. (१६७९९१चौ.फुट.) |
| आर्किटेक्ट | माथुर अॅन्ड काप्रे असोशिएट्स प्रा.लि., नवी दिल्ली |
| लेजरशो उभारणीकामी नियुक्त कंपनी | मे.लेजरव्हिजन मेगा~मिडिया लि. हाँगकाँग |
| लेजर शोसाठी मंजूर निविदा रक्कम | USD ५५,००,०००/-only (अंदाजे भारतीय रक्कम रुपये २४,७५,००,०००/-मात्र) |
| बांधकामाची मंजूर निविदा रक्कम | रु. ३०,९५,२७,६६६ /- |
| निविदा टक्केवारी | ५.४७% कमी |
| बांधकामकर्ता | केआरआर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि., हैद्राबाद |
| कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र २१८२/२०११ दि.०१/०८/२०११ |
| काम सुरु केल्याची निविदेनुसार दिनांक | ०७/०८/२०११ or from the date of handing over of site, whichever is later. |
| काम सुरु केल्याची प्रत्यक्ष दिनांक | १२/०९/२०११ |
| कामाची मुदत | १२ महिने (दि. ०६/०८/२०१२) |
| ठेकेदार यांना अदा केलेली रक्कम | रु. २७,७२,३०२/- |
| संस्थानकडे जमा अनामत रक्कम | रु. ७७,३८,१९२/- [EMD +ISD] |

**प्रगतीपथावर असलेल्या कामांचा तपशील.**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची सद्य :स्थिती |
|---|---|---|
| ०१ | वॉटरबॉडी | खोदाई व पीसीसी पुर्ण, राफ्टचे स्टील कटींग बायडींग, कॉंक्रीटींग प्रगतीपथावर |
| ०२ | मेन बिल्डींग | खोदाई प्रगतीपथावर |
| ०३ | कंपाउंड वॉल | खोदाई व पीसीसी प्रगतीपथावर |

उपरोक्त तक्त्यातील प्रगतीपथावर असलेल्या कामांचे अवलोकन करता, ठेकेदार यांनी गेल्या चार महिन्यात खोदाई, पीसीसी व राफ्टचे स्टील कटींग बायडींग, कॉंक्रीटींग वगळता इतर कामांना अद्याप सुरुवात केलेली नाही. सुरु असलेल्या कामाची गती ही अत्यंत धिमी आहे सदरचे कामाची गती वाढविणेबाबत ठेकेदार यांचे समवेत वेळोवेळी झालेल्या प्रगती आढावा बैठकीत सुचना देवूनही ठेकेदार यांनी कामाची अपेक्षित अशी गती अद्याप वाढविलेली नाही. आर्कीटेक्ट यानी सादर केलेल्या प्रगती अहवालावरुन आजअखेर फक्त ०५% काम ठेकेदार यांनी केलेले आहे.

तसेच सदर कामासाठी मटेरियल,यंत्रसामुग्री, मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात साईटवर आणलेले नाही. तसेच ठेकेदार यांनी साईटवर अद्यापही कायमस्वरुपी साईट इन चार्ज नेमलेला नाही. कामाचे आवश्यकतेनुसार किमान ८० मजुर आवश्यक असतांना सरासरी ४० मजूर साईटवर असतात. मुख्य इमारतीचे कॉंक्रीटीकरण व इतर कामास अद्याप सुरुवातही केलेली नाही. ठेकेदार यांना इकडील दि.०९/०१/२०१२चे पत्रान्वये कामाची गती वाढविणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे आर्कीटेक्ट काप्रे यांनीही दि. ०५/०१/२०११चे स्थळभेटी दरम्यान पंधरा दिवसात कामाची गती वाढविणेबाबत सुचना दिल्या होत्या. ठेकेदार यांनी त्यावेळी दिलेल्या नियोजित तारखांनुसार अद्यापही

कामाची गती वाढविलेली नाही. ठेकेदार यांनी आजअखेर केलेल्या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| Sr.no. | Description | Scheduled date | Actual Completion | Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | **Water Body** | 29/11/2011 | 43% work in complete | **Three months** Lagging behind. |
| 2. | **Compound Wall** | 06/01/2012 | 06% work is complete | **Three months** Lagging behind. |
| 3. | **Main building** | 31/07/2012 | 03% work is complete | **Two & half months** Lagging behind. |

**(ब)** लेजरशोचे उभारणीकामी नियुक्त कंपनी मे.लेजरव्हिजन लि. हाँगकाँग यांचे करारानुसार त्याना यंत्रसामुग्री बसविणेकामी मार्च २०१२ चे पहिल्या आठवडयापुर्वी वॉटरबॉडी व आवश्यकतेनुसार इतर कामाचा वाव उपलब्ध करून द्यावा लागेल. त्यासाठी सिव्हील वर्कचे कामाची गती वाढविणे अत्यावश्यक आहे. ठेकेदार यांनी दि.२०/०१२०१२ चे पत्रासोबत सुधारीत बार चार्ट दिला आहे. त्यानुसार त्यांनी काम केल्यास दि.२८/०७/२०१२ अखेर काम पुर्ण होऊ शकेल. ठेकेदार यांनी खालील कामे पुर्ण करणेकरीता सोबतचेप्रमाणे तारखा दिलेल्या आहेत.

१. वॉटर बॉडीचे बांधकाम - दि.०६/०२/२०१२
२. कम्पाउंड भिंत - दि.२९/०३/२०१२
३. मुख्य इमारत बेसमेंट - दि.१३/०४/२०१२
४. मुख्य इमारत सुपर स्ट्रक्चर - दि. ०७/०७/२०१२

तरी ठेकेदार केआरआर इन्फ्राप्रोजे्क्ट प्रा. लि. यांचे कामाचे प्रगतीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे माहितीस्तव सविनय सादर.

नियोजित 'साईगार्डन' प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार केआरआर इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांचे वतीने प्रकल्प व्यवस्थापक श्री. बी. वासू हे आजचे सभेपुढे चर्चेसाठी उपस्थीत होते.

साईगार्डनचे सध्या सुरु असणाऱ्या बांधकामाच्या गती बाबत त्यांचेकडे असमाधान व्यक्त करणेत आले. यावेळेस श्री. वासू यांनी सभेसमोर असे सांगितले की, कंपनीचे मालक श्री. के. आर. रेड्डी यांचे वडीलांचे अपघाती निधन झाल्याने, मध्यंतरीचे काळात कंपनीच्या अर्थिक व्यवहारावर निर्बंध येऊन, आर्थिक बाबींचे नियोजन विस्कळीत झाले. त्याचा थेट परिणाम बांधकाम साहीत्याची उपलब्धता, कर्मचारी वेतन, मनुष्यबळ उपलब्धता आदि बाबींवर मर्यादा आल्याने बांधकामाची अपेक्षीत गती / प्रगती गाठता आली नाही. परंतू आता आवश्यक असे आर्थिक नियोजन झाले असून, कामाच्या गतीत वाढ होईल. आवश्यकता पडल्यास कामाचे सोयीचे दृष्टीने दोन पाळ्यांत काम सुरु ठेवणेत येईल. सदरचे बांधकाम मुदतीत पूर्ण करण्याचा निश्चित प्रयत्न करु, असे आश्वासन दिले.

केआरआर, हैद्राबाद यांचे प्रतिनीधींनी विषद केलेल्या बाबी विचारात घेऊन, त्यांना येत्या काही दिवसांत पूर्ण क्षमतेने कामाची गती वाढविणेबाबत उपसमितीने सूचना -वजा-निर्देश देणेत आले. ते मान्य करण्यात आले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**०७. <u>शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना- प्रथम प्राधान्यगटातील रस्त्यांपैकी संस्थानमार्फत विकसित करणेत येत असलेल्या सहा रस्त्याचे ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचे पत्राबाबत.</u>**

शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रुपये ८८ कोटी मात्र इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु आहे. सदर कामापैकी रु.२८ कोटी रकमेस शासन मान्यता प्राप्त आहे. संस्थानमार्फत शिर्डी शहरातील ७.२९ किमी. लांबीचे रस्ते विकसित करणे प्रकल्पाचे काम मे.रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे सदर कामांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ. नं.** | **कामाचे नांव** | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या माध्यमातून विकसीत करावयाचे रस्ते -०६ रस्ते** |
|---|---|---|
| ०१ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे |
| ०२ | बांधकाम ठेकेदार | मे.रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई |
| ०३ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३३.८३ कोटी |
| ०४ | निविदा टक्केवारी | १०% कमी |
| ०५ | कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र ८८३७ दि.०६/०८/२०१० |
| ०६ | कामाची मुदत | १५ महिने (दि.०५/११/२०११ अखेर) |
| ०७ | ठेकेदार यांना सल्लागार यांचे प्रमाणपत्रानुसार दि.२०/१२/२०११ अखेर २ रे रनिंग बिलाअखेर अदा केलेली रक्कम | रु. ४,७८,९५,८९९/- |
| ०८ | यापुर्वी आदा केलेले मोबिलायझेशन अॅडव्हान्स | रु. १,६९,१६,३१०/- (बँक गॅरंटी घेवून) |

| | | |
|---|---|---|
| | रक्कम | |

**विकसीत करावयाचे रस्त्यांचा तपशील-**

| रस्ता क्र. | रस्त्याचे नाव | लांबी ) | रुंदी | कामाची सद्य :स्थिती |
|---|---|---|---|---|
| **अ) संस्थान मार्फत विकसीत करावयाचे रस्ते.** | | | | |
| **०१. ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., यांचेमार्फत चालू असलेले रस्ते.** | | | | |
| ०३ | नांदुर्खी रस्ता **कॉंक्रीटीकरण/डांबरीकरण** करणे. (नगर मनमाड रस्ता ते नांदुर्खी शीव रस्ता | २००० | १८ | नगर-मनमाड रस्ता ते प्रस्तावीत १८ मी. वळण रस्ता या ५४० मी. अंतरामध्ये फक्त कॉंक्रीटीकरण पुर्ण केले आहे. उर्वरीत भागातील GSB, DLC, पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता **कॉंक्रीटीकरण** करणे.(नवीन पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता आरक्षण क्र.३१ पोहच ) | ५५० | १५ | या भागातील रिटेनिंग वॉल, सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज इ. कामे पुर्ण. GSB व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. अद्याप कॉंक्रीटीकरण कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |
| ०७ | विकास योजनेतील २४ मीटर वळण रस्ता **डांबरीकरण** करणे.(नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचा रस्ता) | ४५० | २४ | या भागातील रिटेनिंग वॉल, सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज इ. कामे पुर्ण. WBM व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. अद्याप डांबरीकरण कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |
| ०८ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता **कॉंक्रीटीकरण** करणे. हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर (पिंपळवाडी रस्ता - निमगांव शीव रस्ता) | ४५० | १८ | या भागातील सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज, GSB, WBM इ. कामे पुर्ण. अर्ध्या भागातील कॉंक्रीटीकरण काम पुर्ण. उर्वरीत भागातील DLC पुर्ण. कॉंक्रीटीकरणासाठी पुर्वतयारी , पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर कामे प्रगतीपथावर आहेत |
| **०२. अद्याप काम सुरु न केलेले रस्ते.** | | | | |
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा वळण रस्ता **डांबरीकरण** करणे. (आरक्षण क्र. ३१ चा दक्षिण-पश्चिम कोपरा ते नाला क्र.३४ पर्यन्त) | १५०० | १८ | अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. दि. १४/०९/२०११ रोजी रस्ता काम करणेसाठी हस्तांतरीत करणेत आला आहे. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता **कॉंक्रीटीकरण** करणे. (नगरमनमाड रस्ता /लक्ष्मीनगर ते १८ मीटर वळण रस्ता पर्यन्त) पुर्व - पश्चिम रस्ता) | ८४० | १८ | अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. दि.२८/०७/२०११ पुर्वी रस्ता काम करणेसाठी हस्तांतरीत करणेत आला आहे. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता **डांबरीकरण** करणे.(नगर मनमाड रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता पर्यन्त आरक्षण क्र. ३१पोहच ) | १५०० | १८ | भुसंपादन कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही. अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |

उपरोक्त तकत्यातील रस्त्यांपैकी रस्ता क्र. ०५, ०९ व ९अ या रस्त्यांचे कामास ठेकेदार यांनी अद्याप सुरुवात केलेली नाही. सुरु असलेल्या रस्त्यांचे कामाची गती ही अत्यंत धिमी आहे. सदरचे कामाची १५ महिने मुदत दि.०५/११/२०११ रोजी संपुष्टात आली असून कामाची गती वाढविणेबाबत ठेकेदार यांचे समवेत वेळोवेळी झालेल्या प्रगती आढावा बैठकीत सुचना देवूनही ठेकेदार यांनी कामाची अपेक्षित अशी गती अद्याप वाढविलेली नाही व उपरोक्त तिन रस्त्यांचे कामास सुरुवातही केलेली नाही.

(अ) आता, ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांनी त्यांचेकडील दि.२८/११/२०११ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. Past 15 months, we lost very heavily in the form of idling of our resources, manpower, plant & equipments, in executing the road work on piecemeal basis.Due to encumbrances on the road alignment.

As we have lost heavily in the above slow process, our CMD had requested yourself to allow us to complete the job of the above mentioned roads only and foreclose the contract.

सदरचे कामात त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागल्याने त्यांचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी दि.१५/१०/२०११ रोजी मा.अध्यक्ष सो. यांना शिर्डी शहरातील रस्त्यांबाबत झालेल्या प्रगती आढावा बैठकीचे वेळी वरील पैकी प्रगतीपथावर असलेल्या चार रस्त्याचे कामच ते पुर्ण करतील व त्यानंतर सदर काम बंद करतील अशी विनंती केली होती. "

(ब) तद्नंतर ठेकेदार यांनी परत दि.०७/१/२०१२ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. चार रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून, उर्वरीत दोन (०२) रस्त्यांचे काम सुरु करण्याचा कंपनीचा विचार आहे. मागिल वर्षाभरातील कामांचा आढावा घेता असे निदर्शनास आले आहे की, सदर चार (०४)

रस्त्यांचे काम करतानां कंपनीस आलेल्या स्थानिक अडचणीमुळे कामाची योग्य गती साधता आली नाही. त्यामुळे कंपनीस मोठा आर्थिक तोटा सोसावा लागत आहे. सदर कामे ही श्री साईबाबांच्या भक्तपरिवारांना चांगले रस्ते उपलब्ध व्हावे ह्या उदात्त हेतूने कमी दराने घेण्यात आलेली आहे.

उर्वरीत दोन रस्त्यांच्या कामाकरिता आम्हांस ना नफा ना तोटा या प्रमाणे निविदेच्या दरामध्ये १५% वाढ करुन काम करण्यास आपण सहमती दिल्यास कंपनी संपूर्ण गुणवत्तेसह आणि कमी वेळेत दोन्ही रस्त्यांची कामे पूर्ण करण्यास बांधील राहील. तसेच सुरु असलेल्या कामामध्ये आलेल्या स्थानिक अडचणीमुळे सदर रस्यांची कामे देण्यात आलेल्या वेळेमध्ये पूर्ण करता आलेली नाही. तरी सदर सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करण्यास आम्हांस मुदतवाढ देण्यात यावी असे कळविले आहे."

ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांचेकडील दिनांक २८ नोव्हेंबर, २०११ चे पत्रानुसार ते उपरोक्त तक्ता क्र. ०२ मधील रस्ता क्र. ०५, ०९ व ९ अ या रस्त्यांची कामे करणेस इच्छुक दिसत नाही. तथापि, त्यांचे शिर्डी साईटचे प्रतिनीधीनीं दिनांक ०७ जानेवारी, २०१२ अन्वये दिलेल्या पत्रामध्ये नमुद केलेली १५% दरवाढ व सदर सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करणेस मुदतवाढ दिल्यास काम पुर्ण करण्यास इच्छुक आहोत असे कळविले आहे.

उपरोक्त बाबींबाबत प्रकल्प सल्लागार व ठेकेदार यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेस बोलवून, त्यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेता येईल, असा विषय मा. कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे आजचे सभेपुढे ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई व सदर प्रकल्पाचे सल्लागार मे. युनिसन यांचेशी आजचे समितीचे सदस्यांनी सदर प्रकल्पाबाबत सविस्तर करणेत आली.

सदर चर्चेमध्ये ठेकेदार यांचे मागणीबाबत सल्लागर युनिसन, पुणे यांचे प्रतीनीधींनी समक्ष चर्चेत ठेकेदार यांना निविदा शर्तीनुसार सुमारे १० ते १२% (दरसुचकांकनुसार) दरवाढ मिळणे अपेक्षित आहे असे सांगीतले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांचे भाववाढ मागणीबाबत व त्याना निविदेनुसार देय भाववाढ याबाबत सविस्तर तपशील सल्लागार यांचेकडून तपासणी करुन घेणेत यावा. ठेकेदार यांना सध्या त्यांचेमार्फत सुरु असलेले चार रस्त्यांचे कामासाठी माहे मार्च, २०१२ पर्यन्त मुदतवाढ देणेत यावी. उर्वरीत रस्ता क्र. ५,९ व ९अ या रस्त्यांचे कामासाठी भाववाढीबाबत सल्लागार यांचे अभिप्रायानंतर निर्णय घेणेत यावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

---

**विषय नं.०४** **(अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे डिसेंबर २०११**

**(ब) माहे डिसेंबर २०११ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे डिसेंबर २०११ व जानेवारी,२०१२ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे डिसेंबर,२०११ मधील जमा रु.४२,८६,७३,७९२/-आणि खर्च रु.१७,४५,७४,३३५/- चा तक्ता,मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे डिसेंबर,२०११ मधील रुपये २,५७,११३/-चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दिनांक २०.०१.२०१२ अखेर रुपये ६००,४७,३६,१७४/- चा तक्ता, दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे डिसेंबर,२०११ मधील रुपये १६,६६,२४,००३/- चा तक्ता, श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा माहे डिसेंबर,२०११ व जानेवारी,२०१२ मधील अनुक्रमे रु.३,८२,९१४/- व रुपये ४,२०,०८४/- च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. १७४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर व ऑक्टोबर -२०११ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर व ऑक्टोबर -२०११ या महिन्यात अनुक्रमे रुपये माहे जुलै,रुपये १,४४,६२९/- ऑगस्ट,रुपये १,१७,३०२/- सप्टेंबर,रुपये १,०१,८६४/- व ऑक्टोबर, रुपये १,००,२४०/- मात्र देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र. १७४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईबाबा रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २०११ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

| 3 | Suction Shaver Blade, straight, cutting window: rectangular, 4 mm ø, length 12 cm, color code: blue- blue, sterilizable | 2 | 40201 SN | Suction Shaver Blade straight, stenlizable, straight culling edge, rectangular cutting window, 04 mm, length 12 cm, color code: blue-blue for use with Paranasal Sinus Shaver Handpiece 40711039 and Micro Shaver Handpiece 40711035 | 36018.00 | 72036.00 | 32416.20 | 64832.40 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | Suction Shaver Blade, straight, cutting edge concave, cutting window: oval, 4 mm ø, length 12 cm, color code: blue-green, sterilizable | 2 | 40201 GN | Suction Shaver Blade straight, sterilizable, concave cutting edge, oval cutting window, 04 mm, length 12 cm, for use with Paranasal Sinus Shaver Handpiece 40711039 and Micro Shaver Handpiece 40711035. color code: blue-green | 36018.00 | 72036.00 | 32416.20 | 64832.40 |
| 5 | Suction Shaver Blade, straight, cutting edge serrated, cutting window: rectangular, 3 mm ø, length 12 cm, color code: blue-red, sterilizable | 2 | 40201 KSA | Suction Shaver Blade, straight, sterilizable, serrated cutting edge, rectangular culling window, diameter 3 mm, length 12 cm, color code: blue-red for use with Paranasal Sinus Shaver Handpiece 40711039 and Micro Shaver Handpiece 40711035 | 36018.00 | 72036.00 | 32416.20 | 64832.40 |
| **Total Amt. in Rs.** | | | | | | **360180.00** | | **324162.00** |
| **Warranty** | | | | | | | **1 Year** | |
| **Delivery** | | | | | | | **6 to 8 Weeks** | |

**निर्णय क्र.१९२** **यावर चर्चा होऊन श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. ओ.टी. विभागासाठी Microdebrider मशिनसाठी लागणारे Shaver Blades हे M/s.Karl Storz, New Delhi यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३,२४,१६२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **सोनोग्राफी व कलर डॉपलरवर २० टक्के इन्सेंटीव्ह देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रेडीओलॉजी विभागात नियोजित कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे दोन सि. रेडीओलॉजिस्ट व दोन ज्यु.रेडीओलॉजिस्ट अशी नियोजित पदे आहे. मासिक वेतनाव्यतिरीक्त सिनीयर रेडिओलॉजिस्ट यांना रेडीओलॉजी विभागातील तपासणी बिल रकमेच्या १०% व ज्यु.रेडिओलॉजीस्ट यांना फिक्स रु.२०,०००/- मासिक इन्सेंन्टीव्ह देणेबाबत मा.व्य.स.सभा निर्णय संमत झाला आहे.

ज्यु.रेडिओलॉजीस्ट यांना मासिक वेतन साधारणतः रु.३२,०००/- व फिक्स इन्सेंन्टीव्ह रु.२०,०००/- अशी एकुण रक्कम रु.५२,०००/- इतकी मिळते. सदर रक्कम ही बाहेरील रुग्णालयांच्या तुलनेत कमी असल्याने ज्यु.रेडिओलॉजीस्ट सोडुन जाण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्यु.रेडिओलॉजीस्टला मासिक वेतन अधिक इन्सेंन्टीव्ह साधारणतः रु.७५,०००/- मिळाल्यास टिकवुण राहतील. एमआरआय, सिटी स्कॅन व एक्स-रे यावर १०% इन्सेंन्टीव्ह आहे. एमआरआय, सिटी स्कॅन व एक्स-रे दरांच्या तुलनेत सोनोग्राफि व कलर डॉपलरचे दर कमी असल्याने १०% इन्सेन्टीव्ह कमी होतो. सोनोग्राफि विभागाची मासिक जमा रक्कम साधारणतः दोन ते अडीच लाखापर्यंत आहे. यावर २०% इन्सेन्टीव्ह देऊ केल्यास साधारणतः रु.४०,०००/- ते रु.५०,०००/- इन्सेन्टीव्ह होईल. अशाप्रकारे मासिक पगार व इन्सेन्टिव्ह रक्कम साधारणतः रु.७०,०००/- ते ८०,०००/- इतकी अपेक्षीत असले प्रमाणे होईल.

तरी ज्यु.रेडिओलॉजीस्ट टिकवुन ठेवण्याच्या दृष्टीने रेडीओलॉजी विभागातील इतर तपासण्यांवर पुर्वी इतकाच १०% इन्सेंन्टीव्ह ठेवुन सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर २०% इन्सेंन्टीव्ह देण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्य.स चे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.१९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ज्यु.रेडिओलॉजीस्ट टिकवुन ठेवण्याच्या दृष्टीने रेडीओलॉजी विभागातील इतर तपासण्यांवर पुर्वी इतकाच १०% इन्सेंन्टीव्ह ठेवुन सोनोग्राफि व कलर डॉपलर तपासण्यांवर २०% इन्सेंन्टीव्ह देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईनाथ रुग्णालयात सूपर स्पेशालिटी ऑप्थलमॉलॉजी वैद्यकीय तपासण्या व शस्त्रक्रिया विभाग सुरु करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील नेत्र विभाग श्री साईनाथ रुग्णालयामधील नेत्र विभागमध्ये विलीन करण्यात आला असुन सर्व रुग्णांना या ठिकाणी श्री साईनाथ रुग्णालयामधील दर पत्रकानुसार दर आकारणी करुन वैदयकिय सेवा देण्यात येत आहे. या ठिकाणी नेत्र विभागामधील डॉक्टर्स सर्वसाधारण तपासण्या व शस्त्रक्रियां करतात. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सर्व साधारण तपासण्या व शस्त्रक्रियांव्यतीरीक्त तपासण्या व शस्त्रक्रिया मानद व्हिजीटींग कन्सलटंन्ट डॉक्टरांमार्फत केल्या जात असत. नेत्र विभाग श्री साईनाथ रुग्णालयामध्ये स्थलांतरीत केल्यानंतर सदर मानद व्हिजीटींग कन्सलटंन्ट श्री साईनाथ रुग्णालयामध्ये येणे बंद झाले आहे. डॉ.अजय एम. ताम्मेवार, औरंगाबाद (Vitreo-Retinal Surgeon) व डॉ.प्राची पवार (MS Opthal, FICO, Diploma in Pediatric Opthl &

Strabismology) यांनी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सदर वैदयकिय सेवा सुरु करुन श्री साईबाबा हॉस्पिटलप्रमाणे दर आकारणी व इन्सेंन्टींव्ह देण्यास सुरुवात केल्यास पुर्वीप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मानद व्हिजीटींग कन्सलटंन्ट म्हणुन येणेसाठी अर्ज केला आहे.

नेत्र विभागामध्ये होणाऱ्या सर्वसाधारण तपासण्या व शस्त्रक्रियांव्यतीरीक्त सुपर स्पेशालीटी तपासण्या व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सुरु केल्यास रुग्णांना त्याचा फायदा होईल. रुग्णांना श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दरांनुसार दर आकारणी करुन सुपर स्पेशालीस्ट मानद व्हिजींटींग कन्सलटंन्ट डॉक्टरांना त्यामधील काही रक्कम इन्सेंन्टीव्ह म्हणुन देता येईल. संस्थान कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांच्या वैदयकिय उपचारांवर श्री साईबाबा हॉस्पिटल प्रमाणे इन्सेंन्टीव्ह दयावा लागणार नाही. त्यास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये डॉ.अजय ताम्मेवार (Vitreo-Retinal Surgeon) व डॉ.प्राची पवार (Ophthalmologist) यांना सुपर स्पेशालीस्ट मानद साप्ताहीक व्हिजींटींग कन्सलटंन्ट म्हणुन घेण्यास व त्यांनी केलेल्या सुपर स्पेशालीटी वैदयकिय उपारांसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लागु असलेले दर लागु करुन त्यातील काही भाग इन्सेंन्टीव्ह म्हणुन देण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्य.स चे सभेत सविनय सादर.

**निर्णय क्र.१९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये डॉ.अजय ताम्मेवार (Vitreo-Retinal Surgeon) व डॉ.प्राची पवार (Ophthalmologist) यांना सुपर स्पेशालीस्ट मानद साप्ताहीक व्हिजींटींग कन्सलटंन्ट म्हणुन घेण्यास व त्यांनी केलेल्या सुपर स्पेशालीटी वैदयकिय उपचारांसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लागु असलेले दर लागु करुन त्यातील काही भाग इन्सेंन्टीव्ह म्हणुन देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **व्हिजीटींग बालरोगतज्ञ म्हणून सेवा घेणे बाबत**

**प्रस्ताव-** सध्या श्री साईनाथ रुग्णालयात डॉ. रचना साबळे, वैद्यकीय अधिकारी (बालरोग) हया एकटयाच वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ञ) आहे. तसेच डॉ. गुळवे, आर.एम.ओ. (बालरोग विभाग) यांनी दिनांक ०७/१२/२०११ पासून पदाचा राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयात बाल रुग्णांची वाढती संख्या पाहता, रुग्णालयात बालरोग, वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता आहे

वरील विषयास अनुसरुन, संदर्भीय अर्जान्वये डॉ. रविंद्र दिघे, बालरोग तज्ञ यांनी वैद्यकीय संचालक, यांचेशी केलेल्या चर्चेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयात व्हीजिटींग बालरोग तज्ञ म्हणून व्हीजिट देणेस परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तसेच सदर अर्जात डॉ. रविंद्र दिघे, यांनी व्हिजिटींग चार्जेस रु.५००/- प्रति रुग्ण असा राहील असे नमुद केलेले आहे.

तसेच डॉ. विजय म्हस्के, (बालरोगतज्ञ), राहाता यांनी रु.३००/- प्रतिव्हिजिट फि वर येण्याचे मान्य केले आहे.

याशिवाय डॉ. सुनिल साबळे, (बालरोगतज्ञ) शिरडी यांना वरीलप्रमाणे व्हीजिंटींग बालरोगतज्ञ म्हणून श्री साईनाथ रुग्णालयास व्हिजिट बाबत फोनवर संपर्क साधला असता, त्यांनी याबाबत असमर्थता दर्शवीलेली आहे.

वरील संदर्भीय अर्जावर वैद्यकीय संचालक, यांनी डॉ. रविंद्र दिघे व डॉ. विजय म्हस्के यांना श्री साईनाथ रुग्णालयातील बालरोग तज्ञ यांच्या रजेच्या दिवशी होणा-या Emergency Ceasarean (LSCS babies) केसेसकरीता व्हीजिटींग बालरोग वैद्यकिय अधिकारी म्हणून बोलावता येईल असे नमुद केले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील बालरोग तज्ञ रजेवर, गैरहजर असतात, अशा वेळेसच रुग्णालयातील LSCS babies साठी बालरोगतज्ञाची गरज भासणार आहे.

याकरीता डॉ. रविंद्र दिघे किंवा डॉ. विजय म्हस्के (बालरोगतज्ञ) यांची श्री साईनाथ रुग्णालयातील LSCS babies साठी व्हीजिटींग वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल व त्यासाठी त्यांना रु.३००/- प्रति व्हिजिट फी म्हणून देता येईल असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील बालरोगतज्ञ यांच्या रजेच्या कालावधीत रुग्णालयातील LSCS babies केसेससाठी बाहेरील बालरोगतज्ञ डॉ. रविंद्र दिघे, किंवा डॉ. विजय म्हस्के, यांना बोलविणेस व त्यांना प्रती व्हिजिट रु.३००/- याप्रमाणे व्हिजिटींग फी देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील बालरोगतज्ञ यांच्या रजेच्या कालावधीत रुग्णालयातील LSCS babies केसेससाठी बाहेरील बालरोगतज्ञ डॉ. रविंद्र दिघे, किंवा डॉ. विजय म्हस्के, यांना बोलविणेस व त्यांना प्रती व्हिजिट रु.३००/- याप्रमाणे व्हिजिटींग फी देणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी, संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाचे विविध विभागांसाठी दर रविवारी बाहेरील डॉक्टरांना व्हिजिटींग तज्ञ म्हणून आमंत्रित करणेबाबत,वैद्यकीय संचालक यांनी प्रयत्न करावेत असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **Voluven ५००ml I/V खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात ऑपरेशन नंतर उपचार करणेकामी अत्यवस्थ रुग्णांना उपरोक्त Voluven Plasma Suppliment म्हणून दयावे लागते. यासाठी श्री साईबाबा रुग्णालयाचे सर्व शस्त्रक्रिया विभागाकडून एकुण १७०० नगांची मागणी आली होती. त्यासाठी वार्षिक औषधे खरेदीमध्ये जाहिरातीस अनुसरुन एकुण ६ निविदाधारक / उत्पादक कंपन्याचे दर प्राप्त झाले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item / Drugs | Make | Brand Name | Packing | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 166 | INJ HYDROXYETHYL STARCH 6.0G + SODIUM CHLORDIE 0.9G 500ML | CLARIS / FRESENIUS / B.BRAUN | | | | | |
| | Kalpak Marketing Pvt. Ltd., Pune | NIRLIFE | NIRHES | 6% 500ML | 1700 | 166.3200 | 282744.00 |
| | Chetna Enterprises, Ahmednagar | NIRLIFE | NIRHES | 6% 500ML | 1700 | 204.7500 | 348075.00 |
| | Vishal Agencies, Ahmednagar. | FRESENIUS KABI | HAES STERILE 6% | 6% 500ML | 1700 | 250.0000 | 425000.00 |
| | | FRESENIUS KABI | VOLUVEN | 6% 500ML | 1700 | 308.7000 | 524790.00 |
| | B. Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | B.BRAUN | VENO FUNDIN | 6% 500ML | 1700 | 321.0480 | 545781.60 |
| | Surya Surgi Pharma, Nashik | FRESENIUS KABI | VOLUVEN | 6% 500ML | 1700 | 353.9250 | 601672.50 |
| | B. Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | B.BRAUN | TETRASPAN | 6% 500ML | 1700 | 476.0000 | 809200.00 |

उपरोक्तपैकी Fresenius Kabi या नामांकित कंपनीचे मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांचेकडून Haestarile ६% हे ब्रॅन्डनेम असलेले प्रती नग रु.२५०/- प्रमाणे घेण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांना वार्षिक खरेदीमध्ये इकडील पत्र क्रमांक ३२२४ दि.२४/०९/२०११ अन्वये १७०० बाटल्यांचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु न्युरो ऑपरेशन थिएटरमधील भुलतज्ञ डॉ. खोचीकर यांनी Haestarile ६% हे अत्यवस्थ व किडनी प्रॉब्लेम असलेले रुग्णांसाठी दिलेस त्याचे शरीरातून Excreation (युरीनव्दारे शरीराच्या बाहेर टाकण्यास) होताना रुग्णास त्रास होतो, त्यामुळे सर्व १७०० बाटल्या Haestarile ६% घेणेऐवजी ५०० नग Voluven घेतल्यास किडणीचे आजार असलेल्या रुग्णास वापरता येईल व त्यामुळे त्याचे शरीरातून Excreation (युरीनव्दारे शरीराच्या बाहेर टाकण्यास) होताना रुग्णास त्रास होणार नाही.

मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांनी वार्षिक खरेदीमधील १७०० बाटल्यापैकी ७०० बाटल्यांचा पुरवठा केलेला आहे, तर उर्वरीत १००० बाटल्यांचा पुरवठा होणे आहे. त्यापैकी Fresenius Kabi या कंपनीचे Voluven I/V आहे, मे. विशाल एजन्सी, अहमदनगर व Fresenius Kabi या उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी यांनी समक्ष दि.०२/०९/२०११ रोजीचे वैद्यकिय समितीचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीनंतर एका Voluven I/V च्या बाटलीचे दर प्रती नग रु. ३०८.७० इतके दिलेले आहे. त्याच कंपनीचे सलाईनकरीता (Voluven) मे. सुर्या सर्जि फार्मा, नाशिक यांनी चर्चा / वाटाघाटीचे वेळेस रु. ३५३.९२५० इतके दर दिलेले आहेत. म्हणजेच मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांचे दर हे मे. सुर्या सर्जि फार्मा, नाशिक यांचेपेक्षा कमी आहेत. सध्या आपणास ५०० बाटल्या Voluven खरेदी करावयाच्या असून सदर Voluven हे Haestarile ६% चे १७०० मंजुर बाटल्यांचा ५०० नगांचा पुरवठा आदेश कमी करुन ५०० बाटल्या Voluven खरेदी करता येईल व याकामी रु.२९,३५०/- (रु.३०८.७० - रु.२५० = रु. ५८.७० x ५०० नग = २९३५०/-) इतका जास्त खर्च येईल.

तरी Haestarile ६% १७०० पैकी ५०० बाटल्यांची संख्या कमी करुन त्याऐवजी ५०० बाटल्या Voluven खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या जास्तीच्या खर्चास रु.२९,३५०/- चे जादा खर्चास मान्यता घेण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, Haestarile ६% १७०० पैकी ५०० बाटल्यांची संख्या कमी करुन त्याऐवजी ५०० बाटल्या Voluven खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये २९,३५०/- चे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७ CVTS ओ.टी. I.A.B.P. Balloon खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये कार्डीयाक शस्त्रक्रिया करतेवेळी जर एखादया रुग्णाची तब्बेत सिरीयस होऊन हृदय व फुफुसाचे काम अनियंत्रित झालेस अशा वेळी तातडीने IABP बलून वापरावा लागतो. सदरचा बलून हा सर्वच रुग्णांना लागत नाही. परंतु एखादया रुग्णास त्रास झाल्यास वापरावा लागतो. मागील दोन वर्षाचा खप बघता वर्षातून सरासरी ३ ते ४ रुग्णास वापरावा लागतो. यापुर्वी आपण असे बलून तातडीचे वापरासाठी खरेदी करुन ठेवले होते. परंतु त्याची मुदतबाहयता जवळ आली होती व तोपर्यंत त्याचा खप होणार नाही, असा अंदाज होता, त्यामुळे ते पुरवठा धारकास परत करण्यात आलेले आहेत. कारण एका बलुनची किंमत रु.३५,०००/- पर्यंत असते.

तसेच नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी नविन Intra Aortic Balloon Pump System - ०१ नग M/s. Emergent Medi-Tech (I) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून मागील वर्षी खरेदी करण्यात आले होते. त्यावेळेस त्यांनी चर्चा / वाटाघाटीचे वेळेस चार बलून (No.३४=२, No.४०=२) मशिन सोबत मोफत दिले होते व त्याचाच वापर आतापर्यंत करत होतो. त्यामुळे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने वार्षिक मागणी केलेले ५ बलून खरेदी करण्यात आले नव्हते. परंतु सध्या सदर विभागास सदर बलूनची आवश्यकता असल्याने त्यांनी डी.पी.क्र. २४३८ दि.२९/१२/२०११ अन्वये १० नग I.A.B.P. Balloon ची मागणी केलेली आहे. त्यानुसार त्यांना ते खरेदी करुन दयावे लागणार आहेत, त्यासाठी वार्षिक औषधे खरेदीमध्ये दोन निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Make | Brand Name | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | I.A.B.P. BALLOON 34CC = 2 NOS. , 40CC = 3 NOS. | DATA SCOPE / ARROW / ZEX ZEON MEDICAL INC | | 5 | | |
| | Rahul Healthcare Corporation, Pune | INTAS MEDI DEVICES | ULTRA-35CC/40CC | 5 | 33412.50 | 167062.50 |
| | Bioscience Medical Devices India Pvt. Ltd., Thane | MAQUET | DATASCOPE | 5 | 43436.25 | 217181.25 |

वरीलपैकी कोणता बलुन त्यांना तांत्रिक दृष्टया वापरणेस योग्य राहील याबाबत डॉ. विदयुतकुमार यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यांनी अ.नं. १ यांचे बलून घेण्याची शिफारस केलेली असून सध्या त्यांचेकडून तुर्तास Trial साठी बलून घ्यावे असे सुचविले आहे. त्यामुळे तुर्तास दोन बलून घेऊन त्याचा रिझल्ट चांगला वाटल्यास पुढील ३ किंवा त्यांचे मागणीनुसार १० नग जसे लागतील तसे खरेदी करता येतील.

तरी तुर्तास दोन बलुन M/s. Rahul Healthcare Corporation, Pune यांचेकडून मा. व्यवस्थापन समिती सभेचे मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या एकुण खर्च रु. ६६,८२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तुर्तास दोन बलुन M/s. Rahul Healthcare Corporation, Pune यांचेकडून मा. व्यवस्थापन समिती सभेचे मंजुर दराने खरेदी करुन त्याचा अनुभव समाधानकारक वाटल्यास पूढील दहा नग जसजसे लागतील त्याप्रमाणे खरेदी करण्यात यावी व याकामी येणाऱ्या एकुण खर्च रु. ६६,८२५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८ Fully Automated Clinical Bio-Chemistry Analyzer मशिनसाठी लागणारे किटस् खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात दैनंदिन तपासण्या करणेकामी त्यांनी उपरोक्त मशिनची मागणी केली होती. त्यानुसार सदरचे मशिन विहित पध्दतीने दि.२८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय क्र. ५९८ अन्वये मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून १ नग मशिन रक्कम रु.११,०६,७००/- इतक्या रक्कमेत घेण्याचे ठरले होते. त्यानुसार मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांना इकडील पत्र क्र. २७६५ दि.०९/०९/२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार कंपनीने मशिनचा पुरवठा करुन दि.२१/१२/२०११ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात बसवून कार्यान्वित करुन दिलेले आहे. सदर मशिन सध्या व्यवस्थित चालु आहे.

सदर मशिनसाठी श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाने त्यांचे डी. पी. क्र. १४८७८ दि. २२/१२/२०११ चे पत्रान्वये खालील किट्सची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Product Name | Qty. |
|---|---|---|
| 1 | XL - Wash | 24 Kit |
| 2 | Sample Cup for EM 200 | 2 Pack |
| 3 | ISE Reagent PAck | 6 Kit |

रक्त लघवीच्या तपासण्या करणेसाठी इतर कंपनीचे केमीकल्स लागतात ती आपणाकडे असून वापरत आहेत, परंतु वरील किट हे starting kit असून ते Transasia या कंपनीचेच घ्यावे लागणार आहे. कारण इतर कंपनीचे किट चालत नाही. मशिन डिसेंबर २०११ मध्ये प्राप्त झालेले असल्याने पुढील वर्षाचे वार्षिक खरेदीमध्ये सदरील किट खरेदी करता येतील, परंतु तुर्तास ६ महिने पुरु शकेल इतक्या किट्स खरेदी कराव्या लागणार आहेत. याकामी मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि. ०४/०१/२०१२ चे पत्रान्वये दर दिलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Product Name | Pack Size | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | XL - Wash | 4 x 100 ml | 24 Kit | 303.00 | 7272.00 |
| 2 | Sample Cup for EM 200 | 500 nos. | 2 Pack | 1500.00 | 3000.00 |
| 3 | ISE Reagent PAck | 400 ml | 6 Kit | 19358.00 | 116148.00 |
| | | | | **Total in Rs.** | **1,26,420.00** |

त्यानुसार वरीलप्रमाणे किट खरेदीकामी एकुण रु.१,२६,४२०/- इतका खर्च येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे किट्स मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,२६,४२०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Fully Automated Clinical Bio-Chemistry Analyzer मशिनसाठी लागणारे किटस् मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,२६,४२०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं २९** **श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागासाठी उपकरणे खरेदीकामी फेर कोटेशन्स मागविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागाने दि.०३/११/२०१०, २८/०२/२०११ व ०१/०३/२०११ चे मागणी पत्रान्वये खालील उपकरणांची मागणी केलेली आहे. सदर उपकरणांसाठी Terumo Penpol कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.एन.पी.एजन्सी, मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविले असता त्यांनी दि.२९/०६/२०११ चे ई-मेल पत्रान्वये खालील प्रमाणे दर दिलेले होते.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | App. Total Amt. in Rs. | Remark Buyback offer |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Deep Freezer -40$^0$c - 300 Bags Capacity with Compartment | 1 | 5,00,000.00 | 5,00,000.00 | Yes |
| 2 | Dielectric Tube Sealer | | | | New Demand |
| A | Hand Hold - Buttery Operated | 1 | 1,75,000.00 | 1,75,000.00 | |
| B | Bench Top | 3 | 1,50,000.00 | 4,50,000.00 | |
| 3 | Donar Coach - (Triple Motor) | 1 | 1,75,000.00 | 1,75,000.00 | New Demand |
| 4 | Blood Collection Monitor with Shaker | 2 | 1,50,000.00 | 3,00,000.00 | New Demand |
| | | | **App. Total Amt. in Rs.** | **16,00,000.00** | |

उपरोक्त प्रमाणे रक्तपेढी उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.१६,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेत उपरोक्त प्रमाणे रक्तपेढी उपकरणे खरेदीकामी याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१६,००,०००/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली होती.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.१५/०९/२०११ ते ३०/०९/२०११ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.०३/१०/२०११ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २१ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.२९१८ दि.१६/०९/२०११ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०४ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली होती अशा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | ACE Medical Technology, Aurangabad | 03/10/2011 |
| 2 | Allwin Lifecare, Mumbai. | 03/10/2011 |

| | | |
|---|---|---|
| 3 | Hari Bharath Equipments Pvt Ltd., Mumbai | 03/10/2011 |
| 4 | Pankaj Pharma, Pune | 03/10/2011 |
| 5 | Span Healthcare Pvt. Ltd., Banglore | 03/10/2011 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा दि.१९/११/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून आवश्यक तेथे रक्तपेढी विभागातील वापरणाऱ्या डॉक्टरांचा (BTO) सल्ला घेण्यात आला आलेला आहे त्यामध्ये त्यांनी Donar Coach - (Triple Motor) करीता त्यांनी Make - HLL / Model - Hicare DX ची शिफारस केलेली आहे.

तसेच Dielectric Tube Sealer व Blood Collection Monitor with Shaker करीता रक्तपेढी विभागातील वापरणाऱ्या डॉक्टरांनी Terumo Penpol Ltd, Mumbai व Remi Sales & Engg. Ltd., Mumbai या नामांकित कंपनीचे घेण्याची शिफारस केलेली आहे. तर Deep Freezer -४००c करीता फक्त एकच निविदा प्राप्त झालेली असून त्यांनी दिलेले Deep Freezer हे नामांकित कंपनीचे नसून सदर Deep Freezer चा आपणास कोणताही अनुभव नाही.

त्यामुळे Deep Freezer -४००c, Dielectric Tube Sealer व Blood Collection Monitor with Shaker करीता Terumo Penpol Ltd, Mumbai व Remi Sales & Engg. Ltd., Mumbai या नामांकित कंपनीकडून फेर कोटेशन मागवावे लागणार आहे.

तेंव्हा उपरोक्त Deep Freezer -४००c, Dielectric Tube Sealer व Blood Collection Monitor with Shaker खरेदीकामी प्राप्त निविदाधारकाच्या निविदा विचारात न धरता Terumo Penpol Ltd, Mumbai व Remi Sales & Engg. Ltd., Mumbai या नामांकित कंपनीकडून फेर कोटेशन मागविण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील रक्तपेढी विभागासाठी Deep Freezer -४००c, Dielectric Tube Sealer व Blood Collection Monitor with Shaker खरेदीकामी प्राप्त निविदाधारकाच्या निविदा विचारात न धरता Terumo Penpol Ltd, Mumbai व Remi Sales & Engg. Ltd., Mumbai या नामांकित कंपनीकडून फेर कोटेशन मागविण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडे फिजिशियन व आर.एम.ओ या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी सी एम ओ व आर एम ओ पदे भरणेकामी दि. १७/०९/२०११ दै. लोकमत, औरंगाबाद व दि. २०/०९/२०११ रोजीचे सकाळ जॉब्स् या वर्तमान पत्रांमध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन दि. २९/०९/२०११ रोजी वॉक इन इंटरव्ह्यूव घेण्यात आलेल्या आहेत.

तसेच दि. १७/०८/२०११ रोजी महाराष्ट्र टाईम्स व दै. लोकमत या वर्तमान पत्रांमध्ये वैद्यकिय अधिकारी ही पदे भरणेकामी देण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये फिजिशियनच्या दोन पदांचा समावेश करण्यात आलेला होता. सदर जाहिरातीस अनुसरुन घेण्यात आलेल्या मुलाखतीसाठी एकही उमेदवार उपस्थित नव्हते. सदर मुलाखतीनंतर दि. १४/०९/२०११ रोजी हॉस्पीटलकडे फिजिशियन या पदासाठी डॉ. गगन शर्मा यांचा अर्ज प्राप्त झाल्याने त्यांना दि. २९/०९/२०११ रोजी मुलाखती बोलवून त्यांची मुलाखत घेऊन त्यांची फिजिशियन या पदासाठी निवड करण्यात आलेली आहेत.

उपरोक्तप्रमाणे दि. २९/०९/२०११ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीस अनुसरुन दि. ३०/०९/२०११ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये उमेदवारांना देण्यात आलेल्या नेमणूक आदेशांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश क्र. | दिलेले पदनाम व एकत्रित मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. गगन सुरिंद्रकुमार शर्मा, लुधियाना | एम बी बी एस - २००१ एम.डी. (जनरल मेडिसीन) -२०१० | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच / एचआर/ ३७२९/२०११ दि. २०/१०/२०११ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक रु. ३५,०००/- फिक्स पे+प्रचलीत पध्दतीने इन्सेंटीव देऊन फिजिशियन या पदावर नेमणूक |
| ०२ | डॉ. अभिमन्यू शंकराराव कडू मु. पो. पाथरे, ता. राहाता | एम.बी.बी.एस.- २०१० | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच / एचआर/ ३७१७/२०११ दि. ०१/१०/२०११ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक रु. २७,०००/- फिक्स पे-वर आर एम ओ या पदावर नेमणूक |

उपरोक्तप्रमाणे मुलाखती घेण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले प्रमाणे नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.२०० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकडे फिजिशियन व आर.एम.ओ या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१ श्री धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजिस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/१०/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७८२ नुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता ऑडिओलॉजी व इतर आवश्यक पदे वर्तमान पत्रांत जाहिरात देऊन वॉक इन इंटरव्ह्यूवव्दारे भरणेकामी मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार दि. ०९/११/२०१० रोजीचे दै. सामना व दै. सकाळ या वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली व दि. २५/११/२०१० रोजी उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सदर मुलाखतीमधून श्री धनाजी जगन्नाथ बेडके यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे ऑडिओलॉजिस्ट या पदावर निवड करण्यात आली व त्यांना जा. नं. एसएसएस/सएसबीएच/एचआर/५३२३/२०१० दि. ०४/१२/२०१० अन्वये सुधारित वेतनबॅन्ड रु. ९३००-३४८०० मध्ये मुळ वेतन रु. ९३०० + ग्रेड वेतन रु. ४२०० व अनुज्ञेय भत्ते देऊन एक वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणूक करण्यात आलेली आहे. ते दि. १५/०१/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांनी परिवीक्षाधीन कालावधीमध्ये ३१ रजा-सुट्या घेतलेल्या असल्याने त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि. १४/०२/२०१२ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री बेडके यांना रुग्णालयाचे सेवेमध्ये एक वर्ष पूर्ण झालेले असल्याने वैद्यकिय संचालक यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. च्श्री धनाजी जगन्नाथ बेडके यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असून ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. त्यांना नियमाप्रमाणे संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही.छ

उपरोक्तप्रमाणे वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता श्री धनाजी जगन्नाथ बेडके, यांना दि. १५/०२/२०१२ पासून संस्थान सेवेत कायम करणेबाबत विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.२०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता श्री धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजिस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांना दि. १५/०२/२०१२ पासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२ मे.लॅब इंडिया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.,नवी मुंबई यांचा ENT Operating Microscope खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे इ.एन.टी. शस्त्रक्रिया विभागात दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी लागणारे ENT Operating Microscope खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र. ८९० अन्वये अंदाजे एकुण रक्कम रु. ३३,९१,२५६/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि. ३१/०१/२०११ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन खालील दोन कंपन्याचे निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

१. Carl Zeiss India (Bangalore) Pvt.Ltd., Mumbai
२. Lab india Instrument Pvt. Ltd., Thane

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या निविदा दि. २६/०३/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत उघडण्यात आल्या होत्या, तर दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेत Commercial बाबींच्या निविदा समक्ष उघडून चर्चा / वाटाघाटी होऊन सदरहू मशिनरी महागड्या असल्यामुळे किंमतीत अजून सूट मिळणेकामी वैद्यकिय संचालक व स्थानिक विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर यांनी पुरवठाधारकांना पुन्हा समक्ष बोलवून सूट मिळणेकामी प्रयत्न करावा असे ठरले होते. त्यानुसार पुरवठा धारकांना दि.२५/०८/२०११ रोजीचे वैद्यकिय समिती सभेपुढे बोलविण्यात येऊन पुन्हा चर्चा / वाटाघाटी करण्यात येऊन मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांनी निविदेत भरलेल्या Leica कंपनीच्या Model M३२०F१२ यासाठी एकुण रु.२३,४५,८३०.१४ इतक्या रक्कमेत घेऊन कार्यादेश देण्यास मान्यता मिळालेली होती, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per Unit | | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **ENT Operating Microscope** | 1 | | **23738 EURO** | **1947847.68** |
| | Make – Leica, Germany | | 1 Euro=App. Rs.64.00 | 1519232.00 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Model - M320F12 | | | | |
| | Consisting of : | | Custom Duty @24% | 364615.68 | |
| | 1 - M320 Optics Car. inc. Swing arm inclined | | UPS & Monitor 29" - 1000 Euro But Payment in INR | 64000.00 | |
| | 1 - F12 Floor Stand for M320 | | | 1947847.68 | |
| | 1 - M320 Handles lateral set (Pair) | | | | |
| | 1 - Straight binocular tube | | | | |
| | 2 - Eyepiece f. spect.w's 12.5x | | | | |
| | 1 - Objective f=250mm man foc. | | | | |
| | 1 - Objective achromat, f = 400 mm | | | | |
| | 2 - Drive knob cover, binoc. Tube T | | | | |
| | 1 - Dust Cover M300 | | | | |
| | HDMI Video & Photo Camera | | | | |
| | 1 - M320 HD Video & Photo Camera | | | | |
| | 1 - HDMI Cable 10m | | | | |
| 2 | Optional Items | | | 5014.90 EURO | 397982.46 |
| | 1 - $0^{0}$ to $180^{0}$ Binocular | | 1 Euro=App. Rs.64.00 | 320953.60 | |
| | 1 - Eyepiece 10x | | Custom Duty @24% | 77028.86 | |
| | | | Total Amt. in Optional Accessories | 397982.46 | |
| | | | **Total Landed Cost CIF Mumbai - Shirdi** | | **2345830.14** |
| | Warranty | | 1 Year | | |
| | AMC | | 2% of the total value of equipment + 10.5% Service Tax Extra. | | |
| | CMC | | 4% of the total value of equipment excluding any optical / Glass components + 10.5% Service Tax Extra. | | |
| | Payment | | **Through L/C - 28752.90 Euro** | | **1840185.60** |
| | | | **Custom Duty - in INR** | | **441644.54** |
| | | | **UPS & Monitor Payment in INR** | | **64000.00** |
| | | | **Total Landed Cost CIF Mumbai - Shirdi** | | **2345830.14** |

त्यानुसार मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांना इकडील पत्र क्र. ३२२८ दि.२६/०९/२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई हे भारतातील Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany या कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत व त्यांनी संस्थानचे जाहिरातीस अनुसरुन निविदा भरलेली होती. त्यामुळे पुरवठा आदेश देखील मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांना देण्यात आला होता. मा. व्यवस्थापन समिती सभेत ठरलेनुसार मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांची principle कंपनी Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany यांना पेमेंट हे Through L/C करावयाचे होते व कस्टम डयुटीमध्ये रु.७७,०२९/- सुट मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करावयाचा होता.

त्यानुसार मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांचेकडून L/C पेमेंटसाठी लागणारे Proforma Invoice ची मागणी केली असता त्यांनी त्यांचे दि. ०९/११/२०११ चे पत्रान्वये Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany कंपनीने त्यांचे भारतातील मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई या अधिकृत विक्रेत्याकडून एजन्सी काढून घेतलेली असून त्यांनी आता भारतामध्ये थेट विक्री सेवा चालु केली आहे. तेंव्हा मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany Germany यांचे नावाने दयावा अशी मागणी केलेली आहे, विक्री नंतरची सेवा देखील हे Leica हेच देणार आहे. सदर आदेशाच्या रक्कमेत कुठलाही बदल होणार नाही. तेंव्हा खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

०१) मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany यांना देणे. **किंवा-**

०२) निविदेतील क्रमांक दोनचे दर रु.४३,७०,६९३/- असलेल्या कंपनीकडून सदर मायक्रोस्कोप खरेदी करणे. **किंवा-**

०३) संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करुन याकामी पुन्हा फेर निविदा मागवणे.

**निर्णय क्र.२०२ यावर सविस्तर चर्चा होऊन मे. लॅबइंडीया इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., नवी मुंबई यांचा ENT Operating Microscope पुरवठा आदेश रद्द करुन तो Leica Microsystem Vertrieb GmbH, Germany यांना त्याच अटी शर्तीवर व मंजूर दराने देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय न.३३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता Fumigation Machine खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि. १३/०१/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये प्रत्येकी एक नग Fumigation Machine ची मागणी केलेली आहे, तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर नं. १ या विभागाने दि. १३/०१/२०१२ रोजीच्या मागणी पत्रकान्वये दोन नग Fumigation Machine ची मागणी केलेली आहे. असे एकुण चार नगांची मागणी प्राप्त झालेली आहे. कारण न्युरो व आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटरमध्ये सदरचे मशिन त्यांचेकडे उपलब्ध नाही. ते सध्या दुसऱ्या विभागाकडून कामापुरते घेतात. तसेच श्री साईनाथ रुग्णालय सर्जिकल ओ.टी. मध्ये एकच मशिन आहे तेथे असलेल्या तीन ऑपरेशन थिएटर मिळून एकच मशिन आहे. त्यामुळे दोन शस्त्रक्रियेमध्ये निर्जंतुकीकरण करावयाचे झाल्यास अडचणी येतात.

सदरचे मशिन ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असते. उपरोक्त मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे. कालेलकर सर्जिकल इंडस्ट्रीज, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे दि.३०/०१/२०१२ रोजीचे फॅक्स पत्राअन्वये प्रती नग रु.१०,९३५/- इतके दर कळविले आहे. त्यांचे दरपत्रकानुसार एकुण ४ नगांसाठी अंदाजे रक्कम रु.४३,७४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी सदर Fumigation Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.४३,७४०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२०३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता Fumigation Machine कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४३.७४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३४** **संगणकासाठी अॅन्टी व्हायरस खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सर्व विभागात आवश्यकतेनुसार व मागणीनुसार संगणक संच पुरविण्यात आलेले आहे. सदर संगणकाकरिता कार्यादेशानुसार M/s.Sujata Computers Pvt., Ltd., Pune यांचे मार्फत विहित पध्दतीने Trend-Micro Anti-Virus Package (१०० युजरकरिता) चे नुतनीकरण करण्यात येऊन माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या अभिप्रायानुसार एक वर्षा करीता खरेदी करण्यात आलेले आहे.

परंतु, रूग्णालयातील Anti-Virus Software ची मुदत दि-२६ मार्च २०१२ रोजी संपुष्टात येत असल्याने आपणास नव्याने Anti-Virus Software खरेदी करावे किंवा कसे याबाबत माहीती तंत्रज्ञान विभाग यांचा संबधीत विषयावरती अभिप्राय घेणेत आलेला आहे. सदर प्रस्तावावर माहीती तंत्रज्ञान विभागाने Anti-Virus संस्थानचे प्रचलित पध्दती नुसार रूग्णालये विभाग यांचेमार्फत खरेदी करण्यात यावे असे मत दिलेले आहे.

सदर नुतनीकरण करणेकामी M/s.Sujata Computers Pvt., Ltd., Pune यांचेकडे ई-मेल द्वारे विचारणा केली असता त्यांनी एक वर्षासाठी १०० युजरचे नुतनीकरणे करणेकामी (for १ year @Rs:-४५०+१०.३०%service tax per user) व तीन वर्षासाठी १०० युजरचे नुतनीकरण करणेकामी (for ३ year @Rs:-९५०+१०.३०%service tax per user) खर्च अपेक्षीत असल्याचे कळविले आहे.

तरी, Trend Micro Anti-Virus Software Desktop (१०० युजर) चे नुतनीकरण तीन वर्षाकरीता विहीत पध्दतीने सिलबंद कोटेशन विविध पुरवठाधारकांकडून दुरध्वनीद्वारे मागवून खरेदी करणेस तसेच सदरकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील संगणकासाठी Trend Micro Anti-Virus Software Desktop (१०० युजर) चे नुतनीकरण तीन वर्षाकरीता विहीत पध्दतीने सिलबंद कोटेशन विविध पुरवठाधारकांकडून दुरध्वनीद्वारे मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३५** **संस्थान कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय बीलाचा परतावा आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु.१०,०००/- चे पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे. त्यांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे-

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | स्वतः व आई | डायबेटीज | श्री साईनाथ रुग्णालय | ४५७८.०० | ४५७८.०० |
| २ | श्री. नागरे प्रभाकर विश्वनाथ | वडील | लघवीचा त्रास | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७००.०० | ७००.०० |
| ३ अ | डॉ.एन.एस.म्हस्के | स्वतः | सांधेदुखी | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ४११५.०० | ४११५.०० |
| | | पत्नी | सांधेदुखी व मधूमेह | | | |
| ३ ब | डॉ.एन.एस.म्हस्के | स्वतः | सांधेदुखी | श्री साईबाबा रुग्णालय, व प्रवरा हॉस्पिटल, लोणी | ४८३१.०० | ४८३१.०० |
| | | पत्नी | सांधेदुखी व मधूमेह | | | |
| ४ | श्री अधिक महादेव इंगवले | स्वत: | Oral & Oropharyngeal Sub Mucosal Fibrosis | जहांगीर हॉस्पिटल, पुणे | २५०६४.०० | २३६०४.०० |
| ५ | श्रीमती वैशाली अभिजित काळे | सासू | डायबेटीज | श्री साईबाबा हॉस्पिटल | २६११.०० | २६०५.०० |
| ६ | श्रीमती सुयोगा ईश्वरदास साळवे | स्वतः | | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३३७.०० | १०१२.०० |
| ७ | श्री संजय नामदेव कोटकर | स्वतः | Hepatitis | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३४२२८.०० | ३४२२८.०० |
| ८ | सौ. भोसले उषा रावसाहेब | आई | ब्लडप्रेशर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २२१४८.०० | २२१४८.०० |
| ९ | श्रीमती अरगडे सुरेखा सुरेश | आई व वडील | सांधेदुखी, दमा व ब्लड प्रेशर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ९६४.०० | ८३१.०० |
| १० | श्रीमती कांचन बाळासाहेब जाधव | स्वतः, आई व मुलगी | Hypersentitivity with Hypothyrodism | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ४३३३.०० | ३५२६.०० |
| ११ | श्री. डिसोजा बासिल ॲन्थनी | स्वतः | घशाचा कॅन्सर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २५०१६५.०० | २२८४८६.०० |
| १२ | श्री. रविंद्र बाबू गायकवाड | पत्नी | Gastroscopy व Colonoscopy | रुबी हॉल क्लिनिक,पुणे | १३०६९.०० | १२७३५.०० |
| १३ | श्री. गावडे संजय बबनराव | स्वतः | Hypertension | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | १०४८.०० | १०४८.०० |
| १४ अ | श्री. संजय फिलिप पाळंदे | वडील | Hypertension | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २०७.०० | २०७.०० |
| १४ ब | श्री. संजय फिलिप पाळंदे | वडील | CA Prostate | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | ४४२०.०० | ४४२०.०० |
| १५ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | स्वतः व मुलगी | Hypothyrodism | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | २७७७.०० | २७७७.०० |
| १६ | श्री. मधुकर भिवाजी डोखे | मुलगी | Idiopathic Isosexual Central Precocious Puberty | के.ई.एम हॉस्पिटल, पुणे | २७६९४.०० | २७६९४.०० |
| १७ | श्री. गलांडे उल्हास बाळकृष्ण | मुलगा | Hyper Tension & Diabetis | श्री साईनाथ रुग्णालय, | १३२६.०० | १३२६.०० |
| १८ | सौ. सुर्वे वैशाली वसंतराव | आई | डायबेटीज व ब्लडप्रेशर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ५१४९.०० | ५१४९.०० |
| १९ | श्रीमती मिरजकर | सासरे | Profuse | सावित्री हॉस्पिटल, | ३९९५७.०० | २८७८८.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जहाँआरा शहाबुद्दीन | | Haematuria in Shock | लोणंद | | |
| २० | डॉ. बाणेश छगणराव गायकवाड | स्वत: | Hepatitis B | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३३१७०.०० | ३३१७०.०० |
| २१ | श्री. ज्ञानेश्वर दादाभाउ हर्षे | पत्नी | G३A२POLO with BDH | श्री साईनाथ रुग्णालय, | १६८२५.०० | १६८२५.०० |
| २२ | श्री. ज्ञानेश्वर सुखदेव रोहमारे | मुलगा | Head Injury | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १३७८५६.०० | १३५७६६.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **६३८५७२.००** | **६००५६९.००** |

**निर्णय क्र.२०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कर्मचाऱ्यांची जादा वैद्यकीय बिले आदा करणेस मान्यता देण्यात आली. असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३६ दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेकामी दि. २८/०९/२०११ रोजीचे टाईम्स ऑफ इंडिया व दि. ०८/१२/२०११ रोजीचे इंडियन एक्सप्रेस (पूणे) या वर्तमान पत्रामध्ये तसेच संस्थान वेतसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन, दि. २५/१२/२०११ रोजी उमेदवारांच्या मुलाखती मा. वैद्यकिय उपसमितीचे सदस्यांसमोर घेण्यात आलेल्या आहेत. या मुलाखतीमधून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना दि. ३१/१२/२०११ रोजीचे टिपणीनुसार संबंधीत पदांवर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश क्र. | दिलेले पदनाम व एकत्रित मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. विकास रामचंद्र रत्नपारखे, औरंगाबाद | एम.डी. (मेडिसीन) १९९० | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर / ५४६९/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० + इतर अनुज्ञेय भत्ते व रु. ४०,०००/- फिक्स इन्सेंटीव देऊन फिजिशियन या पदावर नेमणूक करुन प्रत्यक्ष कामकाज श्री साईनाथ रुग्णालयाकडे करणेबाबत आदेश देण्यात आलेला आहे. |
| ०२ | डॉ. विनोद वसंतराव चिंदे, लातूर | एम.एस. (जन. सर्जन)-२००८, एमसीएच (सीव्हीटीएस)- २०११ | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर / ५४६४/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक रु. ३५,०००/- फिक्स पे-वर क्लिनीकल असिस्टंट (सीव्हीटीएस) या पदावर नेमणूक. |
| ०३ | डॉ. उमेश रविंद्र व्यवहारे, मुंबई | एम बी बी एस-२००४, एम डी (रेडिओ)- २०१० | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर/ ५४६७/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक रु. ३५,०००/- फिक्स पे +इन्सेंटीव्हवर सिनिअर रेडिओलॉजिस्ट या पदावर नेमणूक. |
| ०४ | डॉ. महेद्र केदराज नेमनाथ, मालेगाव | एम बी बी एस-२००४, एम एस (Obst & Gynac)-२०१० | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर/ ५४६८/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक रु. ३५,०००/- फिक्स पे-वर वैद्यकिय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ ) या पदावर नेमणूक. |
| ०५ | डॉ. इंद्रज्योतकौर रणजितसिंग अहुजा, श्रीरामपूर | एम बी बी एस-२००८, एम एस (Opthal)- २०११ | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर/ ५४६५/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक रु. ३५,०००/- फिक्स पे-वर मेडिकल ऑफिसर (नेत्र तज्ञ ) पदावर नेमणूक. |
| ०६ | डॉ. अशोक मेघराज गरुटे लोणी | एम बी बी एस-१९८७, डी ए-१९९६ | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच /एचआर/ ५४६६/२०१२ दि. १७/०१/२०१२ | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक रु. ३२,०००/- फिक्स पे-वर कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ या पदावर नेमणूक. |

तरी उपरोक्तप्रमाणे मुलाखती घेण्यात आलेल्या उमेदवारांच्या त्यांचे नावासमोर दर्शविलेले प्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या असून, देण्यात आलेल्या नेमणुकास कार्योत्तर मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.२०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३७ Smart Control Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री.चव्हाण शिवाजी श्रीपत (IP No.५७५४६) या पेशंटला दि.३०/१०/२०११ रोजी Cordis कंपनीचे Smart Control Stent ८ x१०० हा विशिष्ट प्रकारचे ०२ नग स्टेन्ट वापरलेले आहे.

सदर स्टेन्ट करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ. गौरव वर्मा यांनी सदर स्टेन्ट करीता मागणी केलेली होती. त्यानुसार श्री. चव्हाण शिवाजी श्रीपत या पेशंटकरीता M/s. Critical Care Systems, Pune यांचेकडून बील क्र.२३६ दि.३१/१०/२०११ अन्वये दोन नग Smart Control Stent रु.९६०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.३०/१०/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर Smart Control Stent बसविणेसाठी श्री. चव्हाण शिवाजी श्रीपत यांना रु.१४०१४५/- इतका खर्च आलेला असून सदर खर्चाची रक्कम पावती नं.२१०४५६०२ अन्वये रोखीने बिलींग विभागात भरण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त रुग्णांसाठी वापरलेल्या २ नग Smart Control Stent च्या बीलाची रक्कम रु.९६,०००/- M/s. Critical Care Systems, Pune यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर Smart Control Stent च्या खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.२०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Smart Control Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३८ शासनमान्य प्रयोगशाळेकडून औषधे तपासणी करुन घेणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारे विविध प्रकारचे गोळया, इंजेक्शन, सिरप, मलम इत्यादी औषधे ही दर वर्षी विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. त्यामध्ये खरेदी करण्यात येणारी जनरीक औषधे ज्याबद्दल तक्रारी येतात, अशा औषधांपैकी Ingredient ची percentage purity कमी असते किंवा कसे? याबाबत शासन मान्य Drugs Testing Laboratories मध्ये इंजेक्शन पाठवून त्यांचेकडून खात्री करुन घेण्यात यावी, असे मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर साहेब यांनी सुचना केल्या होत्या.

त्यास अनुसरुन यापूर्वी मागील वर्षाच्या खरेदी केलेल्या औषधांपैकी १२ औषधांची तपासणी करुन घेण्यात आलेली असून त्यासाठी रक्कम रु.१३२३६/- इतका खर्च आलेला होता सर्वच्या सर्व १२ औषधांचा तपासणी अहवाल हा IS Standard प्रमाणे आहे. तसेच वरील आदेशानुसार पुन्हा सन २०११-१२ या वर्षी खरेदी केलेल्या औषधांपैकी खालील औषधांचा Analysis (Percentage Purity) करुन घ्यावयाची आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Medicines | Qty. | Manufactured by | Marketed by | Batch No. | Expiry Date |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Heparin 5000IU 5ml | 5 | Gland Pharma, Hyderabad | Gland Pharma, Hyderabad | UJ110 | 09/13 |
| 2 | Inj. Heparin 25000IU 5ml | 5 | Gland Pharma, Hyderabad | Gland Pharma, Hyderabad | UK005 | 11/12 |
| 3 | Inj. Pyrolate 1ml (Glycopyrolate) | 5 | Neon Lab. Ltd., Palghar (Thane) | Neon Lab. Ltd., Palghar (Thane) | 32320 | 01/14 |
| 4 | Inj. Unimika 500 2ml (Amikacin) | 5 | Scott-Edil Pharmacia Ltd., Jharmajri | Unichem Lab. Ltd., Mumbai | VI1121 | 05/13 |
| 5 | Inj. Nicotac 2ml (Ranitidine HCL) | 5 | Scott-Edil Pharmacia Pvt. Ltd., Jharmajri | Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai | AI1122 | 05/13 |
| 6 | Inj. Aprostat 50ml (Aprotinin) | 5 | Samarth Life Sciences, (Baddi) H.P. | Samarth Life Sciences, (Baddi) H.P. | 2APT01 | 12/12 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | Inj. C-One SB 1.5g (Ceftriaxone 1gm + Salbactum 500mg) | 5 | Scott-Edil Pharmacia Ltd., Jharmajri | Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai | DC1213 | 04/13 |
| 8 | Inj. Merovaz 1gm (Meropenem) | 5 | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | QD7105007 | 09/12 |
| 9 | Inj. Anawin 0.25% 20ml (Bupivacaine) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 25247 | 04/13 |
| 10 | Inj. Evacef 1gm (Cefotaxime) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 26844 | 06/13 |
| 11 | Inj. Maxizon 1gm (Ceftriaxone) | 5 | Scott-Edil Pharmacia Ltd., Jharmajri | Unichem Lab. Ltd., Mumbai | DC1231A | 05/13 |
| 12 | Inj. Celsuf 1gm (Cefoperazone 1gm + Sulbactum 0.5gm) | 5 | Maxmed Lifesciences Pvt. Ltd., Rudrapur (Uttarakhand) | German Remedies, Mumbai | MI-1573 | 12/12 |
| 13 | Inj. Plegiocard 20ml (Pottasium Chloride, Magnesium Chloride, Procaine Hydrochloride) | 5 | Samarth Life Sciences Pvt. Ltd., Solan, H.P. | Samarth Life Sciences Pvt. Ltd., Solan, H.P. | PCD53 | 07/13 |
| 14 | Inj. Udicort 2ml (Dexamethasone) | 5 | Scott-Edil Pharmacia Ltd., Jharmajri | Unichem Lab. Ltd., Mumbai | VIX219 | 05/12 |
| 15 | Inj. Cort-S 100mg (Hydrocortisone Succinate) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 120251 | 12/12 |
| 16 | Inj. Nitroplus 25mg/5ml (Nitroglycerine) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 173325 | 06/13 |
| 17 | Inj. Neutra Hep 5ml (Protamine Sulphate) | 5 | Gland Pharma, Hyderabad | Gland Pharma, Hyderabad | DM105 | 06/13 |
| 18 | Inj. Dotamin 250mg/5ml (Dobutamine) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 89128 | 04/13 |
| 19 | Inj. Domin 40mg/5ml (Dopamine) | 5 | Neon Lab. Ltd., Mumbai | Neon Lab. Ltd., Mumbai | 890116 | 06/13 |
| 20 | Inj. Acris 10mg/2.5ml (Atracurium Besylate) | 5 | Gland Pharma, Hyderabad | Gland Pharma, Hyderabad | ST114 | 09/13 |
| 21 | Tab. Flexib (Ibuprofen 400mg + Paracetamol 500mg) | 75 | Cachet Pharmaceuticals Pvt. Ltd., Bhiwadi (Rajasthan) | Alkem Lab., Mumbai | FLXT-11030 | 06/14 |
| 22 | Tab. Vocad Plus (Diclofenac Pottasium + Paracetamol) | 60 | Omega Biotech Ltd., Roorkee (Uttarakhand) | Cadila Healthcare Ltd., Ahmedabad | OT1004 | 03/13 |
| 23 | Tab. Norfloxacin 400 mg | 50 | Hindustan Antibiotics Ltd., Pune | Hindustan Antibiotics Ltd., Pune | 1349 | 12/12 |
| 24 | Tab. Oflokem 200 (Ofloxacin) | 50 | Alkem Lab., Mumbai | Alkem Lab., Mumbai | OKT/1004C | 01/14 |
| 25 | Tab. Otron 4mg (Ondansetron HCL) | 50 | Acme Lifesciences, Baddi, H.P. | Troikka Pharmaceuticals Ltd. Gujarat | AT00268 | 08/12 |
| 26 | Tab. Amlokem 5mg (Amlodipine) | 50 | Alkem Lab., Mumbai | Alkem Lab., Mumbai | ALT/1014C | 09/13 |
| 27 | Tab. Tancet-L 5mg (Levocetrizine) | 50 | Skymap Pharmaceuticals., Roorkee | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | BD11387 | 08/13 |
| 28 | Tab. Calnif Retard 20mg (Nifedipine) | 50 | Cadila Pharmaceuticals Ltd., Samba (J&K) | Cadila Pharmaceuticals Ltd., Samba (J&K) | JK11005 | 07/14 |
| 29 | Tab. Safexim 200mg (Cefixime) | 50 | Scott-Edil Pharmacia Ltd., Jharmajri | Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai | S011397 | 06/13 |
| 30 | Tab. Glide 5mg (Glipizide) | 50 | Franco Indian Remedies Pvt. Ltd., Chennai | Franco Indian Remedies Pvt. Ltd., Chennai | M10007 | 11/13 |
| 31 | Tab. Paracetamol 500mg | 50 | IDPL (TN) Ltd., Chennai | IDPL (TN) Ltd., Chennai | 76PAR 11 | 09/14 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | Tab. A-Thromycin 250mg (Azithromycin) | 50 | Indian Drugs & Pharmaceuticals Ltd., Virbhadra (Uttarakhand) | Indian Drugs & Pharmaceuticals Ltd., Virbhadra (Uttarakhand) | 0032 | 05/13 |
| 33 | Tab. Anzilum 0.25 mg (Alprazolam) | 60 | Syncom Healthcare Ltd., Selaqui (Uttarakhand) | Cadila Pharmaceuticals Ltd., Ahmedabad | SY11005 | 05/14 |

उपरोक्त औषधांच्या तपासणी कामी M/s. Paralab (Private) Ltd., Mumbai व M/s. Ana Laboratories, Mumbai यांचेकडून इकडील पत्र क्र.४७४३ व ४७४४ दि.१९/१२/२०११ अन्वये पत्र पाठवून त्यांचे ३३ औषधांसाठी अंदाजे दरपत्रकाची मागणी करण्यात आली होती. त्यास अनुसरुन M/s. Ana Laboratories, Mumbai यांनी प्रती औषधांसाठी रु.१,०००/- अधिक १०.३% Service Tax याप्रमाणे ३३ औषधांसाठी एकूण रक्कम रु.३६३९९/- इतका खर्च कळविलेला आहे तर M/s. Paralab (Private) Ltd., Mumbai यांनी तीस औषधांसाठी वेगवेगळे दर दिलेले असून आपणास तपासणी करावयाचे असलेल्या औषधांपैकी तीन औषधांकरीता बाजारातील दराप्रमाणे म्हणजेच स्पष्ट दर दिलेले नाही तेंव्हा ती तीन औषधे वगळून उर्वरीत ३० औषधांसाठी एकूण रक्कम रु.१३१४८०/- इतका खर्च कळविलेला आहे. त्यामुळे M/s. Paralab (Private) Ltd., Mumbai यांना श्री साईबाबा संस्थान ही धर्मादाय संस्था असल्याने मुळ दरांमध्ये अजून काही सूट देणेबाबत दि.०७/०२/२०१२ रोजी दुरध्वनीद्वारे विचारणा करण्यात आली होती त्यानुसार त्यांनी एकूण रक्कमेवर ४०टक्के सूट देऊ असे सांगितले आहे. सदर ४० टक्के सूट घेऊन रक्कम रु.७८८८८/- इतका खर्च येईल. सदर दरांचा विचार करीता M/s. Ana Laboratories, Mumbai यांचे दर निम्नतम येतात.

तरी M/s. Ana Laboratories, Mumbai या शासनमान्य प्रयोगशाळेकडून उपरोक्त ३३ औषधे तपासणीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.३६३९९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त ३३ औषधे M/s. Ana Laboratories, Mumbai या शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.३६३९९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३९ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो विभागाकरीता EEG (Electro Encephelogram) Machine with Video खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात डॉ. सुहास पाटील यांची इकडील पत्र क्रमांक २८५७ दि.१३/०९/२०११ अन्वये मानद न्युरो फिजीशियन म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यानुसार सध्या ते दर मंगळवारी श्री साईबाबा रुग्णालयात येऊन बाहयरुग्ण विभागात रुग्णांची तपासणी व उपचार करत असतात. रुग्णाची तपासणी केल्यानंतर त्या रुग्णाच्या मेंदुतील दोष शोधणेसाठी EEG (Electro Encephelogram) तपासणी करावी लागते. सदर तज्ञ डॉक्टर आपणाकडे नसल्यामुळे सदर मशिन आपणाकडे उपलब्ध नाही, त्यामुळे डॉ. सुहास पाटील यांनी दि.१०/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये एक नग EEG (Electro Encephelogram) Machine with Video (३२ Channel) ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Pinnacle Biomed Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे दि.३०/०१/२०१२ रोजीचे ई-मेल पत्राअन्वये सदरचे मशिनकरीता प्रती नग रु.३,८६,७१९/- इतके दर कळविले आहे. त्यांचे दरपत्रकानुसार एकुण १ नगांसाठी अंदाजे रक्कम रु.३,८६,७१९/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी सदर एक नग EEG (Electro Encephelogram) Machine with Video (३२ Channel) विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.३,८६,७१९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो विभागाकरीता आवश्यक असणारी EEG (Electro Encephelogram) Machine with Video (३२ Channel) विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.३,८६,७१९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**दिनांक १९.०२.२०१२ चे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**विषय नं.४० श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये बहीरेपणावरील विना ऑपरेशन, मेडीशीन-प्रेशर पॉईन्ट थेरपी उपचार सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये बहीरेपणावर विना ऑपरेशन, विना मेडीशीन उपचार सुरु करणेबाबत डॉ. नानासाहेब कृष्णाराव होन, बी. एच. एम. एस, पोहेगांव यांनी दि.१९.०१.२०१२ रोजीचे अर्जाव्दारे मानस व्यक्त केला आहे. सध्या त्यांचे नाशिक, कोलकाता, हैद्राबाद, नवी दिल्ली येथे कॅम्प घेऊन जवळ जवळ पंधरा हजार रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर उपचार केलेले आहेत. याशिवाय त्यांचे नांव राष्ट्रपतींची दखल घेणाऱ्या डॉक्टरांच्या पॅनलमध्ये कायम स्वरुपी समाविष्ठ झालेले आहे. दि.२१.०१.२०१२ रोजीचे मा. उप समितीचे सभेत मा. विश्वस्तांनी त्यांना व्हिजीटींग कन्सल्टंन्ट म्हणुन घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करण्यास सुचविले आहे.

डॉ. नानासाहेब कृष्णाराव होन, बहीरेपणावरील विना ऑपरेशन, विना मेडीशीन उपचार पदधतीत ऑडीओमेट्री (Audiometry) सह प्रेशर पॉईन्ट थेरपी करतात. सदर तपासणीचे दर इतर ठिकाणी रु.४,०००/- इतके आकारले जातात. श्री साईबाबा हॉस्पिटलसाठीचे दर खालील प्रमाणे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.नं. | तपासणी/उपचार | **एकुण दर** | रुग्णालय आकार | डॉक्टरांचा मोबदला |
|---|---|---|---|---|
| १ | ओपीडी तपासणी दर | **११०** | ५० | ६० |
| २ | ऑडीओमेट्री दर | **२००** | १०० | १०० |
| ३ | प्रेशर पॉईन्ट थेरपी दर | **१,४००** | ७०० | ७०० |

यामध्ये संस्थान कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांना लागु असलेप्रमाणे मोफत उपचार दिले जातील. तरी डॉ. नानासाहेब कृष्णाराव होन, यांना महिन्यातुन ३ दिवस श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग कन्सल्टन्ट म्हणुन नेमणुक करण्यास व प्रस्तावीत केलेली दर आकारणी करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बहीरेपणावरील विना ऑपरेशन, मेडीशीन-प्रेशर पॉईन्ट थेरपी उपचार सुरु करणेकामी डॉ. नानासाहेब कृष्णाराव होन, यांना महिन्यातुन ३ दिवस श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग कन्सल्टन्ट म्हणुन नेमणुक करण्यास व प्रस्तावीत केलेली दर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली. सदर कार्यवाही दिनांक ०१ मार्च,२०१२ पासून करण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१** **डॉ.कौशिक हिरजीभाई मकवाना, वैद्यकीय प्रशासक यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९५२ नुसार जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ५६२३/२०१० दि. २०/१२/२०१० अन्वये डॉ. कौशिक मकवाना यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय प्रशासक या पदावर मासिक रु. ५०,०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून, ते दि. १७/०१/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत. डॉ. मकवाना यांनी परिवीक्षाधीन कालावधीमध्ये २३ रजा घेतलेल्या असल्याने, त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि. ०८/०२/२०१२ अखेर संपुष्टात येत आहे.

दि.०९ /११/२०११ पासून डॉ. मकवाना हे श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिक्षक पदाचे कामकाज पाहत आहेत.

वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी डॉ. मकवाना यांना रुग्णालयाचे सेवेत एक वर्ष पूर्ण झालेले असल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

एक वर्षाच्या कालावधीमध्ये डॉ. मकवाना यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यांची संस्थान सेवा पूढे चालू ठेवणेस हरकत नाही. असा अभिप्राय वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी दिलेला आहे.

डॉ. मकवाना यांना सध्या मासिक रु. ५०,०००/- एकत्रित वेतन देण्यात येत आहे. मंजूर आकृतीबंधानुसार वैद्यकिय प्रशासक या पदाकरीता सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु. ६६०० असा आहे. या नुसार वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मधील मुळ वेतन रु. १८७५० + ग्रेड वेतन रु. ६६००/- + महागाई भत्ता रु. १४,७०३+एन पी ए रु. ६३३८/- असे एकुण रु. ४६,३९१/- वेतन होईल. त्यात रु. ३,६०९/- वैयक्तीक वेतन समाविष्ठ करुन त्यांना मासिक एकूण रु. ५०,०००/- द्यावे लागेल. त्यानंतर वेळोवेळी होणारी वार्षीक पगारवाढ तसेच महागाई वेतन व महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम त्यांच्या वैयक्तीक वेतनाच्या रक्कमेमध्ये समायोजीत करावी लागेल.

उपरोक्तप्रमाणे वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता, डॉ. कौशिक हिरजीभाई मकवाना यांना दि. ०९/०२/२०१२ पासून सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ

वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० + वैयक्तीक वेतन व अनुज्ञेय भत्ते देऊन त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीवर त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.२११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता, डॉ. कौशिक हिरजीभाई मकवाना यांना दि. ०९/०२/२०१२ पासून सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० + वैयक्तीक वेतन व अनुज्ञेय भत्ते देऊन त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीवर संस्थान सेवेत कायम करणेत यावे व त्यानंतर वेळोवेळी होणारी वार्षिक पगारवाढ तसेच अनुज्ञेय भत्त्यांच्या वाढीची रक्कम त्यांच्या वैयक्तीक वेतनाच्या रकमेमध्ये समायोजित करण्यात यावी,असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४२** **श्री बाबासाहेब लहानू म्हस्के, परफ्यूजिनिस्ट (११ महिने कालावधीसाठी ) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८० नुसार परफ्यूजनिस्ट हे पद व इतर वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेकामी दि. ०२/०४/२०११ रोजीचे दै. लोकमत व दि. ०४/०४/२०११ रोजीचे लोकसत्ता या वर्तमान पत्रांत वॉक इन इंटरव्ह्युवची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार दि. १०/०४/२०११ रोजी परफ्यूजनिस्ट व इतर पदांच्या मुलाखती घेण्यात आल्या. परफ्यूजनिस्ट हे पद अनुसूचीत जाती या प्रवर्गाकरीता आरक्षीत होते. परंतु, सदर वर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्याने, खुल्या प्रवर्गातील श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे. रु.२१,०००/- वर नेमणूक करणेकामी निवड करण्यात आलेली होती.

त्यास अनुसरुन, जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३५१/२०११ दि. २१/०४/२०११ अन्वये श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे. रु.२१,०००/- वर नेमणूक करण्यात आलेली असून, ते दि. २८/०४/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांची ११ महिने कालावधीची मुदत दि. २७/०३/२०१२ अखेर संपुष्टात येत असल्याने, त्यांना पुढील मुदतवाढ देणेकामी गोपनीय अहवाल मागविण्यात आलेला असून, वैद्यकिय संचालक यांनी पुढीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे. च सदर ११ महिने कालावधीमध्ये श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू किंवा प्रस्तावीत नाहीत. परफ्युजनिस्ट या पदाची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देणेस हरकत नाही.छ

उपरोक्तप्रमाणे वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता श्री बाबासाहेब लहानु म्हस्के, यांना परफ्यूजनिस्ट या पदावर पुढील मुदतवाढ देणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.२१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता श्री बाबासाहेब लहानु म्हस्के, यांना परफ्यूजनिस्ट या पदावर पूर्वीचे अटी शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व्हिजीटींग स्पाईन सर्जन म्हणून काम करणेस परवानगी मिळणे बाबत डॉ.अमोल जयवंत रेगे यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. अमोल जयवंत रेगे, पुणे यांनी दि. २०/०१/२०१२ रोजी अर्ज करुन त्यात चI am working as Consultant Spine Surgeon at Deenanath and Jahangir Hospital Pune. I have been trained in treatment of complex Spine Surgeries in Uk and Asutralia. I wish to apply as Honorary Spine Surgeon at your prestigious institute and conduct OPD once a month for Spine problems. I will be greatful if you can consider the same.छ असे म्हटलेले आहे.

**डॉ. अमोल जयवंत रेगे, पुणे यांची माहिती खालीलप्रमाणे -**

**जन्मतारीख व वय :** ०९/०६/१९६६ **वय:** ४६ वर्षे.

**शैक्षणिक पात्रता :** एम बी बी एस - १९९१, डी अर्थो - १९९२
एम एस (आर्थो) - १९९३, डी एन बी (अर्थो)-१९९३
एम सी एच (अर्थो) - १९९८, एम एस्सी (क्लिनीकल-अर्थो) - १९९८
एफ आर सी एस (UK) - १९९९, एफ आर सी एस (Glasg) - २००१

अे टी एस एल एस - १९९६, सी सी एस टी - २००४

**अनुभवः 1)** Sr. House Officer-Wansbeck General Hosp, Ashington – 01/06/95 to 19/12/95

**2)** Specialist Registrar in Orthopaedic Northern Deanery, UK – 20/12/95 to 07/01/00

**3)** Short term Locums (Orthopaedic Registrar) in Various Hosp in UK - 01/02/00 to 30/05/00

**4)** Spinal Research Fellow, Woodend Hosp, Abredeen - 01/06/00 to 31/05/01.

**5)** Locum Orthopaedic Consultant, South Tyneside District Hospital, South Shields 01/06/01- 02/12/01

**6)** Specialist Registrar in orthopaedics, Northern Deanery, UK- 03/12/01 to 05/01/04

**7)** Consultant Orthopaedic Surgeon-Deenanath Mangeshkar, Jehangir, Aditya Birla Memorial and Hardikar Hospital-since 17/01/04 onword.

**8)** Asso Prof of Orthopaedics-Bharati Vidyapeeth University Medical College.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजुर कर्मचारी आकृतीबंधामध्ये स्पाईन सर्जन या पदाचा स्वतंत्र समावेश नाही. स्पाईन सर्जरी हा न्यूरो व आर्थोसर्जरीचा एक भाग आहे. संस्थानचे रुग्णालयामध्ये ज्या स्पाईन सर्जरी होत नाही. किंवा याबाबतच्या गुंतागुंतीच्या केसेस आहे, अशा सर्जरी/केसेस डॉ. रेगे हे संस्थानचे रुग्णालयामध्ये कमी खर्चात करण्यास तयार आहे. तसेच याकामी ते महिन्यातून दोन वेळेस संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध राहणार आहेत. उपरोक्त सर्जरीबाबत डॉ. टिंगरे, डॉ. मोदगी व डॉ. जपे यांचेशी वैद्यकिय संचालक यांनी चर्चा केलेली असून, डॉ. रेगे यांना महिन्यातून दोन दिवस हॉस्पीटलमध्ये स्पाईन सर्जरीसाठी बोलविण्यात यावे, अशी शिफारस केली आहे.

डॉ. अमोल जयवंत रेगे यांची महिन्यातून दोन दिवस मानद व्हिजीटींग स्पाईन सर्जन म्हणून नेमणूक करुन त्यांना न्यूरो सर्जरीचे चार्जेस प्रमाणे मानधन/इंन्सेंटीव द्यावे लागेल.

तरी, वैद्यकिय संचालक यांचे शिफारसीनुसार डॉ. अमोल जयवंत रेगे यांची महिन्यातून दोन दिवस मानद व्हिजीटींग स्पाईन सर्जन म्हणून नेमणूक करुन त्यांना न्यूरो सर्जरीचे चार्जेस प्रमाणे मानधन/इंन्सेंटीव देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांचे शिफारसीनुसार डॉ. अमोल जयवंत रेगे यांची महिन्यातून दोन दिवस मानद व्हिजीटींग स्पाईन सर्जन म्हणून नेमणूक करुन त्यांना न्यूरो सर्जरीचे चार्जेस प्रमाणे मानधन/इंन्सेंटीव देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४ अपंग व कर्णबधीर रुग्णांस मोफत साधन सामुग्री वितरण शिबीराचे अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व रत्ननिधि चारिटेबल ट्रस्ट, मुंबई, यांचे संयुक्त विद्यमाने अपंग व कर्णबधीर रुग्णांकरिता मोफत साधन सामुग्री वितरण शिबीर दि. २१ ते २३ जानेवारी २०१२ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये लागणारी साधन सामुग्री रत्ननिधि चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, पुरविणार व शिबीरासंबंधीतचा अनुषंगीक खर्च संस्थानने करावयाचा ठरले होते. शिबीरामध्ये अपेक्षेपेक्षा खुप जास्त प्रमाणात रुग्णांनी सहभाग घेतला असुन एकुण २४०३ रुग्णांची साहित्य मागणीची नोंदणी झाली, त्यापैकी प्रथम नोंदणी केलेल्या रुग्णांना रत्ननिधि चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत उपलब्धतेनुसार खालीलप्रमाणे साधन सामुग्रीचे गरजु अपंग व कर्णबधीर रुग्णांना वाटप करण्यात आले आहे.

| अ.नं. | तपशिल | एकुण नग |
|---|---|---|
| १. | कॅलिपर्स | १२३ |
| २. | जयपूर फुट | २५ |
| ३. | क्रचेस | ११२ |
| ४. | ट्रायसीकल | ३० |
| ५. | व्हील चेअर | ५० |
| ६. | ऑर्थो प्रोडक्ट | ५०७ |
| ७. | श्रवणयंत्र | ४९७ |
| | **एकुण** | **१३४४** |

सदर साधन सामुग्रीचा खर्च रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी केला आहे. शिबीर आयोजन खर्च संस्थानने करावयाचा होता .

सदर शिबीर आयोजनास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च खालीलप्रमाणे झाला आहे.

| अ.नं. | तपशिल | बिल नंबर/ दिनांक | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| १. | डिजीटल फ्लेक्स बोर्ड | बिल नं. ७६२ / दि. ३०.०२.२०१२ | ९,४८० |
| २. | हॅन्डबिल्स् (प्रसिध्दी पत्रक) | बिल नं. ७६१ / दि. ३०.०२.२०१२ | ३,२०० |
| ३. | चहा, कॉफी व नाष्टा खर्च (खाजगी कॅन्टीन) | बिल नं. ७८ ते ८२ दि. १९ ते २३ जाने.२०१२ | १,७८३ |
| ४. | शिबीर मंडप व्यवस्था | | १५,०१८ |
| ५. | प्रसादालय- प्रसाद/भोजन खर्च (रुग्ण व शिबीर आयोजक ) | प्रसादालय विभाग | १५,००० |
| ६. | प्रकाशने - श्रींचे थ्री - डी फोटो, शॉल इ. | प्रकाशने विभाग | ५,२५० |
| ७. | शिबीर आयोजक - निवास व्यवस्था | द्वारावती भक्त निवास | १८,५५० |
| ८. | कॅन्टीन - मिनरल वॉटर, चहा, कॉफी व बिस्कीटे | कॅन्टीन | ५,००० |
| ९. | किरकोळ खर्चासाठी | | ५,००० |
| | **एकुण-** | | **७८,२८१** |

अशाप्रकारचे एकुण रु. ७८,२८१/- इतका खर्च झाला आहे. तरी त्यास अनुसरुन झालेल्या एकुण खर्चाची बिले पुरवठा दारांना वेळोवेळी अदा करणेस व एकुण रक्कम रु. ७८,२८१/- (अक्षरी रुपये अठ्यात्तर हजार दोनशे ऐक्याऐंशी) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सविनय सादर.

**निर्णय क्र.२१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, अपंग व कर्णबधीर रुग्णांस मोफत साधन सामुग्री वितरण शिबीराचे अनुषंगिक आलेल्या एकूण रुपये ७८,२८१/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५ माहे सप्टेंबर, २०११ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाकरीता C३ Fluid Pack ची तातडीने आवश्यकता होती. सदर C३ Fluid Pack चे २ नग मुंबई येथून तातडीने खरेदी केलेले आहेत. सन २०११-१२ चे औषधे खरेदीची पुरवठा आदेश देण्याची प्रक्रीया चालू असल्याने औषध भांडार विभागात C३ Fluid Pack आपणाकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.३०३२४/- मात्र खर्च आलेला आहे. M/s. UNI-BIO, Mumbai यांना वेळोवेळी तगादा केल्यानंतर सदर खरेदीचे बील हे दि.२४/०१/२०१२ रोजी पाठविले होते त्यामुळे त्यावेळेस त्याची मंजूरी घेण्यात आलेली नव्हती.

सदरची खरेदी ही माहे- सप्टेंबर मध्ये केलेली आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे, त्यानूसार सप्टेबर २०११ या महिन्यात रु.१५४२२७ /- इतक्या रक्कमेची खरेदी झालेली असल्यामुळे उपरोक्त दोन बीलांची रक्कम रु.३०३२४/- मिळून एकुण खरेदी रक्कम रु. १८४५५१/- इतकी होत आहे. सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतुदी पेक्षा जास्त रक्कमेची झालेली असल्यामुळे सदर खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. UNI-BIO, Mumbai | 526B | 06/09/2011 | 15162.00 |
| 2 | M/s. UNI-BIO, Mumbai | 526C | 06/09/2011 | 15162.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **30324.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.३०३२४/- (रु. तीस हजार तीनशे चोवीस मात्र) खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.२१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सप्टेंबर, २०११ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये ३०३२४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६ मे.साईट्रॉन्स मेडिकल इक्वीपमेंट, लोणी यांचा पुरवठा आदेश रद्द करुन मे.अनिता मेडिकल सिस्टम प्रा.लि.,मुंबई यांना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२७/०२/२०११ निर्णय क्र. १३३ अन्वये मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांना ऑपरेशन थिएटर विभागासाठी लागणारे रेडीयशन मटेरीयलचा इकडील पत्र क्र. ७३८६ दि.१८/०३/२०११ नुसार रु.२,३५,७२९/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

परंतु मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांनी आज पर्यंत सदरच्या मटेरीयलचा पुरवठा केलेला नाही, तेंव्हा त्यांना त्वरीत पुरवठा करणेबाबत इकडील पत्र क्र. ६८९ दि.०९/०५/२०११ व १५०१ दि.२१/०६/२०११ अन्वये स्मरणपत्र देण्यात येऊन वारंवार दुरध्वनीद्वारे पुरवठा करणेबाबत तगादा करण्यात आलेला होता. त्यानंतर त्यांनी दि.१८/०३/२०११ (प्राप्त दि.११/०७/२०११) चे पत्रान्वये तसेच दि.३०/०६/२०११ रोजी समक्ष भेटीद्वारे सदर मटेरीयलच्या किंमती वाढल्यामुळे पुरवठा करु शकत नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे किरण कंपनीचे दरांकरीता तुलनात्मक दरांच्या तक्त्यात मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचे क्रमांक दोनचे दर प्राप्त झालेले आहेत. सदर साहित्याची रुग्णालयात आवश्यकता असल्यामुळे मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करावे लागणार आहे. त्यानुसार त्यांना कोटेशन मधील दराने पुरवठा करणेबाबत दूरध्वनीद्वारे विचारणा केली असता ते संस्थानसाठी विशेष बाब म्हणून त्या दराने पुरवठा करण्यास तयार आहे, असे कळविले आहे.

त्यानुसार मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांचा पुरवठा आदेश रद्द करुन मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचेकडून सदर साहित्य खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या जास्तीचा खर्च रु.८३,४७१/- इतक्या रक्कमेस तसेच मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांचे नाव काळ्या यादीत टाकणे कामीचा प्रस्ताव दि.२८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता. मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांनी सदर मटेरीयलचा जुन्या मंजूर दराने एक महिन्याच्या आत पुरवठा करण्यास तयार आहे असे पत्र दि.२६/०८/२०११ रोजी दिल्यामुळे त्यांचे नाव काळ्या यादीत न टाकता त्यांचेकडूनच सदर मटेरीयल खरेदी करण्यास मा. व्यवस्थापन समिती सभा २८/०८/२०११ निर्णय क्र.६०९ अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांनी काही मटेरीयलचा पुरवठा केलेला असून काही मटेरीयल पुरवठा करणे बाकी आहे. त्यासाठी त्यांना इकडील पत्र क्र.५३५३ दि.१६/०१/२०१२ चे अंतिम स्मरण पत्रान्वये सदर मटेरीयल पुरवठा करणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु त्यांनी आज पर्यंत मटेरीयलचा पूरवठा केलेला नाही. त्यामुळे ते तुलनात्मक दरांच्या तक्त्यातील क्रमांक दोनचे दर प्राप्त झालेले पुरवठाधारक मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करावे लागेल. मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचे दरानुसार सदर साहित्य खरेदीकामी रक्कम रु. २५३८४२/- इतका खर्च येणार आहे. म्हणजेच सदरचे खरेदीकामी एकूण रक्कम रु.६६३८०/- (रु. २५३८४१.८१ - रु. १८७४६१.७५ = रु.६६३८०.०६) इतका जास्तीचा खर्च येणार आहे. मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई हे आजही कोटेशन मधील मंजूर दराने सदर साहित्य देण्यास तयार आहे, असे दि.०२/०२/२०१२ रोजी विचारणा केली असता त्यांचे प्रतिनिधी श्री. राजेश शिखरमाने यांनी सांगितले आहे.

तेंव्हा मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांचा पुरवठा आदेश रद्द करुन मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचेकडून सदर साहित्य खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या जास्तीचा खर्च रु.६६३८०/- इतक्या रक्कमेस तसेच मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांच्या चालू बीलातून किंवा सुरक्षा रक्कमेतून येणारा जास्तीचा खर्च वसूल करणेस व त्यांचे नाव काळ्या यादीत टाकणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांचा पुरवठा आदेश रद्द करुन मे. अनिता मेडीकल सिस्टम्स् प्रा. लि., मुंबई यांचेकडून सदर साहित्य खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या जास्तीचा खर्च रु.६६३८०/- इतक्या रक्कमेस तसेच मे. साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी यांच्या चालू बीलातून किंवा सुरक्षा रक्कमेतून येणारा जास्तीचा खर्च वसूल करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७ वाहन विभाग परिसरातील उर्वरित भागाचे डांबरीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सर्व्हे नंबर १०९ पैकी मधील जागेत वाहन विभाग स्थलांतरीत करणेत आलेले आहे. वाहन विभागाचे पार्कींग शेड, वाहनतळ व वाहनतळाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर पावसाळयात पाणी साचून चिखल होवू नये याकरिता खडीकरण व डांबरीकरण करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ सप्टेंबर, २०११ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६८३ अन्वये ठेकेदार मे.जगताप कन्स्ट्रक्शन ॲन्ड

इंजिनियरिंग कंपनी, कोल्हार यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना रुपये २०,०३,२८२/- रकमेचे काम दि. ०८ ऑक्टोबर, २०११ रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आलेले आहे. ठेकेदार यांनी खडीकरण पूर्ण केले असून डांबरीकरणास सरूवात केली आहे.

सदरचे कामास सुरूवात झाल्यानंतर वाहन विभाग प्रमुख यांनी दि.१४/१०/२०११ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये कळविले होते की, वाहनांची संख्या वाढली असल्याने वाहन पार्कींगसाठी जागा अपुरी पडत असल्याने सदर भागातील पाणी नसलेली विहिर बुजविणे तसेच उर्वरीत भागाचे खडीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

त्यानुसार विहिर बुजविण्यात आलेली आहे. उर्वरीत डांबरीकरणाचे काम पुर्वीचे मंजूर दराने करणेविषयी ठेकेदार मे.जगताप कन्स्ट्रक्शन अॅन्ड इंजिनियरिंग कंपनी, कोल्हार यांना विनंती केली असता त्यांनी सध्या डांबराचे दर वाढलेले असल्याने सदरचे काम करणेस असमर्थता व्यक्त केली आहे.

सदरचे ३५ मी. x ५९ मी. भागातील १८०० चौ.मी. खडीकरण व डांबरीकरण खालील तरतुदीनुसार करणेकामी अंदाजे रुपये ९,१५,६९०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | खडीकरण | २०० मि.मी. जाडीच्या मुरमाच्या थरावर १५० मि.मी. जाडीचे ६० मि.मी. खडीकरण व १०० मि.मी. जाडीचे ४० मि.मी. खडीकरण. |
| ०२. | डांबरीकरण | ७५ मि.मी. जाडीच्या बी.बी.एम.वर २० मि.मी. जाडीचे प्रिमिक्स कार्पेट व सिलकोट |

तरी उपरोक्तप्रमाणे काम करण्यासाठी येणारे अंदाजे रु. ९,१५,६९०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम स्वतंत्र निविदा फॉर्म तयार करुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डांबराचे भाव वाढलेले आहेत. तसेच याकामी पुन्हा निविदा मागविल्यास बराच कालावधी जाईल व पावसाळयापुर्वी डांबरीकरणाचे काम होणार नाही. त्यामुळे या कालावधीत डांबराचे दरात वाढ झाल्यामुळे जादा दराने खर्च करावा लागेल. तरी कामकरणेचे सोयीचे दृष्टीने सध्या काम करीत असलेले मे.जगताप कन्स्ट्रक्शन अॅण्ड इंजिनिअरिंग कं., कोल्हार यांचे एस्टिमेट दरावर १०% वाढ देऊन त्यांचेकडूनच सदरचे काम करुन घेण्यात यावे, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४८** **नियोजित साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर अॅण्ड काप्रे असोसिएटस् प्रा.लि.,नवी दिल्ली यांचे फी मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** (अ)मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयांन्वये, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मधील जागेत साई गार्डन प्रकल्पाचे काम करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार नियोजित साईगार्डन प्रकल्पासाठी लेजर शो उभारणीचे कामांसाठी आराखडे, अंदाजपत्रके व निविदा कागदपत्रे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये रु.४६ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता देणेत आली होती. सदर काम तीन टप्प्यात करण्याचे ठरले होते. तसेच आर्कोटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा. लि., नवी दिल्ली यांची प्रकल्पाचे किंमतीचे २.५% अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फीवर नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

१. आर्कि. काप्रे यांनी संस्थानमार्फत करावयाचे नियोजित साई गार्डन प्रकल्पासाठी जुलै, २००९ मध्ये प्रथम अंदाजपत्रक, नकाशे व निविदा मसुदा तयार केले होते. यावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ सप्टेबर, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७३१ (८) अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथूर अॅण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत, त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षीत खर्च, संस्थानसाठी यामधून किती उत्पन्न मिळेल यासर्व बार्बीसह सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, असे ठरले."

२. उपरोक्त निर्णयानुसार काप्रे यांनी तयार केलेले अंदाजपत्रक, नकाशे व निविदा पुस्तीका रद्द करुन त्यांना BOT तत्वावर साईगार्डन प्रकल्पाची उभारणी करणेसाठी आवश्यक असणारे RFP Document, नकाशे तयार करुन घेणेत आले व त्यानुसार प्रस्ताव मागविणेत आले होते. सदरचे प्राप्त इ

ालेले प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१० रोजीचे सभेत उघडणेसाठी सादर करणेत आले. सदर सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे BOT तत्वावरील प्रकल्पासाठी प्राप्त झालेले दोन प्रस्ताव रद्द करण्यात यावेत. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच, ४D शो व इतर वैशिष्ट्यपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

वरीलप्रमाणे निर्णयानुसार कार्यवाही करणेत येवून साईगार्डन प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे कार्यादेश देणेत आलेले आहेत.

| **S.No** | **Project** | **Contractor** | **Estimated Cost** |
|---|---|---|---|
| 01 | Sai Garden Civil Work | KRR Infra Project Ltd; Hyderabad | Rs.30.95 Cr |
| 02 | Sai Garden Laser Show | Laservision Ltd; Hong Kong | Rs.24.75 Cr |
| | | **Total:** | **Rs.55.70 Cr** |

आर्कीटेक्ट यांचे करारनाम्यातील अटी शर्तीनुसार साईगार्डन प्रकल्पातंर्गत लेजर-शोसह साईगार्डनसाठी आवश्यक सिव्हील वर्क करणेसाठी ठेकेदार मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस् लि., हैद्राबाद यांना देणेत आलेल्या रु.३०,९५,२७,६६६/- रकमेच्या कार्यादेशानुसार आर्किटेक्ट काप्रे यांना २.५% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह एकुण रु.८५,३५,२२६/- मात्र इतकी रक्कम फीपोटी द्यावी लागणार आहे. त्यापैकी आर्किटेंक्ट यांनी दिलेल्या सेवेनुसार त्यांना आजपावेतो सर्व्हिस टॅक्ससह रु.१७,०७,०४५/- मात्र फी अदा करणेत आली आहे. उर्वरीत फी त्यांना करारनाम्यातील शर्तीनुसार टप्प्याटप्प्याने अदा करणेत येईल.

(ब) आर्किटेक्ट यांचे समवेत झालेल्या करारनाम्यानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट यांना प्रकल्पाचे किंमतीच्या २.५०% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह खालील टप्प्याने फी अदा करावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| Stage-1 | On signing of contract, awarding the architectural work | 5% of total fees payable |
| Stage-2 | on approval of plans & estimates | 10% of total fees payable, less amount paid at Stage 1. |
| Stage-3 | on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | 20% of total fees payable, less amount paid up to Stage 2. |
| Stage-4 | During the progress and on completion of the construction work. | 70% of the total fees payble at prorata with the progress of work. |
| Stage-5 | On Completion of the project. | Balance 10% of the total fees payable on successful completion of the project and commissioning of all equipments and on release of as-built drawings. |

आर्किटेक्ट काप्रे यांनी यापूर्वी वरिल **"अ"** मधील ०१ व ०२ नुसार दिलेल्या सेवांचे तसेच लेजर शो उभारणी करीता लेजर व्हिजीन लि, हॅंगकॉंग यांना बहाल केलेले कामापोटी मिळून एकुण रुपये ३३,३६,०२४/- अतिरीक्त बिलाची मागणी केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Fee Stage** | As per architect's bill | | Laser Show (Laservision Ltd.) Rs.25/- crores |
|---|---|---|---|---|
| | | Initial Estimate Rs.23.66 crores | RFPDocuments made for BOT, Rs.23.66 crores | |
| | | **A** | **B** | **C** |
| 01 | Stage-1 (5% of total fees payable) On signing of contract, awarding the architectural work | 295750/- | 0.00 | 312500/- |
| 02 | Stage-2 (10% of total fees payable) on approval of | 295750/- | 0.00 | 312500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | plans & estimates | | | |
| 03 | Stage-3 (20% of total fees payable, less amount paid up to Stage 2.) on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | 591500/- | 591500/- | 625000/- |
| | Total Amount of fees | 1183000/- | 591500/- | 1250000/- |
| | Add Service tax @ 10.30% | 121849/- | 60925/- | 128750/- |
| | Total Amount Rs. | 1304849/- | 652425/- | 1378750/- |
| | | 19,57,274/ | | 13,78,750/- |
| | **Total A+B+C Rs.** | **33,36,024/-** | | |

उपरोक्त तपशिल विचारात घेता A व B या दोन बाबींसाठी तयार करणेत आलेले बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक हे सर्वसाधारणपणे एकाच संकल्पनेवर आधारीत होते. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने त्यातच आवश्यक त्या सुधारणा करुन सध्याचे सिव्हील वर्कचे आराखडे व निविदा अंतीम करणेत आले. त्यामुळे त्यासाठी आर्कीटेक्ट यांचे मागणीनुसार अतिरिक्त फी रु.१९,५७,२७४/- देय होत नाही. तथापी याबाबत आर्कीटेक्ट यांचेशी समक्ष चर्चा करून निर्णय घेता येईल.

लेजर शो उभारणीसाठी आर्किटेक्ट काप्रे यांचेकडून RFP Document तयार करुन घेण्यात आले व त्यानुसार प्रस्ताव मागविण्यात आले. सदर लेजर शोचे काम लेजर व्हिजन लि., हाँगकाँग याना बहाल करणेत आले आहे. त्यासाठी आर्किटेक्ट यांनी नव्याने RFP तयार करणे, त्यासंबंधातील तज्ञांची मते विचारात घेवून दुरुस्ती करणे, RFP अंतिम मसूदा तयार करणे, प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मुल्यांकन करून त्याबाबत अभिप्राय देणे इत्यादी सेवा दिलेल्या आहेत.

लेजरव्हिजन लि. हाँगकाँग यांचेमार्फत उभारण्यात येणारे लेजर शोचे काम हे अतिविशिष्ठ स्वरुपाचे आहे. त्यामुळे सामान्यपणे आर्कीटेक्ट यांचेमार्फत सिव्हील वर्कसाठी देण्यात येणाऱ्या सेवांची तुलना सदर कामाशी करता येणार नाही. त्यामुळे सदर लेजर शो प्रकल्पासाठी आर्कीटेक्ट यांचेकडून घ्यावयाच्या सेवांचे स्वरुप व त्यासाठी अदा करावयाची फी निश्चित करणे आवश्यक आहे. तरी त्याबाबत आर्किटेक्ट काप्रे यांचेशी समक्ष चर्चा करुन निर्णय होणेस विनंती. तसेच त्यांनी साईगार्डन प्रकल्पांतर्गत लेजर शो उभारणीकामी यापुर्वी दिलेल्या सेवांसाठी वरीलप्रमाणे मागणी केलेल्या फी बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट यांनी मागणी केलेली फी जास्त वाटते त्यामुळे आर्किटेक्ट यांना मा.स्थानिक विश्वस्त समितीचे सभेत बोलावून त्यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४९** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना -व्दितीय प्राधान्यगटातील २४ रस्त्यांपैकी सहा रस्त्यांसाठी भूसंपादन प्रकरणे २/३ रक्कम शासनाकडे जमा करणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत यांचे विनंतीवरून, मा. व्यवस्थापन समितीने शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत द्वितीय प्राधान्यगटातील २४ रस्त्यांचे विकसित करणेस दिनांक २४ जुलै, २०११ चे सभेतील निर्णय क्रमांक ५३८ नुसार भुसंपादनखर्चासह अंदाजे रक्कम रुपये १२६.१० कोटी मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. तसेच दिनांक २४ सप्टेंबर, २०११ सभेतील निर्णय क्रमांक ७०६ नुसार व्दितीय प्राधान्य गटातील ज्या रस्त्यांना भूसंपादनाची आवश्यकता नाही व साईभक्त / नागरीकांचे दैनंदिन वापरात जे १७ रस्ते आहेत ते प्रथमतः विकसीत करणेबाबत कार्यवाही करणेस, भुसंपादनासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांचे मोजणीकामी मोजणी फी संस्थानतर्फे अदा करणे यावी तसेच याकामी अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेत यावी असे ठरले आहे.

त्यानुसार इकडील जा.नं. एसएसएसटी-बांधकाम /३५५९/२०११ दि.०७ऑक्टोबर, २०११ रोजीचे प्रस्तावान्वये भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्याचे विकसनासाठी अंदाजे रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करून देणेस व सदर रस्ते संस्थानच्या माध्यमातून थेट विकसित करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला आहे. त्यावर शासनाचे सांसवि -२०११ /५१४/ प्र. क्र. ७४/का.सोळा, मुंबई दि. ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्रानुसार आवश्यक पुर्ततेसह व्दितीय प्राधान्यगटातील एकुण २४ रस्त्यापैकी १७ रस्ते विकसीत करणेकामी येणारे एकूण सुमारे ३५ कोटी रकमेचे काम संस्थान निधीतुन संस्थानमार्फत करणेस मान्यता मिळणेकामी विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव फेरसादर करणेत येत आहे.

आता, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दिनांक २१ जानेवारी, २०१२ तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे पत्रान्वये, व्दितीय प्राधान्य गटातील खालीलप्रमाणे एकुण ०६ रस्त्यांचे भुसंपादन करणेकामी खालील तपशिलानुसार रक्कम रुपये ३७,२५,५२,४९५/- कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द करणेपूर्वी आणि

उर्वरीत रक्कम कलम ११ खालील निवाडा जाहिर करणेपूर्वी बिनव्याजी ठेव म्हणून शासनाकडे जमा करावी असे कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रयोजन | संपादन करावयाचे क्षेत्र चौ.मी. | मा. दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेली सन २०१२ चे मुल्यदराप्रमाणे संपादन करावयाचे क्षेत्राची येणारी एकूण रक्कम | शासनाकडे जमा करावयाची एकूण येणारी २/३ रक्कम ३% आस्थापना खर्चासह |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिडी मंजूर विकास योजनेतील १५ मी. रुदीचा बिरेंगाव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता-२४ मी.रुंदीचा रस्ता) भुसंपादन | २२९१ | १९०८४८०० | १३१०४८९६/- |
| ०२ | शिडी विकास योजनेतील १५ मी. रुदीचा रस्ता-(जैंन मंदिरालगत नगर मनमाड ते १८ मी. वळण रस्ता) भुसंपादन | ४८१५ | ४४४३८९०० | ३०५१४७११/- |
| ०३ | शिडी विकास योजनेतील १२ मी. रुदीचा रस्ता-हॉटेल गोराडिया समोरील (पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिव रस्ता) भुसंपादन | ३१५१.७ | ४७४९३६२० | ३२६१२०७९/- |
| ०४ | शिडी मंजूर विकास योजनेतील १५ मी. रुदीचा पिंपळवाडी रस्ता (- पुष्पांजली हॉटेल चौक ते २४ मी. रस्त्यापर्यंत) भुसंपादन | २१९६.२५ | २५३४१३२० | १७४०१०३९/- |
| ०५ | शिर्डी मंजूर विकास योजनेतील १५ मी. रुदीचा रस्ता ( पिंपळवाडी रस्ता ते १८ मी. वळणरस्ता यांना जोडणारा रस्ता रुंदावन इमारतीकडे जाणारा रस्ता ) भुसंपादन | ४९५० | ४९६६३०८० | ३४१०१९८२/- |
| ०६ | विकास योजनेतील २४ मी. रुदीचा रस्ता (साईश्रद्धा सोसा. कॉर्नर ते निमगाव शिव-पुर्व/पश्चिम व दक्षिण उत्तर रस्ता) भुसंपादन | ६९९५६.०७ | ३५६५३०७६० | २४४८१७७८८/- |
| | एकूण | ८७३६०.०२ | ५४२५५२१८०/- | **३७२५५२४९५/-** |

उपरोक्त प्रमाणे ०६ रस्त्यांचे भुसंपादन प्रकरणात येणारे एकूण क्षेत्र ८७३६०.०२ चौ.मी. करिता सन २०१२ चे बाजार मुल्यदरानुसार मा. दुय्यम निबंधक, राहाता यानी दि.०८/०१/२०१२ चे पत्राने कळविलेली अंदाजे रक्कम व त्या सोबत दर्शविलेल्या रकमेवर ३०% +१२% अतिरीक्त घटकांची रक्कम आणि त्यावर येणारी ३% अस्थापना खर्चाची रक्कम अशी एकुण रु. ३७,२५,५२,४९५/- मात्र तत्काळ शासनाकडे बिनव्याजी ठेव म्हणून जमा करावी असे कळविले आहे.

मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी मागणी केलेली २/३ रकमेत सात रस्त्यांपैकी ४५ मीटर रुंदीचा बायपास (नगर-मनमाड रस्ता ते नांदुर्खी रस्ता ते कनकुरी रस्ता ते नाला रस्ता व पुढे) या रस्त्याचे भुसंपादन व विकसनासाठी येणारे खर्चाचा समावेश नाही.

मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी मागणी केलेली सहा रस्त्यांचे भुसंपादन व इतर अनुषंगीक खर्चापोटी २/३ रक्कम (रुपये ३७,२५,५२,४९५/-) अदा करणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त सहा रस्ते व ४५ मी. रुंदीचा बायपास या रस्त्यांचे भू-संपादनासाठी येणाऱ्या खर्चास अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घ्यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५०** **श्री रामनवमी उत्सव २०१२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी दि. ३१ मार्च, २०१२ ते दि. ०२ एप्रिल, २०१२ अखेर "श्रीं " चा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे व तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी याकरीता मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, धर्मशाळा परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी तसेच मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे

येथे कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत व विद्युत व्यवस्थेसह तात्पुरते स्वरुपात उभारणी करणे, आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(अ) श्री रामनवमी उत्सव २०१२ करीता करावयाची मंडप व्यवस्था :-**

**अ (१) समाधी मंदिर, जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनगर इ. परिसरात करावयाचे मंडप, स्टेज, पार्टीशन, बॅरेकेटींग व दर्शन रांगेकरीता कनात इ. व्यवस्था.**

(कालावधी दि.३१/०३/२०१२ ते ०२/०४/२०१२)

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१. | मंगल कार्यालय, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईनगर मैदान परिसर तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. तसेच कुस्ती ग्राउंडवर शामियाना मंडप उभारणे | ५००५५ चौ. फुट |
| ०२. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०'x२०' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६०० चौ.फुट |
| ०३. | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४ चौ.फुट |
| ०४. | साईनगर व भक्तनिवासस्थान येथे बाथरुम व्यवस्थेसाठी तात्पुरते कापडी / पत्र्याचे पार्टीशन | ५०० र.फुट |
| ०५. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था | १५०० र.फुट |
| ०६. | दर्शन रांगेसाठी कनात | ८०० र.फुट |
| | **अ (१) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु.** | २,३१,३४५/- |

**अ (२) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल. | परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी व घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३१,६०० चौ. फुट | दि.२२/०३/२०१२ ते २७/०३/२०१२ अखेर ०६ दिवस |
| ०२. | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ७६,६५१. चौ. फुट | दि. २६/०३/२०१२ ते ३०/०३/२०१२ अखेर ०५ दिवस |
| ०३. | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-कोऱ्हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३२७३० चौ. फुट | दि. २६/०३/२०१२ ते ३०/०३/२०१२ अखेर ०५ दिवस |
| | **अ (२) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु.** | | ९,३०,०००/- |
| | **श्री रामनवमी उत्सवाकरीता करावयाचे मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणारा एकूण अपेक्षित अंदाजे खर्च (अ) रु.** | | ११,६१,३४५/- |

**(ब) उन्हाळया चे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाची मंडप व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये (समाधि मंदिर उत्तर बाजू, सभाकुंड, समाधि मंदिर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्री चे चावडी समोर, नंदादीप मागील बाजू, दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट, शनि, महादेव, श्री गणेश मंदिर समोर, समाधी मंदिर उत्तरे कडील मंडप ते कॅलेंडर विक्री स्टॉलपर्यंत, श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत, गेट नं. ३ ते श्री मारुती मंदिर, गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने, उदी काउंटर समोर, प्रवेशव्दार ४ ते नंदादिप पर्यंत दर्शन रांगेसाठी (लेंडीबागेतून), दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, साई कॉम्पलेक्स समोरील मोकळ्या जागेत, श्री साई कॉम्पलेक्स मधील देणगी काउंटर व बुक स्टॉल समोर, श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर श्री साई प्रसादालय प्रवेशव्दार ते तिकीट काऊंटरपर्यंत व श्री साईबाबांचे शिल्पापर्यंत, इ. भागात ताडपत्रीचे छत | ७०,००० चौ. फुट | दि.०१/०३/२०१२ ते १५/०६/२०१२ अखेर १०७ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| | असलेले कापडी मंडप उभारणे | | |
| ०२. | जुने प्रसादालय, साईउद्यान परिसरामध्ये शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे | ३४,३०० चौ.फुट | दि.०१/०३/२०१२ ते १५/०६/२०१२ अखेर १०७ दिवस |
| उन्हाळ्याचे कालावधीत करावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च (ब) रु. | | | २४,२३,०१५/- |

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल बांधकाम करण्यात येत असलेल्या "साई आश्रम" इमारती श्री रामनवमी उत्सवापुर्वी साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध झाल्यास वरीलपैकी जुना प्रसादालय परिसर, साईनगर व भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) येथिल निवासव्यवस्थेसाठी असलेल्या मंडपांची आवश्यकता भासणार नाही. वरीलप्रमाणे स्टेज, मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी अशा प्रकारचे मंडप व्यवस्थेचे काम करणारे खालील ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविता येतिल.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०८ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव |
| ०३ | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, (सावता मंडप) राहाता | १० | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १२ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी |
| ०६ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | १३ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर |
| ०७ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | १४ | जीस आयडीयाज प्रा. लि., मुंबई |

तरी वरीलप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव मंडपासाठी येणारे रु.११,६१,१४५/- व उन्हाळ्यासाठी उभारावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारे रु.२४,२३,०१५/- मात्रचे खर्चास व वरिल मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयासाठी उभारावयाचे मंडप टाकणेकामी ठेकेदारांकडून कोटेशन्स मागविणेस, तसेच श्रीरामनवमी उत्सव मंडपासाठी येणारे रु.११,६१,३४५/- व उन्हाळी मंडपासाठी येणारे रु.२४,२३,०१५/- मात्रचे अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमख)

---

**विषय नं.५१** **साईआश्रम प्रकल्पाचे लॅण्डस्केपिंगसाठी करावयाचे सिव्हिल व इतर अनुषंगिक कामांबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम देणगी दाखल करणेत येत आहे. तसेच या प्रकल्पातील परिसर विकासाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे प्रगतीपथावर आहे. त्यासाठी संस्थानमार्फत ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. साई आश्रम प्रकल्पाचे लॅण्डस्केपींगचे कामाकरीता प्रकल्पाचे आर्कीटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांनी प्राथमिक नकाशे तयार केले होते. परंतू आता मा.श्री.के.व्ही.रमणी सो यांचेतर्फे आर्किटेक्ट शोभा भोपटकर यांची लॅण्डस्केप आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार आर्कीटेक्ट शोभा भोपटकर यांनी लॅण्डस्केपिंगसाठी सुधारीत नकाशे सादर केले.

❖ दि.१४/०७/२०११ रोजीचे साईट पहाणी व मिटींगचे वेळी मा. श्री. रमणी सो., यांनी शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक यांचेकडून लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक सिव्हील वर्क करुन घेण्याचे कळविले आहे. लॅण्डस्केप आर्किटेक्ट भोपटकर यांनी तयार केलेल्या नकाशांवर मा. श्री. रमणी सो., यांनी दि.२७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मान्यता दर्शविली आहे. दि.१३/११/२०११ रोजीचे ई-मेलव्दारे मा. श्री. रमणी सो यांनी साई आश्रम प्रकल्पाचे लॅण्डस्केपींगचे कामामधील सिव्हिल वर्क हे संस्थानने करावे व त्यासाठी येणारा रु.१.४० कोटी मात्रचा खर्च संस्थानने करावा असे कळविले आहे. तसेच सदर कामामधील लॅण्डस्केपींग, लॉन, प्लॅन्टेशन इ. ची कामे व त्यासाठी आवश्यक रु.१.५० कोटी मात्रचा खर्च शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई हे करतील असे कळविले आहे.

❖ लॅण्डस्केप आर्किटेक्ट शोभा भोपटकर यांनी दि.२२/१२/२०११ रोजीचे ई-पत्राव्दारे पाठविलेल्या एस्टिमेटनुसार साई आश्रम प्रकल्पाचे भाग- I व II चे सिव्हील वर्क, विद्युतीकरण, वॉटर फाउंटन व इतर कामांसाठी एकूण रु.२,७९,५४,८४३/- मात्र इतका अपेक्षीत खर्च कळविला होता. त्यामध्ये विद्युतीकरणासाठी रु.५४.२९ लक्ष इतका अंदाजे खर्च नमूद केलेला होता. त्याबाबत आर्कीटेक्ट यांचेशी चर्चा केली असता, उपरोक्त प्रकल्पाचे साईटवर बाहेरील परिसरात स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम झालेले असल्याने एस्टीमेट मधिल गार्डन लाईटींगची बाब वगळणेत यावी असे त्यांनी सुचविले. त्यानुसार विद्युतीकरण कामासाठी रु.३३,३४,७५८/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच चिल्ड्रन्स प्ले एरियासाठी खरेदी करावयाच्या नर्मदा नदी पात्रातील वाळुसाठी रु.२५,३१,०००/- मात्र इतका खर्च नमूद केला आहे.

त्यासाठी रु.५०००/- प्रति घनमिटर असा दर धरण्यात आला आहे. पंरतू विद्यमान बाजारभावाप्रमाणे हा दर अंदाजे रु.२,५००/- प्रति घनमिटर इतका आहे. त्यानुसार नर्मदा सॅण्ड खरेदीसाठी अंदाजे रु.१२,६५,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तपैकी लॅण्डस्केपींगचे सिव्हिलवर्कचे कामामध्ये प्लान्टर बांधकाम, प्लास्टर, पी.सी.सी., वॉटरबॉडी, सिटींग, पिण्याचे पाण्याचे पॉईंटस्, पाथवे, ट्रि पिट्स इ. कामांचा समावेश आहे. या कामांच्या बहुतांश बाबी मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नासिक यांचे निविदेमध्ये समाविष्ट आहेत.

❖ दि.२१/०१/२०१२ रोजी झालेल्या मा. स्थानिक विश्वस्त समिती सभेदरम्यान मा.विश्वस्त डॉ.श्री.गोंदकर सो., मा. कार्यकारी अधिकारी, यांचे समोर लॅण्डस्केप आर्कीटेक्ट शोभा भोपटकर,पुणे यांनी साई आश्रम प्रकल्प भाग-I व भाग - II चे लॅण्डस्केप नकाशांचे सादरीकरण केले. त्यावेळी मा. विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी सदरहु लॅण्डस्केप नकाशांप्रमाणे काम सुरु करणेस सहमती दर्शविली आहे.

❖ मा. श्री. के.व्ही. रमणी सो., यांनी दि.२७/०१/२०१२ रोजी शिर्डी येथिल भेटीदरम्यान 'साई आश्रम' साईटची पहाणी केली. त्यावेळी मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेदरम्यान साई आश्रम भाग-II येथे B-४ व B-६ या इमारतींचे पूर्वेकडील लॅण्डस्केपींगमध्ये मुख्य रस्त्यापासून ०६ मिटर रुंदीचा बस ड्रॉप ऑफ रोड तयार करण्याचे ठरले आहे. त्यासाठी रु.२४,८२,०३५/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरहू खर्चासह निविदेमधे समाविष्ट असलेल्या बाबींसाठी एकूण रु.१,२१,२१,९४९/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच सिव्हील वर्कच्या काही बाबी मे. शापुरजी यांचे निविदेत समाविष्ट नाहीत. उदा. कोटा सिटींग, कडप्पा फिटींग, शहाबाद फरशी, ग्रेनाईट इ. या बाबी चालू दरसुचीनुसार दरपृथ :करण करुन त्यांचा दर सल्लागार यांचेकडून प्रमाणीत करुन ठेकेदार यांना अदा करता येईल. (Extra Items) अशा अतिरिक्त बाबींकरीता रु.२०,७३,९००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. अशा प्रकारे सिव्हिल वर्कचे बाबींकरीता एकुण पूर्णांकीत रु.१,४२,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., यांचे परिसर विकासाचे मंजूर निविदा रकमेपैकी एकूण अंदाजे रु.१,१६,००,०००/- मात्र इतकी रक्कम शिल्लक राहण्याची शक्यता आहे. याप्रमाणे लॅण्डस्केपिंग सिव्हील वर्कसाठी येणाऱ्या एकूण अपेक्षित खर्चाची विगतवारी खालिल तक्यात नमूद केली आहे.

**तक्ता क्र. ०१ :-**

| अ.क्र. | तपशिल | SPCL यांचे निविदा दरांनुसार होणाऱ्या कामाची अंदाजे रक्कम | अतिरिक्त बाबींच्या कामाची अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम भाग-I | ५०,५९,३८४.४५ | ११,४१,९७५/- |
| ०२ | साई आश्रम भाग- II | ४५,८०,५२९.३८ | ९,३१,९२५/- |
| ०३ | साई आश्रम भाग-II बस ड्रॉप ऑफ रोड ६.०० मीटर रुंद | २४,८२,०३५/- | |
| | **एकूण** | **१,२१,२१,९४९/-** | **२०,७३,९००/-** |
| लॅण्डस्केपिंग सिव्हील वर्कसाठी अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (पूर्णांकित ) रुपये १,४२,००,०००/- | | | |
| ठेकेदार SPCL यांचे मंजूर निविदा रकमेपैकी शिल्लक राहण्याची शक्यता असलेली अंदाजे रक्कम रु.१,१६,००,०००/- | | | |
| लॅण्डस्केपिंग वर्कसाठी अपेक्षित अंदाजे वाढीव खर्च रक्कम रु.२६,००,०००/- | | | |

मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नाशिक यांचे परिसर विकासाचे मंजूर निविदा रकमेमध्ये वरीलप्रमाणे लॅण्डस्केपिंग सिव्हील वर्कचे कामाची तरतूद करण्यात आलेली असून त्यानुसार सदर रु.१,४२,००,०००/- मात्र खर्चाची सिव्हिल कामे मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., यांचे कामाचे स्कोपमध्ये समाविष्ट आहेत. त्यासाठी रु.२६,००,०००/- मात्र इतका अतिरिक्त खर्च येणार आहे. अशा प्रकारे लॅण्डस्केपिंगचे सिव्हील, विद्युतीकरण व इतर कामासाठी येणाऱ्या एकूण अपेक्षित खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ०२ :-**

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| **अ** | **लॅण्डस्केपींग सिव्हील वर्क :-** (ठेकेदार मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नाशिक यांचेमार्फत करावयाची कामे ) | १,४२,००,०००/- |
| **ब** | **निविदा मागवून करावयाची कामे** | |
| ०१ | लॅण्डस्केपींग विद्युतीकरण | ३३,३५,०००/- |
| ०२ | लॅण्डस्केपींग वॉटर फाउंटन व इलेक्ट्रोमेकॅनिकल वर्क | २६,००,०००/- |
| ०३ | कव्हर्ड सिटींग्ज , टॉयलेट ब्लॉक | ५९,७०,०००/- |
| ०४ | नर्मदा वाळू खरेदी | १२,६५,५००/- |
| | **एकूण रुपये (ब)** | **१,३१,७०,५००/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण रुपये (अ + ब) | २,७३,७०,५००/- |

वरील तक्ता क्र.२ चे (ब) मधील लॅण्डस्केपींग विद्युतीकरण, वॉटर फाउंटन व त्यासंबंधीत इलेक्ट्रो मेकॅनिकल वर्क, कव्हर्ड सिटींग, टॉयलेटस् व नर्मदा वाळु खरेदीची रु.१,३१,७०,५००/- मात्र खर्चाची कामे स्वतंत्रपणे निविदा मागवून करता येतील. कारण या कामांमधील बहुतांश बाबी या मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नासिक यांचे मंजूर निविदेत उपलब्ध नाहीत.

तरी लॅण्डस्केपिंगचे कामासाठी येणारे रु.२,७३,७०,५००/- मात्रचे एकूण अपेक्षित खर्चापैकी रु.१,४२,००,०००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाची सिव्हील कामे मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक यांचे कामाचे स्कोपमध्ये असल्याने निविदा शर्तीनुसार करुन घेणेस व त्यासाठी अंदाजे रक्कम रु.२६,००,०००/- मात्र इतक्या अपेक्षित वाढीव खर्चास मंजुरी मिळणेस विनंती. तसेच उर्वरित रु.१,३१,७०,५००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाचे कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे स्वतंत्रपणे निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लॅण्डस्केपिंगचे कामासाठी येणारे रु.२,७३,७०,५००/- मात्रचे एकूण अपेक्षित खर्चापैकी रु.१,४२,००,०००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाची सिव्हील कामे मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि.,नाशिक यांचे कामाचे स्कोपमध्ये असल्याने निविदा शर्तीनुसार करुन घेणेस व त्यासाठी अंदाजे रक्कम रु.२६,००,०००/- मात्र इतक्या अपेक्षित वाढीव खर्चास, तसेच उर्वरित रु.१,३१,७०,५००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाचे कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे स्वतंत्रपणे निविदा मागविणेसाठी मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमख)

---

**विषय नं.५२** **Air Circuit Breaker चे स्पेअरपार्टस् खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परीसर, साईनगर + श्री साईबाबा हॉस्पीटल, धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती, साईबाबा भक्तनिवासस्थान + शैक्षणिक संकुले व श्री साई प्रसादालय याठिकाणच्या इमारतींना वीजपुरवठयाकरीता स्वतंत्र पाच ठिकाणी सबस्टेशन उभारुन विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी याठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरिता स्वतंत्र ए.एम.एफ.पॅनेल बसविण्यात आलेले आहे.प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमार्फत येणारा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत.संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते १६०० ॲम्पीअर कॅपॅसिटीचे एल.अँड.टी.कंपनीचे प्रत्येकी रु.१,३०,००० ते २,१३,००० किंमतीचे एकुण ६० नग एअर सर्किट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.

जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे वीजपुरवठा चालू बंद होण्याच्या वेळेस म्हणजेच जनरेटर सेट चालू बंद होण्याच्या वेळेस कंट्रोल सर्किटव्दारे ऑटोमॅटीक ON / OFF होतात. त्याचप्रमाणे मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे Mannually ON / OFF करावे लागतात. सततच्या ON / OFF होण्याच्या क्रियेमुळे कॉन्टॅक्ट ब्रेकरचे स्क्रू, नट, बोल्ट, कनेक्टर स्प्रिंग्ज हे लूज होत असतात. तसेच ब्रेकर ज्याठिकाणी सप्लायला जोडला जातो त्याठिकाणी स्पार्किंग होऊन कॉन्टॅक्टवर कार्बन जमा होत असतो त्यामुळे कधी कधी ब्रेकर चालू / बंद होण्यास व सप्लाय त्यामधून पास होण्यास अडथळा येवू शकतो. त्याचप्रमाणे एखादया मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल अथवा ए.एम.एफ. पॅनेल मधील एअर सर्किट ब्रेकर पासून पुढे जोडलेला एखादा मेनस्वीच अथवा विद्युत उपकरण अथवा मेनस्वीच भूसंपर्कित झाल्यास ज्या एअर सर्किट ब्रेकर मधून क्षमतेपेक्षा जास्त वीज प्रवाह वाहून पुढील हानी व धोका टळण्यासाठी एअर सर्किट ब्रेकरमधील Over current & Earth fault सेंन्सर कार्यान्वित होऊन वीज पुरवठा खंडीत होतो.त्यामुळे पुढील हानी अथवा धोका टळत असतो. संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे १९ वर्षापूर्वी बसविलेले आहेत. वरील सर्व कारणांमूळे एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीज पुरवठा करण्यास काही अडथळा येऊ नये याकरिता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते.

यावर्षी आपण संस्थानमधील सर्व ६० नग एअर सर्कीट ब्रेकरची सर्व्हिसिंग मे.लार्सन अँड टुब्रो लि.,मुंबई यांचेकडून करुन घेतलेली आहे. सर्व्हिसिंग करतेवेळेस एअर सर्कीट ब्रेकरमधील काही स्पेअरपार्ट हे ब्रेकर सतत ऑन-ऑफ होण्याचे क्रियेमुळे खराब झाल्याचे आढळले आहे. त्यामुळे ते नविन बसवून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

एअर सर्कीट ब्रेकरचे स्पेअरपार्ट हे मे.लार्सन अँड टुब्रो लि.ग्राहकास डायरेक्ट विकत देत नाही. तर सदरील स्पेअरपार्ट हे त्यांचे अधिकृत डिलरकडून विकत घ्यावे लागतात. नाशिक येथील मे.लार्सन

अँड टुब्रो लि.चे डिलर मे.जाधव इलेक्ट्रीकल्स यांचेकडून स्पेअरपार्ट खरेदी करावेत म्हणून मे.लार्सन अँड टुब्रो लि.,मुंबई यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी दिलेले दर योग्य आहेत असे कळविलेले आहे. तरी विविध ठिकाणच्या एअर सर्कीट ब्रेकरमध्ये बसविण्याकरीता खरेदी कराव्या लागणा-या स्पेअरपार्टचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Product Description | Unit | Qty. | Cat No. | MRP Each | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | FRCD C2 ACB | 4 | 4 | SL908250000 | Rs.14,320/- | 0,57,280.00 |
| 2 | Spring Kit | 10 | 10 | SL908930000 | Rs.01,280/- | 0,12,800.00 |
| 3 | Hardware Kit | 10 | 10 | SL910930000 | Rs.02,320/- | 0,23,200.00 |
| 4 | Arcing Contacts Moving | 12 | 12 | SL938920000 | Rs.02,200/- | 0,26,400.00 |
| 5 | Arcing Contacts fix | 4 | 12 | SL938910000 | Rs.02,200/- | 0,26,400.00 |
| 6 | Under Voltage Release 240V | 2 | 2 | SL92720B000 | Rs.02,680/- | 0,05,360.00 |
| 7 | Shunt Release 240V | 2 | 2 | SL927180B00 | Rs.01,840/- | 0,03,680.00 |
| 8 | Shunt Release 24V DC | 2 | 2 | SL927180400 | Rs.01,840/- | 0,03,680.00 |
| 9 | Closing Coil 240V | 2 | 2 | SL910800000 | Rs.02,320/- | 0,04,640.00 |
| 10 | Thermo Magnetic Release DN-1 | 4 | 4 | SL931520000 | Rs.08,000/- | 0,32,000.00 |
| 11 | Spring Charging Motor 240V AC | 2 | 2 | SL003150000 | Rs.13,200/- | 0,26,400.00 |
| 12 | Shutter Assy 800/1000A | 30 | 90 | SL918330000 | Rs.00,800/- | 0,72,000.00 |
| | | | | | TOTAL | 2,93,840.00 |
| | | | | | VAT 12.5% | 0,36,730.00 |
| | (Rs. Three Lakh Thirty Thousand five Hundred Seventy only.) | | | | **GR TOTAL** | **3,30,570.00** |

उपरोक्तप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकरच्या स्पेअरपार्टस्‌ची खरेदी मे.लार्सन अँड टुब्रो लि.यांचे अधिकृत डिलर मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचेकडून खरेदी करणेस व येणा-या रक्कम रुपये ३,३०,५७०/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Air Circuit Breaker चे स्पेअरपार्टस् खरेदी करणेकामी मे.लार्सन अँड टुब्रो लि.यांचे अधिकृत डिलरकडून निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,३०,५७०/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५३** **साईनगर १०१० केव्हीए जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईनगर १०१० केव्हीए जनरेटर साठी पत्राशेड तयार करण्यात आलेले आहे. सदर शेडची उंची जास्त असल्याने पावसाळयात पावसाचे पाणी जनरेटरच्या कॅनॉपीवर पडून कॅनॉपीचे पत्रे सडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनरेटर खराब होऊ शकते. त्याकरीता पावसाचे पाणी आत येऊ नये, तसेच ऊन व वारा यापासून जनरेटर सेटचे संरक्षण व्हावे म्हणून जनरेटरशेडच्या साईडने पत्रे लावणे आवश्यक आहे.

साईनगर १०१० केव्हीए जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन बसविणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ४० X ४० X ५ एम.एम. | १३०० कि.ग्रॅ. | रु. ८०/-<br>(प्रति कि.ग्रॅ.) | रु. ०१,०४,०००.०० |
| ०२) | पन्हाळी पत्रा (कलर कोटेड)<br>साईज :- १२` X ३.१/२` X ०.५० एम.एम. | ४५ नग. | रु. २,२००/- (प्रति नग) | रु. ०,९९,०००.०० |
| ०३) | जी.आय. J हुक, साईज :- २.१/२`` | ४५डझन | रु. ८०/-<br>(प्रति डझन) | रु. ०,०३,६००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु.२,०६,६००.००** |

उपरोक्तप्रमाणे साईनगर १०१० केव्हीए जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.२,०६,६००/-इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर १०१० केव्हीए जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,०६,६००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५४** **गेट नं.३ (मारुती मंदिराजवळ), कॅश काऊंटींग मेन गेट ते सिक्युरिटी ऑफिस (मंदिर मुख्य प्रवेशद्वार), उदी काऊंटर, शनिगेट (व्ही.आय.पी. दर्शन लाईन) या ठिकाणी मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग/ वॉकर तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई मंदीर हे जागतिक किर्तीचे धार्मिक स्थळ असून देशातून तसेच परदेशातून साईभक्त दर्शनाकरीता येतात. सर्व क्षेत्रातील महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्ती श्रींचे दर्शनाकरीता येत असतात. येणा-या साईभक्तांमध्ये व्ही.आय.पीं च्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून भविष्यातसुद्धा वाढ होत राहील.

सध्या देशात अतिरेक्यांच्या कारवायांमध्ये वाढ झालेली असून सर्व धर्मांच्या महत्वाच्या धार्मिक स्थळांवर लक्ष केंद्रीत केले असून धार्मिक स्थळांवर हल्ले, बॉम्बस्फोट इत्यादि प्रकार सातत्याने केले जात आहेत. शिर्डी येथील श्री साईबाबांचे समाधी मंदीर हे अतिमहत्वाचे धार्मिक स्थळ असल्याने याठिकाणी असलेली सुरक्षा व्यवस्था उच्च दर्जाची, आवश्यक, प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी, साधन सामुग्री व सुविधा यांनी परिपुर्ण असलेलली आवश्यक आहे.

श्री साई मंदीराची सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आलेली असून त्याअनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील आवश्यक बाबींची तात्काळ पुर्तता करणे गरजेचे आहे.

संस्थान परीसरात विविध ठिकाणी भक्तांची गर्दी कन्ट्रोल करण्यासाठी व सुलभ दळणवळणासाठी रेलीगची / वॉकरची गरज असून त्यांचा तपशील खाली दिलेला आहे.

**(१)** गेट नं ३ मध्ये रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर रु | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज - २५ एमएम x१.६ एमएम जाडी | १२०० फूट | ७०/- | ८४,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम x ४० एमएम x २.०एमएम | ६०० फूट | ३००/- | १,८०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम x ८ एमएम | १०० फूट | ४००/- | ४०,०००/- |
| ०४) | नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | २०,०००/- |
| ०५) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | १६,२००/- |
| | | | एकुण | ३,४०,२००/- |

**(१)** कॅश काउंटींग मेन गेट ते सिक्युरीटी ऑफीस ( मंदिर मुख्य प्रवेशद्वार ) रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज - २५ एमएम x १.६ एमएम जाडी | ६०० फूट | ७०/- | ४२,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम x ४० एमएम x २.०एमएम | ४०० फूट | ३००/- | १,२०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम x ८ एमएम | १०० फूट | ४००/- | ४०,०००/- |
| ०४) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | १०,१००/- |
| एकुण | | | | २,१२,१००/- |

**(२)** उदी काऊंटर वॉकर रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज - २५ एमएम x १.६ एमएम जाडी | १८०० फूट | ७०/- | १,२६,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम x ४० एमएम x २.०एमएम | १२०० फूट | ३००/- | ३,६०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम x ८ एमएम | १४० फूट | ४००/- | ५६,०००/- |
| ०४) | नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | ३०,०००/- |
| ०५) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | २८,६०० |
| | | | एकुण | ६,००,६००/- |

**(३)** शनिगेट ( व्ही. आय.पी.दर्शनलाईन) रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज - २५ एमएम x १.६ एमएम जाडी | १४०० फूट | ७०/- | ९८,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम x ४० एमएम x २.०एमएम | १००० फूट | ३००/- | ३,००,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम x ८ एमएम | २०० फूट | ४००/- | ८०,०००/- |
| ०४) | नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | २०,०००/- |
| ०५) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | २४,९००/- |
| | | | एकुण | ५,२२,९००/- |

ऊपरोक्तप्रमाणे एकुण रु. १६,७५,८००/- अपेक्षित आहे. वरील काम स्टेनलेस स्टीलचे असल्याने बाहेरील वर्कशॉपधारकांकडून रेलींग तयार करुन बसवून घ्यावे लागेल.

प्रस्तावावर विचार होऊन उपरोक्त कामासाठी येणाऱ्या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, गेट नं.३ (मारुती मंदिराजवळ), कॅश काऊंटींग मेन गेट ते सिक्युरिटी ऑफिस (मंदिर मुख्य प्रवेशद्वार), उदी काउंटर, शनिगेट (व्ही.आय.पी. दर्शन लाईन) या ठिकाणी मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग/ वॉकर तयार करुन बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १६,७५,८००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५५ साई कॉम्प्लेक्ससमोर पिंपळवाडी रोडवरील मोकळया जागेत मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व चरणी श्रद्धा सुमन अर्पण करण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगभरातून हजारो साईभक्त दररोज सतत शिरडीत ये जा करीत असतात. दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत आहे. कधी कधी हा आकडा लाखोच्या घरात जातो. त्यामुळे सध्या असलेल्या दर्शन लाईन हॉलमधील जागा कमी पडत आहे. अलिकडे बऱ्याच वेळा भक्तांची गर्दी वाढल्याने दर्शन लाईन मधील रांगा कमी पडल्या आहेत.

त्याकरीता भक्तांची गर्दी लक्षात घेता मा.व्य.समितीचे दि. २४-०९-२०११ चे सभेतील विषय क्र. ०५ निर्णय क्र. ६७८ अन्वये शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील नगर मनमाड रोड पासून ते गेट नं. २ पर्यंत पिंपळवाडी रोडवर रु. २६,४६,०००/- इतक्या खर्चाचे मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करून बसविण्यात आल्याने दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता आले. हे रेलींग मुव्हेबल असून केव्हाही ते लावता येईल व काढून घेता येईल अशा प्रकारचे बनविण्यात आलेले आहे. जेणेकरुन रस्त्याच्या मूळ ढाच्याला कोणतेही छिद्र न पाडता तयार करण्यात आलेले आहे.

साई कॉम्प्लेक्ससमोरील उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर उत्तरेकडील बाजूस कास्टींग रेलींग आहे. भक्तांची गर्दी झाल्यानंतर या कास्टींग रेलींगवर भक्तांच्या गर्दीचा दाब येतो. हे कास्टींग रेलींग कमकुवत असून जर हे रेलींग भक्तांच्या गर्दीचा दाबामुळे तुटले तर भक्तांची पळापळ होऊन प्राण हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग वॉकर रेलींगचा अनुभव चांगला असून या रेलींगप्रमाणेच साई कॉम्प्लेक्ससमोरील पिंपळवाडी रोडच्या मोकळ्या जागेत अशा प्रकारचे मुव्हेबल वॉकर रेलींग केले तर दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता येईल व प्रत्येक वेळेस गर्दीच्या वेळेस जे बांबू लावून तात्पुरते रेलींग तयार करतो त्याची गरज भासणार नाही. तसेच कास्टींग रेलींगवर भक्तांच्या गर्दीचा दाब येणार नसल्याने पुढील अनर्थ टळू शकेल.

साई कॉम्प्लेक्ससमोर पिंपळवाडी रोडवरील मोकळया लागेत मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साइज - २५ एमएम X १.६ एमएम जाडी | ५४०० फूट | ७०/- | ३,७८,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साइज - ४० एमएम X ४० एमएम X २.०एमएम | २७०० फूट | ३००/- | ८,१०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम X ८ एमएम | २५० फूट | १२५/- | ३१,२५०/- |
| ०४) | नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | १८,०००/- |
| ०६) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | १,५०,०००/- |
| एकुण | | | | १३,८७,२५०/- |

वरील काम स्टेनलेस स्टीलचे असल्याने बाहेरील वर्कशॉपधारकांकडून रेलींग तयार करुन बसवून घ्यावे लागेल.

प्रस्तावावर विचार होऊन उपरोक्त कामासाठी येणाऱ्या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई कॉम्प्लेक्ससमोर पिंपळवाडी रोडवरील मोकळया जागेत मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर तयार करुन बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १३,८७,२५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५६** **शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व चरणी श्रद्धा सुमन अर्पण करण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगभरातून हजारो साईभक्त दररोज सतत शिरडीत ये जा करीत असतात. दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत आहे. कधी कधी हा आकडा लाखोच्या घरात जातो. त्यामुळे सध्या असलेल्या दर्शन लाईन हॉलमधील जागा कमी पडत आहे. अलिकडे बऱ्याच वेळा भक्तांची गर्दी वाढल्याने दर्शन लाईन मधील रांगा कमी पडल्या आहेत.

त्याकरीता भक्तांची गर्दी लक्षात घेता मा.व्य.समितीचे दि. २४-०९-२०११ चे सभेतील विषय क्र. ०५ निर्णय क्र. ६७८ अन्वये शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील नगर मनमाड रोड पासून ते गेट नं. २ पर्यंत पिंपळवाडी रोडवर रु. २६,४६,०००/- इतक्या खर्चाचे मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करून बसविण्यात आल्याने दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता आले. हे रेलींग मुव्हेबल असून केव्हाही ते लावता येईल व काढून घेता येईल अशा प्रकारचे बनविण्यात आलेले आहे. जेणेकरुन रस्त्याच्या मूळ ढाच्याला कोणतेही छिद्र न पाडता तयार करण्यात आलेले आहे.

शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर उत्तरेकडील बाजूस कास्टींग रेलींग आहे. भक्तांची गर्दी झाल्यानंतर या कास्टींग रेलींगवर भक्तांच्या गर्दीचा दाब येतो. हे कास्टींग रेलींग कमकुवत असून जर हे रेलींग भक्तांच्या गर्दीचा दाबामुळे तुटले तर भक्तांची पळापळ होऊन प्राण हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग वॉकर रेलींगचा अनुभव चांगला असून या रेलींगप्रमाणेच शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर अशा प्रकारचे वॉकर रेलींग केले तर दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता येईल व प्रत्येक वेळेस गर्दीच्या वेळेस जे बांबू लावून तात्पुरते रेलींग तयार करतो त्याची गरज भासणार नाही. तसेच कास्टींग रेलींगवर भक्तांच्या गर्दीचा दाब येणार नसल्याने पुढील अनर्थ टळू शकेल.

शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर वॉकर रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज - २५ एमएम x १.६ एमएम जाडी | ६९०० फूट | ७०/- | ४,८३,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप साईज - ४० एमएम x ४० एमएम x २.०एमएम | ४५०० फूट | ३००/- | १३,५०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी शेप बॉटम पट्टी साईज - ५० एमएम x ८ एमएम | ५०० फूट | ४००/- | २,००,०००/- |
| ०४) | नटबोल्ट + हिंजेस व टॉवर बोल्ट | लम्पसम | | ५०,०००/- |
| ०५) | फॅब्रिकेशन, फिटींग व इतर चार्जेस + टॅक्सेस | लम्पसम | | १,०४,१५०/- |
| एकुण | | | | २१,८७,१५०/- |

वरील काम स्टेनलेस स्टीलचे असल्याने बाहेरील वर्कशॉपधारकांकडून रेलींग तयार करुन बसवून घ्यावे लागेल.

प्रस्तावावर विचार होऊन उपरोक्त कामासाठी येणाऱ्या खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोड फुटपाथवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर तयार करुन बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा**

**मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २१,८७,१५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५७ सनफिस्ट कंपनीचे स्नॅक व स्विट अॅण्ड सॉल्ट बिस्कीटे खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ कॅन्टीन विभागासाठी आवश्यक सनफिस्ट बिस्कीटे पुरविणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/ वशी/ खरेदी-प्रसाद/७२९/२०११, दि.०३/०५/२०११ नुसार मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांना पुरवठा आदेश देणेत आला आहे.

मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांचेकडून माहे एप्रिल-११ पासून दि.३१.१०.२०११ अखेर खालीलप्रमाणे बिस्कीटांचा पुरवठा झालेला आहेत.

| अ. नं. | मालाचा तपशिल | कंपनी | दर प्रति नग | पुरवठा आदेशाप्रमाणे मागणी | दि.३१.१०.११ अखेर पुरवठा केलेला माल | जादा/कमी पुरवठा केलेला माल |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | बिस्कीटे - सनफिस्ट ग्लुकोज - लहान | सनफिस्ट | कंपनी दरावर ३% सुट + १२.५% व्हॅट | १,००,००० पुडे किंवा आवश्यकतेनुसार | १,८८,४९६ पुडे | ८८,४९६ पुडे जादा |
| ०२. | बिस्कीटे - सनफिस्ट स्नॅकी - लहान ६६ ग्रॅम | सनफिस्ट | | ४०,००० पुडे किंवा आवश्यकतेनुसार | २४२७६ पुडे | १५७२४ पुडे कमी |
| ०३. | बिस्कीटे - सनफिस्ट स्वीट अॅण्ड सॉल्ट लहान ७५ ग्रॅम | सनफिस्ट | | ३१,००० पुडे किंवा आवश्यकतेनुसार | ११९५२ पुडे | १९०४८ पुडे कमी |

मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांनी दि.१७.०१.२०१२ चे ई.मेलमध्ये "आम्ही आपणास सनफिस्ट बिस्कीट पुरवितो परंतू सदर बिस्कीटांचे उत्पादन कंपनीने बंद केलेले आहे, कंपनीने त्याचे ऐवजी खालील तपशिला प्रमाणे उत्पादन सुरु केलेले आहे.

| अ.नं. | मालाचे वर्णन | वजन जुने | जुने दर रु. | वजन नवे | नवीन दर रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सनफिस्ट ग्लुकोज | ६० ग्रॅम | ३-६५ | ८० ग्रॅम | ४-४६ |
| ०२ | सनफिस्ट स्नॅकी | ६६ ग्रॅम | ६-२५ | ९३ ग्रॅम | ८-९३ |
| ०३ | सनफिस्ट स्वीट अॅण्ड सॉल्ट | ७५ ग्रॅम | ६-२५ | १०० ग्रॅम | ८-९३ |

सदरचे दर हे व्हॅटसह आहेत. तरी कृपया नोव्हेंबर २०११ पासून बदललेल्या दराप्रमाणे ऑर्डर मिळावी." अशी विनंती केली आहे.

पुरवठाधारकाकडून खरेदी केलेली बिस्किटे संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे साईभक्तांना विक्रीसाठी ठेवण्यात येतात. पुरवठाधारकाकडून संस्थानला कंपनी दरामध्ये ३% सुट मिळते.

माहे मार्च, १२ अखेर मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांचेकडून खालीलप्रमाणे बिस्किटे पुरविणे बाकी आहेत

१) सनफीस्ट ग्लुकोज ६० ग्रॅम वजन- प्रति नग रु.३-६५ पैसे १,००,०००/- नवीन तरतूदीप्रो.

२) सनफीस्ट स्नॅकी ६६ ग्रॅम वजन - प्रति नग रु.६-२५ पैसे १५७२४ नग पुडे

३) सनफिस्ट स्वीट अॅण्ड सॉल्ट ७५ ग्रॅम वजन प्रति नग रु.६-२५पै. १९०४८ नग पुडे

तरी मे.कोठारी अॅण्ड ब्रदर्स, कोपरगांव यांचेकडून पुरवठा होणे बाकी असलेले बिस्कीटाऐवजी वर नमूद केलेप्रमाणे नवीन वजनाचे व किंमतीचे बिस्कीटे खरेदी करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

आदेशासाठी सादर.

**निर्णय क्र.२२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.कोठारी अॅण्ड ब्रदर्स, कोपरगांव यांचेकडून पुरवठा होणे बाकी असलेले सनफिस्ट कंपनीचे स्नॅक व स्विट अॅण्ड सॉल्ट बिस्कीटाऐवजी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे नवीन वजनाचे व किंमतीचे बिस्कीटे खरेदी करणेकामी मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.५८ सन २०१२-१३ या वर्षासाठी गावरान तूप खरेदीकामी करण्यात आलेल्या पहाणी अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सन-२०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये खरेदी करावयाच्या गाईचे गावरान तुपाची खरेदी करावयाचे असल्यामुळे तुप उत्पादक यांचेकडे शुक्रवार दि.२७/०१/२०१२ रोजी मा.विश्वस्त श्री डॉ एकनाथराव गोदकर,मा.विश्वस्त.श्री.अशोकराव खांबेकर प्रशासकिय अधिकारी श्री बी.डी.साबळे ,श्री डी.टी.उगले ,श्री साई प्रसादालय अधिक्षक यांनी अग्रवाल मिल्क प्रॉडक्ट,मु.पो.किकवी ता.भोर.जिल्हा.पुणे व सोनाई मिल्क अॅण्ड मिल्क प्रा.लि.गोरवलीमु.पो.इंदापूर जिल्हा.पुणे या ठिकाणी समक्ष भेटी देण्यात आलेल्या आहेत त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) प्रथमतः दुपारी ३.०० वा अग्रवाल मिल्क ॲण्ड प्रा.लि.किकणी ता.भोर.जिल्हा.पुणे (राजयोग) या ठिकाणी भेट दिलेली आहे. सदर भेटीदरम्यान अग्रवाल मिल्कचे मालक श्री राजेश आग्रवाल उपस्थीत होते. सदरील भेटीत अग्रवाल मिल्क प्रा.लि.यांचेकडे दररोज ३०००० लिटर गाईचे दुधाचे संकलन होते. दररोज सरासरी सुमारे २५०० किलो गावरान तुपाची उत्पादन केले जाते.त्याचे डेअरीमधून पनीर,मसाला दुध,ताक इत्यादी उपप्रदाथांची निमित्ती केली जाते.अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रा.लि.यांचेकडे दररोज निर्माण होत असलेल्या २५०० किलो गावरान तुपापैकी सुमारे १२०० ते १५०० किलो गावरान तुपाची किरकोळ स्वरुपात विक्री केली जाते. अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रा.लि.यांची वार्षिक उलाढाल रु.३० कोटी असल्याचे श्री योगेश आग्रवाल यांनी सांगितले. त्यांचेकडे दररोज जमा होणाऱ्या सरासरी ३०००० लिटर दुधापैकी १०००० लिटर दुधाचे पनीर ,मसाला दुधाची निमिर्ती केली जाते तर उर्वरीत २०००० लिटर दुधापासून गावारान तुपाचे उत्पादन केले जाते.

उर्वरीत जादा बटरची बाहेरुन विकत घेतले जाते. असे सांगणेत आले आहे. सदरील दुध संघाकडे F.D.R चा परवाना असून सदरील संघ ॲगमार्क प्रमाणीत केलेला नाही. अन्न सुरक्षा कायदा २०११ कायदाअन्वये वापरवयाचे तुप ॲगमार्क असणे बंधकारक आहे. सदरील दुध संघ I.S.O प्रमाणित नाही. अन्न सुरक्षा कायदा २०११ अन्वये संघ I.S.O प्रमाणित असणे आवश्यक आहे. सदरील संघाकडे सुमारे ७० कुशल /अकुशल कर्मचारी कार्यरत असून सदरील संघाचे दोन शिफ्टमध्ये काम चालते. श्री अग्रवाल यांनी ३३ लिटर गाईच्या दुधातुन १ किलो गावरान तुपाचे उत्पादन होते असे सांगितले त्यासाठी दुधाची स्निघता ३.८(फॅट) असणे आवश्यक आहे.

एकंदरीत संघाची दुधाची आवक व त्यापासून निर्माण होणारे तुप या बाबीचा विचार करता सदरील संघ तुपाचा पुरवठा करण्यास असमर्थ राहील.

२) त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता सोनाई मिल्क व मिल्क प्रा.लि.गोरवली ता. इंदापूर जिल्हा.पुणे या दुध संघाला भेट दिलेली आहे. सदरील भेटी दरम्यान संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री एस.एन.सिंग व प्रशासकिय व मार्केटिंगचे मुख्य श्री माने हे उपस्थीत होते. सदरील दुध संघाची स्थापना सन.२००२ मध्ये झालेली असून सदरील संघ ४० एकर क्षेत्रात उभारणी केलेली आहे. सदरील संघाची वार्षिक उलाढाल रु.५०० कोटी असून संघामार्फत स्किम मिल्क पावडर,बटर व गावरान तुपाची मुख्यता उत्पादन केले जाते. सदरील संघाकडे ६,००,००० लिटर दुध संकलन होत असून व ९०००००लि.दुध संकलन हाताळणी करावयाची मशिनरी उपलब्ध आहे. दररोज १,२५,००० लि.दुध होमोजिनाईज्ड पाश्चराईज्ड दुधाची मुंबई,पुणे,बिदर,गुलबर्गा यासारख्या शहरामधून विक्री केली जाते.

सदरील दुध संघाकडे दररोज ४० मेट्रीक टन मिल्क पावडर तयार केली जाते. सदर पावडर अमूल मिल्क, मदर इंडिया यासारख्या नांमाकित संघाला विक्री केली जाते. दररोज सरासरी २० टन(२००००किलो) गावरान तुप तयार केले जाते. सदर तुपाचे २०० ग्रॅम ,५००ग्रॅम,१किलो व १५ किलो टीनमध्ये विक्री केली जाते. सदर संस्थेकडे ३ वेगवेगळया अत्याधुनिक लॅब उपलब्ध केलेली आहे. प्रत्येक लॅबमध्ये कुशल कर्मचारी काम करतात. सदर संघाचे ३ शिफ्टमध्ये कामकाज चालते. संघामध्ये एकूण १००० कर्मचारी काम करतात. गाईचे १००० लिटर दुधापासून ३४ किलो गावरान तुपाची निमित्ती केली जाते तर १०००लिटर दुधापासून ८४ किलो दुध पावडर तयार केली जात असल्याचे संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सिंग यांनी सांगितले. सोनाई मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडॉक्ट प्रा.लि.इंदापूर या संघाकडे दररोज सुमारे २५ ते ३० मे.टन बटरची (लोणी) तयार केले जाते.त्यासाठी गाईचे दुधाची फॅट ३.५आवश्यक असते. गाईचे २३ लिटर दुधापासून १ किलो बटर तयार होते. असेही श्री सिंग यांनी सांगितले.

सदर संघास आय.एस.ओ. मांनाकन प्राप्त झालेला आहे. सदरील संघ ॲगमार्क प्रमाणीत केलेला आहे. अन्न सुरक्षा कायदा २०११ नुसार तुपास ॲगमार्क असणे कायदयाने बंधनकारक आहे. सोनाई मिल्क ॲण्ड मिल्क प्रा.लि. मु.पो.इंदापूर जिल्हा.पुणे संघास आय.एस.आय. प्रमाणित केलेला आहे.

सदरील संघाचे दररोज दुधाचे होणारे संकलन, त्यापासुन तयार होणारे बटर(लोणी) व तयार होणारे गावरान तुप याबाबीचा विचार करता सोनाई मिल्क व मिल्क प्रॉडक्ट.प्रा.लि.इंदापूर जिल्हा.पुणे हे आपल्याला आवश्यक्तेनुसार गावरान तुपाचा पुरवठा करु शकतात.

उपरोक्त पाहणी अहवालावर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२-१३ या वर्षासाठी गावरान तूप खरेदीकामी करण्यात आलेल्या पहाणी अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**तसेच,मे.सोनाई मिल्क ॲण्ड मिल्क प्रा.लि.,गोरवली, ता.इंदापूर,जि.पूणे यांचेकडून १ मार्च, २०१२ ते ३१ मार्च,२०१२ या कालावधीत प्रायोगिक तत्वावर तूप खरेदी करण्यात यावे.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.५९** **पाणी पुरवठा साहित्यांचा पुरवठा न केल्याने अनामत रक्कम संस्थान खाती जमा करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.१०.२०१० चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी मे. मार्क इंडस्ट्रीज,मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी /पा.पू./१०५८६ दि. २२/११/२०१० अन्वये आदेशासोबत देण्यात आलेल्या परिशिष्टात अ.नं. १ ते ३३ प्रकारचे साहित्य निम्नतम दराने एकूण रक्कम रु. ६,५२,३२६/- मात्र रक्कमेचा पुरवठा करणेचा आदेश देणेत आलेला होता. आदेशातील अट क्र. ३ मध्ये साहित्य पुरवठयाचा कालावधी दि. ०१ डिसेंबर २०१० ते ३० ऑगस्ट २०११ असा ८ महिन्याचा नमुद करणेत आलेला होता.

आदेशातील अट नं. ८ नुसार मे. मार्क इंडस्ट्रीज ,मुंबई यांचे बिल नं. १८९३ व १८९६ दि. ३१.१२.२०१० मधून अनामत रक्कम रु. ३२,६१७/- ( अक्षरी रुपये - बत्तीस हजार,सहाशे सतरा ) जमा करण्यात आलेली आहे.सदर रक्कम सस्थानमध्ये अनामत खाते जमा आहे.

मे. मार्क इंडस्ट्रीज,मुंबई यांनी पुरवठा आदेशातील फक्त ५ साहित्याचा केलेला पुरवठा वगळता २८ साहित्यांचा मुदतीत पुरवठा न केल्याने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस / खरेदी / पा.पू./१६५८ दि.०२/०७/ २०११ स्मरणपत्र क्र. १ देवून, सर्व २८ साहित्याचा पुरवठा त्वरीत करणेविषयी कळविणेत आले होते. तसेच साहित्यांचा पुरवठा न केल्यास निविदेसोबतची बयाणा रक्कम रु.३२,६१७/- मात्र संस्थान खाते जमा करुन घेणेत येईल व या पुढे आपण संस्थानचे साहित्य पुरवठा करणेची निविदा दाखल केलेस, तिचा विचार केला जाणार नाही,असे स्पष्ट कळविणेत आलेले आहे. मात्र त्यांनी सदर पत्राची दखल न घेता आदेशीत साहित्यापैकी २८ साहित्याचा पुरवठा केला नाही.

सन २०११ मध्ये मे. मार्क इंडस्ट्रीज,मुंबई यांनी परिशिष्टातील अ.नं. १ ते ३३ प्रकारचे एकूण साहित्यातील फक्त ५ साहित्यांचाच केलेला पुरवठा वगळता उर्वरित २८ साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. रु.३२,६१७/- मात्र पेनल्टी म्हणून वसूल करणेस मान्यता असावी.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.१०.२०१० चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी / पा.पू./ १०५८४ दि. २२/११/२०१० अन्वये आदेशासोबत देण्यात आलेल्या परिशिष्टात अ.नं. १ ते २७ प्रकारचे साहित्य निम्नतम दराने एकूण रक्कम रु. २,६२,५१०/- पुरवठा करणेचा आदेश देणेत आलेला होता.आदेशातील अट क्र. ३ मध्ये साहित्य पुरवठयाचा कालावधी दि. ०१ डिसेंबर २०१० ते ३० ऑगस्ट २०११ अखेर ८ महिन्याचा नमुद करणेतआलेला होता.

आदेशातील अट नं.०८ नुसार विहीत मुदतीत पुरवठा करण्याची हमी म्हणून मंजूर साहित्याच्या एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांचे बिल नं. ५७६५,५८०१ व ५८७८ मधून अनामत रक्कम रु. १३,१२६/- (अक्षरी रुपये तेरा हजार,एकशे सहवीस) जमा करण्यात आलेली आहे.सदर रक्कम सस्थानमध्ये अनामत खाते जमा आहे.

मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी पुरवठा आदेशातील फक्त ९ साहित्याचा केलेला पुरवठा वगळता १८ साहित्यांचा मुदतीत पुरवठा न केल्याने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस / खरेदी / पा.पू./ १६५७ दि.०२/०७/ २०११ स्मरणपत्र क्र. १ देवून उर्वरित सर्व १८ साहित्याचा पुरवठा त्वरीत करणेविषयी कळविणेत आले होते व साहित्यांचा पुरवठा न केल्यास संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु. १३,१२६/- मात्र संस्थान खाते जमा करुन घेणेत येईल. तसेच या पुढे कालावधीत आपण संस्थानचे साहित्य पुरवठा करणेची निविदा दाखल केलेस, तिचा विचार केला जाणार नाही,असे त्यांना स्पष्ट कळविणेत आलेले आहे. मात्र त्यांनी पत्राची दखल न घेता आदेशीत साहित्यापैकी १८ साहित्याचा पुरवठा केला नाही.

सन २०११ मध्ये मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी आदेशासोबतचे परिशिष्टातील अ.नं. १ ते २७ प्रकारचे एकूण साहित्यातील फक्त ९ साहित्यांचा केलेला पुरवठा वगळता १८ साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. १३,१२६/- मात्र पेनल्टी म्हणून वसूल करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११ मध्ये मे. मार्क इंडस्ट्रीज,मुंबई यांनी परिशिष्टातील अ.नं. १ ते ३३ प्रकारचे एकूण साहित्यातील फक्त ५ पाणी पुरवठा साहित्यांचा केलेला पुरवठा वगळता उर्वरित २८ साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. रु.३२,६१७/- मात्र तसेच, मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी आदेशासोबतचे परिशिष्टातील अ.नं. १ ते २७ प्रकारचे एकूण साहित्यातील फक्त ९ साहित्यांचा केलेला पुरवठा वगळता १८ साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. १३,१२६/- मात्र पेनल्टी म्हणून वसूल करण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.६०** **विद्युत साहित्यांचा पुरवठा न केल्याने अनामत रक्कम संस्थान खाती जमा करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.१०.२०१० चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी /विद्यूत / ११६६१ दि. १५/०१/२०११ अन्वये आदेशासोबत देण्यात आलेल्या परिशिष्टात अ.नं. १ ते १३ प्रकारचे इलेक्ट्रीक साहित्य निम्नतम दराने एकुण रक्कम रु. २,०९,१८०/- पुरवठा करणेचा आदेश देणेत आलेला होता.आदेशातील अट क्र. ३ मध्ये साहित्य पुरवठयाचा कालावधी दि. १५ जानेवारी २०११ ते ३१ मार्च २०११ असा अडीच महिने नमुद करणेत आला होता.

आदेशातील अट नं. ८ नुसार मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांचे बिल नं. ५९०१ दि. ३.२.२०११ मधून अनामत रक्कम रु. १०,४५९/- ( अक्षरी रुपये दहा हजार,चारशे,एकोणसाठ ) कपात करण्यात आलेली आहे.सदर रक्कम सस्थानमध्ये अनामत खाते जमा आहे.

मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी पुरवठा आदेशातील अ.नं.१,४ व ५ या फक्त ३ साहित्याचा केलेला पुरवठा वगळता उर्वरित १० साहित्यांचा मुदतीत पुरवठा न केल्याने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस / खरेदी / विद्यूत/१९०५ दि.१५/०७/२०११ स्मरणपत्र क्र. १ देवून,उर्वरित सर्व १० साहित्याचा पुरवठा त्वरीत करणेविषयी कळविणेत येवून साहित्यांचा पुरवठा न केल्यास संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु. १०,४५९/- मात्र संस्थान खाते जमा करुन घेणेत येईल. तसेच यापुढील कालावधीत आपण संस्थानचे साहित्य पुरवठा करणेची निविदा दाखल केलेस, तिचा विचार केला जाणार नाही,असे त्यांना स्पष्ट कळविणेत आलेले आहे. तथापी त्यांनी पत्राची दखल न घेता आदेशीत साहित्यापैकी १० साहित्याचा पुरवठा केला नाही.

सन २०११ मध्ये मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी आदेशासोबतचे परिशिष्टातील अ.नं. १ ते १३ प्रकारचे एकूण साहित्यातील अ.नं.१,४ व ५ या फक्त ३ साहित्यांचाच केलेला पुरवठा वगळता १० साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. १०,४५९/- मात्र पेनल्टी म्हणून वसूल करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२३० यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११ मध्ये मे. काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव यांनी आदेशासोबतचे परिशिष्टातील अ.नं. १ ते १३ प्रकारचे एकूण विद्युत् साहित्यातील अ.नं.१,४ व ५ या फक्त ३ साहित्यांचाच केलेला पुरवठा वगळता १० साहित्यांचा पुरवठा न केल्याने त्यांची अनामत रक्कम रु. १०,४५९/- मात्र पेनल्टी म्हणून वसूल करणेत यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.६१ कैलास ट्रेडिंग कं.,नांदेड यांचे हरभरा दाळीची बयाना रक्कम परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असणारा किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०४.२०११ मधील निर्णयानुसार मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांना खालील प्रमाणे पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.नं | मालाचा तपशिल | जात/ प्रकार | मागणी | सुट दर प्रती क्विंटल | रक्कम रुपये | सुरक्षा अनामत रक्कम ५% |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | हरबरा डाळ बिगर पॉलीश | B | ८००० क्विंटल | ३,२००/- | २,५६,००,०००/- | **१२,८०,०००/-** |
| ०२. | तुरदाळ लातुर फटका | A | १७०० क्विंटल | ६,०५०/- | १,०२,८५,०००/- | ५,१४,२५०/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **३,५८,८५,०००/-** | **१७,९४,२५०/-** |

पुरवठा आदेशातील अट व शर्त क्र.७ नुसार माल पुरवठा करणेची हमी म्हणून एकुण रक्कमेच्या ५% रक्कम त्यांचे सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेत आलेली आहे. अनामत रक्कम माल पुरवठा करार वर्ष संपल्यानंतर अथवा मालाचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर त्यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी लागेल.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी त्यांचे दि.२७.१०.२०११ रोजीचे पत्रान्वये हरबरादाळीचे टेंडर बद्दल संस्थानकडे जमा असलेले डिपॉझीट रक्कम रु.१२,८०,०००/- परत मिळणेबाबत विनंती केली आहे.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी हरबरादाळीचा पुरवठा पुर्ण केलेला नाही. त्यांनी त्यांचेकडील दि.२४/०८/२०११ चे पत्रान्वये " चालू वर्षी हरबरा डाळीमध्ये खुपच भाव वाढ झालेली आहे. दर रु.४०/- प्रति किलो प्रमाणे झालेला आहे. त्यांचा सध्याचा पुरवठा आदेशातील दर प्रति किलो रु.३२/- असा आहे. तरी दरवाढ मिळवून देण्याची कृपा करुन प्रति किलो रु.४०/- मात्र प्रमाणे भाव द्यावा."अशी विनंती केली होती. पुरवठा आदेशानुसार त्यांनी ८००० क्विंटल हरबरा डाळीपैकी २३४७ क्विटलचा पुरवठा केलेला आहे. माहे मार्च.२०१२ अखेर ५६५३ क्विंटल हरबरा डाळीचा पुरवठा करणे बाकी होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेत सदरचा विषय चर्चेस ठेवला असता हरबरा डाळीचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने उर्वरीत ५६५३ क्विंटल हरबरा डाळ खरेदीकामी संस्थानचे नियमित पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून हरबरा डाळ खरेदी करावी ,असे ठरले.

त्यानुसार ५६५३ क्विंटल हरबरादाळ खरेदीकामी अधिकृत वितरकांकडून त्यांचे लेडरहेडवर सिलबंद निविदा मागविणेकामी, निविदा सुचनेच्या जाहिरातीचा मसुदा मंजूर करुन दैनिक सकाळचे , पुणे - नाशिक आवृत्तीमध्ये दि.०८.०९.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४.०९.२०११ अशी होती. मुदतीअंती प्राप्त निविदा दि.२४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून हरबरादाळ खरेदीबाबत निर्णय होऊन मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचे दर व नमुना स्विकारुन त्यांना प्रति क्विंटल रु.४,७७५/- मात्र या दराने ५६५३ क्विंटल हरबरादाळ पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे पुरवठा आदेशातील अट क्र. १३ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. "मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे संबंधीत पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास आपली पुर्णतः/अंशतः सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन निर्णय घेईल "

उपरोक्तबाबत दि.१४.०१.२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरचा विषय चर्चेसाठी आला असता त्यावेळी खालीलप्रमाणे निर्णय क्र.८५ संमत झाला आहे. संस्थानसाठी आवश्यक किराणा माल न पुरविलेल्या किती पुरवठाधारकांचे डिपॉझिट जप्त केले व किती पुरवठाधारकांचे डिपॉझिट परत केले याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे पूढील सभेत सादर करावी.

वरील निर्णयानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे किराणा माल न पुरविल्याने सन २००९ पासून आजपावेतो दंड म्हणून सुरक्षा अनामत रक्कम जमा केलेल्या पुरवठाधारकांचा तपशिल :-

| **अ.क्र.** | **पुरवठाधारकाचे नांव व पुरवठा वर्ष** | **पुरवठा न केलेल्या मालाचा तपशिल** | **जमा सुरक्षा अनामत रक्कम** | **दंड म्हणून जप्त सुरक्षा अनामत रक्कम** | **संदर्भ/सभेचा तपशिल** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.जयंत ट्रेडींग कंपनी, जळगांव सन २००९-१० | तुरदाळ, मुगदाळ | रु.५,३४,०१०/- | रु.५,३४,०१०/- | मा.व्य.समिती सभा दि. १९.०७.२००९ निर्णय क्र. ६४१ नुसार पुर्ण रक्कम जमा |
| ०२. | मे.सिताराम ट्रेडींग कंपनी, जळगांव सन २००९-१० | मठ, मुग | रु.२,८४,०००/- | रु.२,८४,०००/- | मा.व्य.समिती सभा दि. १०.०१.२०१० निर्णय क्र. ५७ नुसार पुर्ण रक्कम जमा |
| ०३. | मे.एम.एम. एंटरप्रायझेस, वाशी सन २००९-१० | पॉलीकप | रु.६१,४९०/- | रु.६१,४९०/- | मा.व्य.समिती सभा दि.१०.०१.२०१० निर्णय क्र.१८८ नुसार पुर्ण रक्कम जमा |
| ०४. | मे.वरद विनायक एंटरप्रायझेस, सुपा सन २०११-१२ | पारले बिस्कीट | रु.७९,०००/- | रु.३,९५०/- | मा.व्य.समिती सभा दि.१२.०६.२०११ निर्णय क्र.४२१ नुसार ५% रक्कम जमा |

तरी सदरचे विषयाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, कैलास ट्रेडिंग कं.,नांदेड यांनी हरभरा दाळीचा पुरवठा न केल्याने पुरवठा आदेशातील अट क्र.१३ अन्वये त्यांची सुरक्षा अनामत रक्कम रुपये १२,८०,०००/- जप्त करण्यात यावी, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.६२ चपाती मशिनसाठी स्पेअरपार्टसह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि. १८.४.२०१० चे सभेतील निर्णय क्रं. ३५७(९) अन्वये श्री साईप्रसादालयासाठी सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचेकडुन ५ चपाती मशिन्स खरेदी करणेचा निर्णय झालेला होता. मात्र सदर पाच मशिन एकदम खरेदी न करता प्रथम २ मशिस खरेदी करावे सदर दोन मशिनची कार्यक्षमता, गुणवत्ता व मशिनद्वारे मिळणाऱ्या चपातीचा दर्जा चांगला असल्यास उर्वरीत ३ चपाती मशिन्स खरेदी करण्यात यावेत. त्यानुसार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचेकडुन २ मशिन्स खरेदी करण्यात आलेले असनु त्याच दरम्यान १ मशिन श्री अशोक जयस्वाल, कलकत्ता यांनी देणगी दिलेले आहे. सदर ३ मशिन्स दि.१५.१.२०११ रोजी कार्यान्वीत केलेले आहे .

करारनाम्यातील अटी व शर्ती क्रं. ५ नुसार मशिन्स कार्यान्वित केलेचे तारखेपासुन १ वर्षापर्यंत स्पेअरपार्टसह मेटेन्नसचे काम चपाती मशिन पुरवठादार मे. सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी करावयाचे असल्याने दिनांक १५.१.२०११ ते १४.०१.२०१२ अखेर मशिचे पुरवठादार मे. सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा

यानी स्पेअरपार्टसह मेटेन्नंसचे काम केलेले आहे. सदर फ्री सर्व्हिसींग व मेटेन्नंसचा कालावधी दिनांक १४.१.२०१२ रोजी संपलेला आहे.

प्रत्येक चपाती मशिन दिवसभरात ८ ते १० तास चालविणेत येते. मशिन चालु असताना मशिनद्वारे तयार होणारी चपाती पुर्णपणे भाजणेसाठी तव्याचे टेम्प्रेंचर १८० °C ते २१० °C ठेवावे लागते. तसेच प्रेसींग तवा, टेपलॉन कोटेड कव्हेअर बेल्टला चपाती चिकटू नये म्हणु इलेक्ट्रीक हिटर व गॅस बर्नर द्वारे उष्णता देण्यात येते. चपाती मशिाचा सतत वापर व टेम्प्रेंचर यामुळे स्पेअरपार्ट खराब होतात. खराब झालेले स्पेअरपार्ट तातडीने बदलणेसाठी स्पेअरपार्ट राखीव साठयामध्ये ठेवावे लागतात. त्यानुसार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यानी दि. १५.१.२०११ ते १४.१.२०१२ अखेर एक वर्षात खालीलप्रमाणे खराब झालेले स्पेअरपार्ट बदलले आहेत. त्यामुळे चपाती मशिन ब्रेकडाऊन राहीलेले नाहीत.

| अ.नं. | स्पेअरपार्टचे नाव | बदलेल्या स्पेअरपार्टची संख्या | दरपत्रकानुसार किमंत | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | टेफलॉन बेल्ट | १३ नग | रु. १०,०००/- | रु. १,३०,०००/- |
| २. | प्रेसींग तवा टेफलॉा कोटींग | २४ नग | रु. १,०००/- | रु. २४,०००/- |
| ३. | च्युट प्लेट हिटरसह | ३ नग | रु. ३,६००/- | रु. १०,८००/- |
| ४ | कव्हेअर बेल्ट | ३ नग | रु. २,६००/- | रु. ७,८००/- |
| ५ | प्रेसींग तवा स्टड | १२ सेट | रु. १,२००/- | रु. १४,४००/- |
| ६. | बर्नर मेश | १८ नग | रु. २,०००/- | रु. ३६,०००/- |
| ७. | हायटेम्प्रेचर आईल | ३० लि. | रु. २,२००/- प्रती लि. | रु. ६६,०००/- |
| ८. | हाय टेम्प्रेचर ग्रीस | ५ किलो | रु. २,२००/-प्रती किलो | रु. ११,०००/- |
| ९. | रोलर | ३ नग | रु. ३,०००/- | रु. ९,०००/- |
| १०. | रोलर बेअरींग | ६ नग | रु. ५००/- | रु. ३,०००/- |
| ११. | ब्रेकींग युनिट सॉफ्ट बेअरींग | ६ नग | रु. १०००/- | रु. ६०००/- |
| १२. | इलेक्टीक मोटार | १ नग | रु. ८,०००/- | रु. ८,०००/- |
| १३. | गिअरबॉक्स बेअरींग | १८ नग | रु. ४००/- | रु. ७,२००/- |
| १४ | गिअरबाक्स | १ नग | रु. १४,४००/- | रु. १४,४००/- |
| १५. | आटयाची गोळी कट करणेची स्टे. स्टील सुरी | ३ नग | रु. ८००/- | रु. २,४००/- |
| १६. | एस.एस.आर.(सॉलिड स्टेट रिले) | ७ नग | रु. ६६०/- | रु. ४,६२०/- |
| १७. | टेफलॉन बुश | ३ सेट | रु. २,४००/- | रु. ७,२००/- |
| १८. | कॉपर पाईप बंडल (५० फुट) | १ नग | रु. ५,०००/- | रु. ५,०००/- |
| १९ | इतर किरकोळ स्पेअरपार्ट | अंदाजे | रु. १०,०००/- | रु. १०,०००/- |
| | | | एकुण | रु. ३,७६,८२०/- |
| | | | Excise Duty १०.३% | रु. ३८,८१२/- |
| | | | CST १३.५ % | रु. ५६,११०/- |
| | | | एकुण रक्कम | रु. ४,७१,७४२/- |

श्री साईप्रसादालयात पुरवठा केलेले चपाती मशिस हे मार्केटमध्ये इतरत्र उपलब्ध नाही. पुरवठादार यांनी प्रसादलयाच्या गरजेप्रमाणे चपाती मशिस बनवुन दिलेले आहेत. सदर मशिससाठी लागणारे स्पेअरपार्ट पुरवठादार यांनी स्वत:च्या कंपनीमध्ये तयार केलेले आहेत. त्यामुळे चपाती मशिाचे स्पेअरपार्ट पुरवठादार यांच्या व्यतीरीक्त मार्केटमध्ये उपलब्ध होत नाहीत. त्यानुसार १ वर्षामध्ये त्यांनी ३ चपाती मशिासाठी सुमारे रक्कम रु. ४,७१,७४२/- चे स्पेअरपार्ट बदलेले आहेत.

उपरोक्त ३ चपाती मशिाचा स्पेअरपार्टसह मेटेन्नंस सर्व्हिस कालावधी दि. १४.१.२०१२ रोजी संपलेला आहे. त्यापुढील कालावधीसाठी मशिन सतत कार्यरत रहावे म्हणुन वार्षिक सी.एम.सी. (Comprehensive Maintenance Contract) देणे गरजेचे आहे. त्यासाठी चपाती मशिनचे पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांना विचारणा केली असता त्यांनी एकुण मशिन किमंत रु.२१,५६,५००/- च्या १० % रु.२,१५,६५०/-(अक्षरी रुपये दोन लाख पंधरा हजार सहाशे पन्नास मात्र) एवढा खर्च पत्राद्वारे कळविलेला आहे.

| अ. नं. | तपशिल | प्रती मशिन वार्षिक CMC खर्च | मशिन संख्या | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | चपाती मशिन CMC खर्च | रु. २,१५,६५०/- | ३ | रु. ६,४६,९५०/- | १. पुर्णवेळ कंपनीकडुन दोन टेक्नीशियन. (मशिनचे मेटेन्नस व देखरेखकामी) |
| | | सर्व्हिस टॅक्स १०.३% | | रु. ६६,६३६/- | २. सर्व प्रकारचे स्पेअरपार्ट व |
| | | एकुण | | रु. ७,१३,५८५/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | हायटेम्प्रेचर ऑईल व ग्रीस सह |

त्याचप्रमाणे चपाती मशिन पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी टेंडरमध्ये AMC बाबत नमुद केलेले आहे की, चपाती मशिन एकुण किमंतीच्या ५% (रु. १,०७,८२५/-) प्रमाणे चार्जेस लागतील. त्यामध्ये दुरुस्तीकामी लागणारे स्पेअरपार्ट संस्थानने पुरविणेचे आहेत. दर दोन महिण्यानंतर मशिनची सर्व्हिसींग करण्यात येईल. त्याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहेत.

| अ.- नं. | तपशिल | प्रती मशिन वार्षिक AMC खर्च | मशिन संख्या | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | चपाती मशिन AMC खर्च | रु. १,०७,८२५/- | ३ | रु. ३,२३,४७५/- | १. पुर्णवेळ टेक्नीशियन मिळणार नाही. |
| | | सर्व्हिस टॅक्स १०.३% | | रु. ३३,३१८/- | २. सर्व स्पेअरपार्ट संस्थानने पुरविणेचे आहेत. |
| | | **एकुण** | | **रु. ३,५६,७९३/-** | |

(अक्षरी रुपये तीन लाख छपन्न हजार सातशे त्यान्नव मात्र)

चपाती मशिनसाठी फक्त AMC दिल्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| AMC खर्च | रु. ३,५६,७९३/- |
| स्पेअरपार्टचा अंदाजे खर्च | रु. ५,००,०००/- |
| संस्थानला दोन कंत्राटी कुशल टेक्नीशियन करता येणारा खर्च | रु. १,६६,०१६/- |
| एकुण खर्च | **रु. १०,२२,८०९/-** |

(अक्षरी रुपये दहा लाख बावीस हजार आठशे नऊ मात्र)

साईभक्तांना प्रसाद भोजनात चपातीचा पुरवठा वेळेवर होणेकामी व चपाती मशिन सतत कार्यरत रहाणेसाठी AMC किवा CMC देणे अत्यंत गरजेचे आहे. AMC साठी अंदाजे रु. १०,२२,८०९/- व CMC साठी रु. ७,१३,५८५/- खर्च येणार असुन CMC मध्ये कंपीकडुन पुर्णवेळ दोन टेक्नीशियन मिळणार आहेत. AMC व CMC साठी येणाऱ्या खर्चाचा तुलाात्मक दृष्टया विचार करता व मशिन कार्यरत रहाणेसाठी व स्पेअरपार्ट तातडीने वेळेवर उपलब्ध होणेचे दृष्टीने चपाती मशिन पुरवठादार यांना CMC देणे योग्य होईल.

चपाती मशिन पुरवठादार मे. सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी पत्राद्वारे CMC साठी रक्कम रु.७,१३,५८५/- (अक्षरी रुपये सात लाख तेरा हजार पाचशे पंच्याऐंशी मात्र) कळविलेले आहेत. सदर रक्कम बाबत चर्चा / वाटाघाटी करणेसाठी चपाती मशिन पुरवठादार सनशाईना इंडस्ट्रीज, नोएडा यांना मा. व्यवस्थापान समिती सभेपुढे समक्ष बोलविण्यात आलेले आहे.

तरी ३ चपाती मशिनचे वार्षिक CMC पुरवठादार मे. सनशाईन इडस्ट्रीज, नोएडा यांना देणेबाबतचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानला पुरविण्यात आलेली चपाती मशिन सनशाईन इंडस्ट्रीज मार्फत श्री.राजू सोमन मुंबई यांनी बसविलेली असल्याने चपाती मशिनचे स्पेअर पार्टस् व चपाती मशिनचे वार्षिक क्रॉम्प्रेन्सीव मेन्टेनन्स कॉन्ट्रॅक्ट (CMC) बाबत त्यांना पत्र देऊन दरपत्रक मागवून घेऊन सदरील प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरसादर करावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.६३** **साईआश्रम नं.०१ व ०२ साठी साऊंड सिस्टम मटेरिअल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई आश्रम नं.१ व २ येथे साई भक्तांना निवासासाठी सुमारे १००० रूम बांधणेचे काम अंतिम टप्प्यात असून दोन्ही आश्रमांचा परीसर मोठा आहे. तेथे जमलेल्या साई भक्तांना सुचना देणेकामी तसेच स. मंदिरातील लाइव्ह आरत्या व साई मंत्र ऑडीओ स्वरूपात ऐकवीणेसाठी तेथील सुमारे १४ इमारतींच्या परीसरात बसवीलेल्या स्ट्रीट लाइटच्या पोलवर हॉर्न बसवून वरीलप्रमाणे व्यवस्था करता येइल.

त्यासाठी खालील मटेरीयलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | मटेरीयल वर्णन | कंपनी | नग | अंदाजे प्रत्येकी किंमत | अंदाजे एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १५ वॅट हॉर्न मॉ.नं. UHC१५XT | आहुजा | ५५ | १,३००.०० | ७१,५००.०० |
| ०२ | ४०००वॅट ॲम्प्लीफायर मॉ.नं. TZA४०००DP | आहुजा | ०४ | २२,०००.०० | ८८,०००.०० |
| ०३ | DVD प्लेयर मॉ.नं.DVP-SR-६६० | सोनी | ०३ | ३,२००.०० | ९,६००.०० |
| ०४ | ट्रान्समीटर व रीसीव्हर १V इन १V आउट | ऑप्टीलींक | १२ | ७,५००.०० | ९०,०००.०० |
| ०५ | व्हीडीओ डिस्ट्रीब्युटर १x१० | मार्क | ०५ | ५,५००.०० | २७,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | व्हीडीओ डिस्ट्रीब्युटर १x५ | मार्क | १० | ३,५००.०० | ३५,०००.०० |
| ०७ | ऑडीओ डिस्ट्रीब्युटर १x३ | मार्क | ०५ | ३,०००.०० | १५,०००.०० |
| | | | | **एकुण -** | **३,३६,६००.००** |

उपरोक्त मटेरीयल खरेदि करणेकामी, अंदाजे रू.३,३६,६००.०० चे पुर्णांकीत रू.३,४०,०००.०० (अक्षरी रूपये तीन लाख चाळीस हजार) खर्च येत आहे.

तरी कृपया, खरेदि विभागामार्फत सदर मटेरीयल खरेदि करणेस व खरेदिकामी येणा-या रूपये ३,४०,०००.०० (अक्षरी रूपये तीन लाख चाळीस हजार) चे खर्चास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.२३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साईआश्रम नं.०१ व ०२ साठी आवश्यक असणारे साऊंड सिस्टम मटेरिअल कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ३,४०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.६४** **पाणी पुरवठा विभागासाठी इले.मोटर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** निमगांव-को-हाळे शिवारात गट नं.१९८,१९९,२००,२०१ मध्ये श्री साई गार्डन विकसित करण्याचे कामांस सुरुवात झाल्याने तेथील कामांसाठी पाणी पुरवठा विभागाकडुन पाण्याची व्यवस्था करावयाची आहे. श्री साई गार्डनचे काम करण्यात येणा-या गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मध्ये यापुर्वी पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने तेथील कामांसाठी पाणी उपलब्ध करून देणेसाठी तेथे एक कुपनलिका देणगी स्वरुपात व एक कुपनलिका संस्थान खर्चाने अशा प्रत्येकी ३०० फुट खोल दोन कुपनलिका घेण्यात आलेल्या आहेत.

श्री साई गार्डन येथे घेण्यात आलेल्या दोन कुपनलिकांमध्ये सब्मर्सिबल इले.मोटारी बसवून त्या पाण्याचा वापर श्री साई गार्डनचे कामांकरीता करावयाचा आहे. पाणी पुरवठा विभागाकडे सदर कुपनलिकांमध्ये बसविणेसाठी आवश्यक असणा-या दोन ५ एच.पी. सब्मर्सिबल इले.मोटारी उपलब्ध नसल्याने त्या खरेदी कराव्या लागतील.

तसेच पाणी पुरवठा विभागाकडुन विविध इमारतींसाठी पाणी पुरवठा करणेसाठी ५ एच.पी.,१० एच.पी., क्षमतेच्या पाणबुडी व परिसरातील बोअरवेलमधील ३ एच.पी. सब्मर्सिबल मोटारी बसविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या मोटारी सततच्या वापराने तसेच जुन्या झालेल्या असल्यामुळे त्यांचे वायडींग जळण्याचे व नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. मोटारी नादुरुस्त झाल्यानंतर त्या ठिकाणी तात्काळ दुसरी मोटार बसवून पाण्याची व्यवस्था करण्यात येते. याकरीता असण्याऱ्या स्टँडबाय मोटरींपैकी १० एच.पी. क्षमतेच्या २ पाणबुडी व ५ एच.पी.क्षमतेच्या २ पाणबुडी तसेच ३ एच.पी. क्षमतेच्या ०२ सब्मर्सिबल अशा एकुण ६ नग मोटारी हया कालबाहय झाल्याने त्या पुर्वीप्रमाणे कार्यक्षम राहिलेल्या नाहीत. याकरीता ६ मोटारी खरेदी करणे आवश्यक आहे.

सध्या साठवण तलाव क्रं.०३ मध्ये पंपरुम विभागांतर्गत तयार करण्यात आलेले आहे. तेथे जर पाणबुडी मोटार ऐवजी मोनोब्लॉक मोटारचा वापर केला तर साठवण तलावातील संपुर्ण पाण्याचा उपसा करणे शक्य होईल व कमी वेळात जादा पाण्याचा उपसा करणे शक्य होईल. परंतु यासाठी आपणास आवश्यक त्या टाईपची मोटार सध्या पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नसल्याने ती खरेदी करून त्या ठिकाणी बसवावी लागेल.

पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक मोटारींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | मोटारचा तपशिल | नग | अंदाजे दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | पाणबुडी मोटार- १० एच.पी. , ३ Phase टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. ३८,०००/- | ७६,०००.०० |
| ०२. | पाणबुडी मोटार- ५ एच.पी. , ३ Phase टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. २२,०००/- | ४४,०००.०० |
| ०३. | ३ एच.पी.सब्मर्सिबल बोअरवेल पंपसेट (४") ३ Phase, १७ Stages., टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. २१,०००/- | ४२,०००.०० |
| ०४. | ५ एच.पी.सब्मर्सिबल बोअरवेल पंपसेट. (६") ३ Phase, ६/१२ Stages., टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. २६,०००/- | ५२,०००.०० |
| ०५. | ५ एच.पी.मोनोब्लॉक मोटार. कंपनी- टेक्स्मो कंपनी, क्रॉम्प्टन कंपनी. Size १२५x१२५ mts.,१५०० RPM, | ०१ नग. | रु. २४,०००/- | २४,०००.०० |
| | | | **एकुण -** | **२,३८,०००.००** |

तरी वरील नमुद केल्याप्रमाणे मोटारींची पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यकता असल्याने सदरच्या मोटारी कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. २,३८,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२३४ यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक असणाऱ्या ०९ इले.मोटारी खरेदीकामी टेक्स्मो,क्रॉम्टन,सियाराम,लक्ष्मी या नामांकित कंपन्याकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपय २,३८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६५ गुढी पाडवा -२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री अशोक कुमार जस्वाल, कलकत्ता यांनी गुढी पाडवा २०१२ या निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ.ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करणेस तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थानकडे परवानगी मागीतली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया , विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी .,श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०११. या निमित्ताने के.सी. सुब्रामणी राजु,बंगलोर यांनी., श्रीमती.अंबिका व्ही नायर,मुंबई.यांनी , श्री पुण्यतिथी उत्सव -२०११., श्री रविंद्र तलवार,दिल्ली यांनी दिपावली -२०११ व श्री डंग, दिल्ली.यांना श्री दत्त जयंती निमित्ताने व श्री राजस जैन,पुणे यांनी नववर्ष -२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली होती. तसेच श्री अशोक कुमार जस्वाल, कलकत्ता यांनी मागील वर्षी गुढी पाडवा निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट केलेली होती.

तरी श्री अशोक कुमार जस्वाल, कलकत्ता यांना गुढी पाडवा निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस व सजावटीसाठी येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावा वर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अशोक कुमार जस्वाल, कलकत्ता यांना गुढी पाडवा निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस मान्यता देण्यात आली, व त्यांना मोफत दर्शन, जेवण व सजावटीचे सामान ठेवणेसाठी कारागिरांना हॉल देण्यात यावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६६ श्री रामनवमी उत्सव-२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती. रिम्पल लोहिया मॅडम ,विश्वस्त श्री साईबाबा संस्थान,विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. हया श्रीरामनवमी उत्सवा निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ.ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करणेस तयार आहे. यासाठी त्यांनी मा.उप कार्यकारी अधिकारी यांचे बरोबर चर्चा केलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया मॅडम , विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी .,श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. या निमित्ताने के.सी.सुब्रामणी राजु, बंगलोर यांनी, श्रीमती. अंबिका व्ही नायर,मुंबई.यांनी, श्री पुण्यतिथी उत्सव -२०११., श्री रविंद्र तलवार, दिल्ली यांनी दिपावली -२०११ व श्री डंग, दिल्ली.यांना श्री दत्त जयंती निमित्ताने व श्री राजस जैन,पुणे यांनी नववर्ष -२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली होती.

श्रीमती रिम्पल लोहीया मॅडम, विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी मागील वर्षी श्रीरामनवमी उत्सव- २०११ निमित्ताने फुलांची सजावट केली होती. त्याप्रमाणे या वर्षी त्यांना मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती रिम्पल लोहीया मॅडम, विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना श्रीरामनवमी उत्सव- २०११ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस मान्यता देण्यात आली, व त्यांना मोफत दर्शन, जेवण व सजावटीचे सामान ठेवणेसाठी कारागिरांना हॉल देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६७ ऑस्ट्रेलिया (मेलबॉर्न) येथील साईमंदिरांना विनामूल्य देण्यात आलेल्या श्री साईचरित्र व सी.डी खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्य.समितीचे दि.१९.११.२०११ चे सभेतील निर्णय क्र.८२७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी न्युझीलंड येथील श्री साई मंदिरास त्यांचे मागणीप्रमाणे श्री साईबाबांचे जीवनावरील संस्थान प्रकाशित पुस्तके व सीडी न्युझीलंड येथील श्री साई मंदिरास मोफत देणेस व याकामी येणारे रु.४९,२७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याचवेळेस ऑस्ट्रेलिया (मेलबॉर्न) व इंग्लंड येथील साई मंदिरांनी श्री साईबाबांचे जीवनावरील पुस्तके व सीडीची मागणी केल्यास त्यांनाही मोफत देण्यात यावे मात्र त्यांना पुस्तकांचे वाहतूकीचा खर्च देणेबाबत सांगण्यात यावे असे ठरले.

आज रोजी शिरडी साई संस्थान मेलबॉर्न (व्हिक्टोरीया) यांचे प्रतिनिधींनी उक्त पुस्तके व सीडीची मागणी केली आहे. वाहतूकीची व्यवस्था ते करणार आहेत.

| अ.नं. | साहित्यांचा तपशिल | संख्या | किंमत | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र - हिंदी | १०० | ४०.०० | ४०००.०० |
| ०२ | श्री साई सतचरित्र - इंग्रजी | २०० | २८.०० | ५६००.०० |
| ०३ | श्री साई सतचरित्र - गुजराथी | १०० | ४८.०० | ४८००.०० |
| ०४ | श्री साई सतचरित - कन्नड | ५० | ४०.०० | २०००.०० |
| ०५ | श्री साई सतचरित्र - तेलगू | ५० | ४०.०० | २०००.०० |
| ०६ | श्री साई सतचरित्र - तामिळ | ५० | ५५.०० | २७५०.०० |
| ०७ | श्री साई मंदिरातील आरती -ऑडिओ सी.डी. | २०० | ३०.०० | ६०००.०० |
| ०८ | श्री साई मंदिरातील आरती - व्हीसीडी | १०० | ७५.०० | ७५००.०० |
| | | | **एकुण रु.** | **३४६५०.००** |

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांनी मागणी केलेप्रमाणे पुस्तके व सी.डी. त्यांना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी रु.३४,६५०/- खर्च आला आहे. सदरचा खर्च (Publication Expenses) खाते नावे टाकणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे ऑस्ट्रेलिया (मेलबॉर्न) येथील साईमंदिरांना देण्यात आलेल्या श्री साईचरित्र व सी.डी कामी आलेला रुपये ३४,६५०/- मात्रचे खर्चास तसेच सदरचा खर्च (Publication Expenses) खाते नावे टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६८ साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय मासिक छपाई कामाचे खर्चाबाबत .**

**प्रस्ताव-** श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय मासिक प्रकाशित करण्याबाबत निर्णय झालेला असुन या कामी मानद संपादक म्हणून श्री रघुनाथ रेड्डी , तिरुपती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मासिकाचे प्रकाशना संबंधी मा.अध्यक्ष महोदय, तसेच मे. टॅको व्हीजन्स् प्रा. लि., मुंबई यांचे प्रतिनिधी श्री अविनाश बालकृष्णन यांचे समवेत श्री रघुनाथ रेड्डी यांनी दि.०२.०१.२०१२ रोजी चर्चा केली. त्यावेळी मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांना मासिक छपाई कामी दरपत्रक पाठविणेस सांगण्यात आले होते.

त्यानुसार मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांनी दि.१२.०१.२०१२ चे पत्रान्वये सोबतच्या तपशिलाप्रमाणे दरपत्रक सादर केले आहे. दि. ०२.०१.२०१२ रोजी चर्चेत ठरल्याप्रमाणे सदर मासिकाचा प्रथम अंक १२० पेजेस अधिक ४ कव्हर पेजेस असा राहील तर पुढील ११ अंक ५६ पेजेस अधिक ४ कव्हर पेजेस असे राहतील मासिकाच्या दर महा २०,००० प्रती छपाई होतील.

मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांनी दिलेल्या दरांनुसार मासिके छपाई कामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| तपशिल | छपाई संख्या | महिना | दर ( टॅक्स सह ) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| प्रथम अंक | २०,००० | ०१ | १०८.०० | २१,६०,०००.०० |
| रेग्यूलर अंक | २०,००० | ११ | ४८.५० | १,०६,७००००.०० |
| | | | **एकुण खर्च** | **१,२८,३०,०००.००** |

या व्यतिरिक्त पॅकिंग ॲण्ड फॉरवर्डीग खर्च वेगळा आदा करावा लागेल.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र. ८१२ नुसार संस्थान प्रकाशने छपाई कामी कामाची कार्यालयीन पध्दती निश्चित करण्यात आली आहे त्यानुसार प्रेसधारकांची अधिकृत यादी करण्यात आली असुन, त्यांना दर मागणी पत्रे पाठवून दर पत्रके मागवुन छपाई करावी लागेल.

सबब मासिके छपाई कामी अपेक्षित पॅकिंग ॲण्ड फॉरवर्डीग खर्च वगळता अंदाजे रु.१,२८,३०,०००/- च्या खर्चास मंजूरीसाठी व विहित पध्दतीने छपाईची कार्यवाही करणे कामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय मासिक स्वागत अंक तातडीने प्रकाशित करावयाचा असल्याने २० हजार अंक छपाईकामी मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.,मुंबई यांचेकडून त्यांनी देऊ केलेल्या प्रती अंक रुपये १०८/- दरात छपाई करुन घेण्यास व याकामी येणारे अपेक्षित पॅकिंग ॲण्ड फॉरवर्डीग खर्च वगळता अंदाजे रु.१,२८,३०,०००/- च्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच पूढील द्वैमासिक अंक छपाईकामी दरपत्रके मागविण्यात यावीत,असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६९ संस्थान निर्मित ऑडीओ सी.डी व डी.व्ही.डी निर्मिती कामाचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती / अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

संस्थान निर्मित खालील ऑडीओ सी.डीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.१५.१२.२०११ चे पत्रातील दराने अपेक्षित खर्च, शिल्लक साठा प्रस्तावित परिमाण यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.नं | ऑडीओ सी.डीचा तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साईज, व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र - तामिळ (डीव्हीडी एमपी ३) | २५०६ | ५ | ५,००० नग | ३७.६२ | १,८८,१००.०० | ५०.०० |
| ०२ | श्री साई सत्चरित्र हिंदी दोहावली (३ सीडीचा संच) | २०७२ | ४ | ३,००० संच | ६३.१ | १,८९,३००.०० | ९०.०० |
| ०३ | गुरपाठाचे अभंग - (दोन सी.डी.चा संच) | ० | ० | ५,००० संच | ३३.४३ | १,६७,१५०.०० | ५०.०० |
| | | | | | एकूण रु. | ५,४४,५५०.०० | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ऑडीओ सीडी व डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती करणेकामी मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना एकूण रु.५,४४,५५०/- मात्रचा जा.नं.एसएसएस / वशी/ प्रकाशने/५२५९/२०१२ दि.२०.०१.२०१२ अन्वये कार्यादेश व अग्रीम रकमेचा धनादेश देण्यात आलेला आहे.

सबब उपरोक्त ऑडीओ सीडी व डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती करणेकामी झालेल्या रक्कम रु.५,४४,५५०/- मात्र चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थान निर्मित ऑडीओ सी.डी व डी.व्ही.डी पुर्नरनिर्मिती करणेकामी झालेल्या रक्कम रु.५,४४,५५०/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७० मुंबई येथील श्री साईचरित्र महापारायणात मान्यवर व पत्रकार यांना भेट म्हणून देण्यात आलेल्या श्री साईबाबा थ्री डी फ्रेम फोटोचे बील आदा करणे बाबत**

**प्रस्ताव-** मुंबई येथे दि.१५.१२.२०११ ते दि.१८.१२.२०११ अखेर श्री साईसच्चरित महापारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास निमंत्रित पत्रकार व मान्यवर यांना सत्कारार्थ श्री साईबाबा थ्रीडी फ्रेम फोटो १२"x१७" साईजचे सप्रेम भेट देण्यात आले आहेत.

मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून तातडीने १६८ नग, फोटो प्रती नग दर रु.३९५/- प्रमाणे तयार करुन घेतले आहेत. याकामी रु.६६,३६०/- मात्र खर्च झाला आहे. सदर रकमेचे बिल त्यांनी सादर केले आहे. सदर १६८ फोटोपैकी ३२ फोटो मुंबई पारायण सोहळयात मान्यवरांना सप्रेम भेट दिले असून ४० फोटो साईबाबा रुग्णालयास विविध कार्यक्रमात मान्यवरांना सप्रेम भेट देणेकामी दिले आहेत.सध्या भांडारकडे ९६ फोटो शिल्लक आहेत. सदरचे फोटो जनसंपर्क अधिकारी अथवा रुग्णालय अधीक्षक यांचे मागणीनुसार वेळोवेळी सप्रेम भेट देणेकामी वापरण्यात येतील.

सबब श्री साईबाबा थ्रीडी फ्रेम फोटो तयार करणेकामी झालेल्या रु.६६,३६०/- चे खर्चास व मे. साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांचे देयक क्र.४६ दि.२३.०१.२०१२ ची रक्कम अदा करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२४० यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबई येथील श्री साईचरित्र महापारायणात मान्यवर व पत्रकार यांना भेट म्हणून देण्यात आलेल्या श्री साईबाबा थ्रीडी फ्रेम फोटो तयार करणेकामी झालेल्या**

**रु.६६,३६०/- चे खर्चास व मे. साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांचे देयक क्र.४६ दि.२३.०१.२०१२ ची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७१ प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे हे जुने टेबल्स घेऊन न गेल्यामुळे विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांना देणे अथवा जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रादेशिक मनोरुग्णालय,पुणे यांनी दिनांक ०७/०५/२०१० चे पत्राव्दारे रुग्णासाठी टेबल्स देगणी स्वरुपात मिळावे अशी विनंती केलेली होती. त्याूसार जुन्या प्रसादालयात वापरलेले जुने टेबल्सची विहीत पध्दतीने विक्री करावी अथवा प्रादेशिक मनोरुग्णालय यांचे विनंतीनूसार टेबल्स देणगी म्हणून द्यावेत यावर न्िार्णयासाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०५/०९/२०१० चे सभेपुढे ठेवण्यात आलेला होता त्यावर सविस्तर चर्चा होऊन सदर २०१ टेबल्सपैकी विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्ट, कोकमठाण यांना १५१ व प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे यांना ५० टेबल्स देणगी म्हणून द्यावेत व टेबल्स देणगी देणेबाबत महाराष्ट्र शासनाची कार्योत्तर मान्यता घेणेत यावी असा निर्णय झालेला होता.

सदर टेबल्स देणगी देणेस मान्यता मिळणेकामी प्रधान सचिव , विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.२५/१०/२०१० व २६/०२/२०११ रोजी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविलेला आहे. अद्याप सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०५/०९/२०१० चे सभेतील निर्णय क्रं. ७१९ अन्वये विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांना १५१ टेबल्स पैकी दुरुस्त करुन वापरता येतील असे १४२ टेबल्स दि.२२/०६/२०११ रोजी देणगी म्हणून दिलेले आहे. व ५० नग टेबल्स प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे यांना देणगी म्हणून घेऊन जाणेबाबत जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/३०५२/२०११ दि.१५/०९/२०११ चे पत्राव्दारे कळविलेले आहे. परंतू प्रादेशिक मनोरुग्णालय,पुणे यांचेकडून टेबल्स देणगी स्वरुपात घेऊन जाणेकामी प्रतिसाद मिळाला नाही. सदर टेबल्स नग ५० पडून असल्यामुळे प्रादेशिक मनोरुग्णालय,पुणे यांना वारंवार दुरध्वनी व भ्रमणध्वनीव्दारे संपर्क केला व जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/३७५९/२०११ दिनांक २०/१०/२०११ रोजी टेबल्स घेऊा जाणेबाबत अथवा आवश्यकता नसलेस तसे कळविणेबाबत स्मरणपत्र पाठविलेले होते. मात्र अद्यापपर्यंत प्रादेशिक मनोरुग्णालय,पुणे यांचेकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद मिळालेला नाही. यावरुन असे दिसून येते की, प्रादेशिक मनोरुग्णालय,पुणे यांना जुने टेबल्स घेऊन जाणेची इच्छा नाही किंवा गरज नाही.

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,कोकमठाण यांनी दिनांक ०४/१०/२०११ चे पत्राव्दारे उपरोक्त ५० नग टेबल्स देणगी म्हणून मिळावे अशी विनंती केलेली आहे.

सदर टेबल्स ०३ वर्षापासून बाहेर पडून आहे. ऊन, वारा, पाऊस यामुळे खराब होत आहे. तरी सदर ५० नग टेबल्स विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण यांना देणगी म्हणून द्यावेत. अथवा जाहीर लिलावाने / अभिलेख कक्षाकडील वार्षिक उच्चतम दराने विक्री करावी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे हे जुने प्रसादालयातील जुने ५० नग टेबल्स घेऊन न गेल्याने सदरचे टेबलची जाहिर लिलावाने/ अभिलेख कक्षाकडील वार्षिक उच्चतम दराने विक्री करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.७२ दि.०५.१२.२०११ ते दि.०४.११.२०१२ अखेर द्वारावती भक्तनिवास इमारतीत गरम पाणी पुरविणेकामी मुदतवाढ मिळणेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि., शिर्डी यांचे अर्जाबाबात**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयाकींत द्वारावती भक्तनिवास इमारतीत वास्तव्यास उतरणा-या साईभक्तांना स्नानासाठी गरम पाणी मिळावे, म्हणुन व्दारावती भक्तनिवास इमारतीचे टेरेसवर सोलर सिस्टीम बसविलेली आहे. सोलर सिस्टीम प्रणालीद्वारे गरम पाण्याचे नळ कनेक्शन प्रत्येक रुम मध्ये बसविण्यात आलेले असून त्या नळ कनेक्शनव्दारे भक्तांना रुममध्ये गरम पाणी मिळते.

पावसाळयात ढगाळ वातावरणामुळे अथवा सोलर सिस्टीम मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास बॉयलरद्वारे पाणी तापवुन प्रत्येक माळयावरील स्टोअर जवळ असलेल्या नळ कनेक्शन पासुन ते रुम पर्यंत बादली द्वारे भक्तांस गरम पाणी पुरविण्याचे काम मा.व्यवस्थापन मंडाळातील निर्णय क्रं.२०२ व जा.नं. एसएसएस/ वशी-द्वारावती/११४३/११ दि.३१/०५/२०११ च्या पुरवठा आदेशानुसार श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिट को. ऑप सोसा. लि. शिरडी यांना दि.०५/०१/२०११ ते दि.०४/१२/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेले असून त्याचा करारनामा विधी विभागामार्फत करण्यात येऊन गरम पाणी पुरविण्याची मुदत दि. ०४/१२/२०११ रोजी संपुष्टात आली आहे.

द्वारावती भक्तनिवास इमारतीत श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी मार्फत बॉयलर बसविण्यात आलेला आहे. द्वारावती भक्तनिवास रुमसाठी सेवा आकार रु. ५००/- व वातानुकूलित रुमसाठी सेवा आकार रु.९००/- इतका असून हा सेवा आकार विचारात घेता भक्तांकडुन गरम पाण्याचे पैसे घेता येणार नाही.कारण मुळातच रुम भाडे भक्तांकडून पुरेश्या प्रमाणात आकारलेले आहे.

द्वारावती निवासस्थानात निवासासाठी उतरलेल्या भक्तांस कर्मचारी सोसायटीने प्रत्यक्ष पुरविलेल्या गरम पाण्यास प्रती भक्त रुपये - १=५० ( अक्षरी रुपये- एक पैसे पन्नास ) मात्र याप्रमाणे ( बॉयलरव्दारे गरम पाण्याचे १० लिटर क्षमतेचे प्रति बादली नुसार ) होणारी रक्कम संस्थान मार्फत सोसायटीस अदा करण्यात येते.

सदर सोसायटीने पत्र क्रं श्रीसासंएक्रेसो/४७८/११ दि.१९/११/२०११. सोसायटीस दिलेल्या गरम पाणी पुरवठा व्यवसायास पुढील पाच वर्षाकरीता मुदत मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

संस्थानने आता पर्यंत एक - एक वर्षाचे किंवा अकरा महिने मुदतीनेच असे कामाचे ठेके देण्यात आलेले आहे. याबाबत विचार करता प्रस्तुत या गरम पाणी पुरविण्याचा ठेका देखील अकरा महिने मुदती पावेतोच देता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व जा.नं. एसएसएस/वशी-द्वारावती/११४३/११ दि.३१/०५/२०११ च्या पुरवठा आदेशाने देण्यात आलेल्या ११ महिन्याचे कराराचे अटी / शर्तीस अधिन राहुन श्री साई संस्थान एम्प्ला. क्रे.कॉ. ऑ. सोसायटीस दि.०५/१२/२०११ ते दि. ०४/११/२०१२ अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्ला. क्रे.कॉ. ऑ. सोसायटीस दि.०५/१२/२०११ ते दि. ०४/११/२०१२ अखेर ११ महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शतीवर द्वारावती भक्तनिवास इमारतीत गरम पाणी पुरविणेकामी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी.**

**दरम्यानचे काळात सध्या भक्तांना वर्षभर गरम पाणी मिळणेसाठी बसविण्यात आलेल्या सोलर सिस्टीमची क्षमता वाढविता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवास्थान/विद्युत विभागप्रमुख)**

---

**विषय नं.७३** **द्वारावती भक्तनिवास स्वच्छता/ हाऊसकिपींग कामी मे.बी.व्ही.जी. लि., पुणे यांना आऊट सोर्सिंग पध्दतीने दिलेल्या कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास मधील स्वच्छता/हाऊसकिपींग काम दि.०१/०४/२०११ ते दि.३१/०३/२०१२ या कालावधीत आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे कामी इकडील जा.नं. एसएसएस/वशी-द्वारावती/२३०/२०११ दि.०८/०४/२०११ अन्वये बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामी अटी/शर्ती मान्य असले बाबत दि.२४/०१/२०१२ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदर कामासाठी दरमहा रु.६,२५,०००/- मंजुर केलेल होते.त्यानुसार दि.०१/०४/२०११ पासून द्वारावती भक्तनिवास मध्ये स्वच्छता/हाऊसकिपींगची कामे करुन देत आहे. सदर कामाचा कालावधी दि.३१/०३/२०१२ रोजी संपणार आहे.

बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांनी निविदे मध्ये नमुद केल्याप्रमाणे मशिनरी, स्वच्छता केमिकल साहीत्य व ७६ मनुष्यबळाचा वापर करून दि. ०१/०४/२०११ पासून द्वारावती भक्तनिवास मध्ये स्वच्छता/ हाऊसकिपींगची कामे समाधान कारक केलेली आहेत.

बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांनी दि.२४/०१/२०१२ चे विनंती अर्जाद्वारे यापुढील कालावधीसाठी मुदत वाढ व सध्याचे दरामध्ये २०% दरवाढ मिळावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुसार दरमहा रु.१,२५,०००/- ची वाढ होणार आहे. सध्याची रु.६,२५,०००/- व वाढीव मागणी रु.१,२५,०००/- = रु.७,५०,०००/- अशी दरमहा एकूण रक्कम होईल.

टेंडर कालावधीमध्ये बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे हे द्वारावती भक्तनिवास मधील स्वच्छता/हाऊसकिपींगची कामे चांगल्या प्रकारे करुन देत असल्यामुळे साईभक्तांनी समाधान व्यक्त केलेले आहे. त्यामुळे यापुढील कालावधी साठी स्वच्छता/हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना दि.०१/०४/२०१० पासून स्वच्छता व हाऊसकिपींगची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने दिलेले आहे. दि.०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ मध्ये सदर काम मशिनरी, स्वच्छताचे केमिकल साहीत्य व ७० मनुष्य बळासाठी दरमहा रु.४,५६,०००/-प्रमाणे देण्यात आलेले होते. दि.०१/०४/२०११ ते दि.३१/०३/२०१२ अखेर एका वर्षासाठी दरमहा रु.६,२५,०००/- देण्यात येत आहे.

बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांचे दिनांक २४/०१/२०१२ चे विनंती अर्जानुसार स्वच्छता व हाऊस किपींग कामासाठी मुदतवाढसह सध्याचेच दरात २०% दरवाढ देणे अथवा वाढीव दरावर मा.व्यवस्थापन मंडळा समोर चर्चा वाटाघाटीसाठी कंपनी प्रतिनिधीला बोलावुन घेऊन त्यावर निर्णय घेणे. अथवा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणे याबाबत निर्णयार्थ सादर.

आजचे सभेत बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांचे मल्हार करवंदे, मार्केटिंग रिजनल मॅनेजर, श्री बाळासाहेब कंकराळे, एरिया मॅनेजर व श्री दिपक औटी मॅनेजर हे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सध्या त्यांना द्वारावती भक्तनिवास स्वच्छता/ हाऊसकिपींग आऊटसोर्सिंग कामी देण्यात येत असलेल्या दरमहा रु.६,२५,०००/-या दराऐवजी दरमहा रु.७,२५,०००/- या दरात काम करण्याची तयारी दर्शविली.

**निर्णय क्र.२४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास स्वच्छता/ हाऊसकिपींग कामी मे.बी.व्ही.जी. लि.,पुणे यांना आऊट सोर्सिंग पध्दतीने दिलेले कामी पूर्वीचेच अटी शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रु.६,२५,०००/-या दराऐवजी दरमहा रु.७,२५,०००/- या दरात देण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवास्थान)

---

**विषय नं.७४ साईआश्रम -०१ (खोल्या) साईआश्रम-०२ (हॉल) मधील हाऊसकिपींग कामासाठी निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्धीस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग १ व भाग २ चे बांधकाम पूर्ण होत असून सदर इमारती मधील खोल्या/हॉल हे साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

या इमारतीतील खोल्या/हॉल मध्ये निवासाची व्यवस्था होऊ शकणा-या भक्तांची संख्या इत्यादीची माहिती खालील प्रमाणेः-

**अ) साईआश्रम :- ०१ खोल्या ( A-Block Bldgs- १२ Nos):-**

| अ.नं | एकूण इमारती | एकूण मजले | प्रत्येक इमारतीमधील खोल्यांची संख्या | एकूण खोल्यांची संख्या | एका खोलीत भक्तांची संख्या क्षमता | निवास क्षमता भक्तांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | A-Block - १२ इमारती | तळमजला +३(G+३) | १२८ खोल्या | १५३६ | ३+२= ५ भक्त | ७६८० |

**ब) साईआश्रम :- २ हॉल (B-Block-Bldgs-६ Nos)**

| अ.न. | एकूण इमारती | मजले | प्रत्येक इमारतीमधील हॉल ची संख्या | एकूण हॉलची संख्या | एका हॉलमधील भक्ताची क्षमता | निवास क्षमता भक्तांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | B-Block- ०६ इमारती | तळमजला +३(G+३) | ३२ हॉल्स | १९२ हॉल्स | ५+२०= २५ भक्त | ४,८०० भक्त |

वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे साईआश्रम-१ मध्ये अंदाजे ७,६८० व साईआश्रम-२ मध्ये अंदाजे ४,८०० भक्त असे दोन्ही मिळून १२,४८० इतक्या साईभक्तांची निवासव्यवस्था होणार आहे.

उपरोक्त निवासस्थान साई भक्तांना वापरासाठी उपलब्ध करून देणेकामी निवास साहीत्य उदा.कॉट, गाद्या, चादर,बेडशीट,रॅक,अंघोळीसाठी प्लास्टीक बादल्या,मग,स्टुल,पिण्याचे पाण्याचे जग व ग्लास इत्यादीची खरेदी करण्यात आलेली आहे.

नव्यानेच दोन विभाग सुरु होणा-या इमारती मध्ये कार्यालयीन, हाऊसकिपींग व विदयुत, पाणीपुरवठा, सुतारी मेन्टेनन्स कामासाठी साईआश्रम-१ विभागासाठी स्थायी कर्मचारी १९ व आऊटसोर्स कर्मचारी ४२७ (सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे ) तसेच साईआश्रम-२ विभागासाठी स्थायी कर्मचारी १२ व आऊटसोर्स कर्मचारी १४५ (सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब प्रमाणे ) असे एकूण स्थायी कर्मचारी ३१ व आऊटसोर्स कर्मचारी ५७२ एकूण ६०३ अंदाजे कर्मचारी लागणार असून साईआश्रम-१ व २ या विभागासाठी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे कर्मचा-यांच्या पगारावर अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| विभाग | स्थायी कर्मचारी | | | **आऊटसोर्स कर्मचारी** | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | मासिक पगार खर्च | वार्षिक पगार खर्च | **संख्या** | **मासिक पगार खर्च** | **वार्षिक पगार खर्च** | संख्या | मासिक पगार खर्च | वार्षिक पगार खर्च |
| साईआश्रम-१ | १९ | ३,०५,९३१ | ३६,७१,१७२ | **४२७** | **२४,८८,६५३** | **२,९८,६३,८३६** | ४४६ | २७,९४,५८४ | ३,३५,३५,००८ |
| साईआश्रम-२ | १२ | २,०१,५७४ | २४,१८,८८८ | **१४५** | **८,८७,१२२** | **१,०६,४५,४६४** | १५७ | १०,८८,६९६ | १,३०,६४,३५२ |
| एकूण | ३१ | ५,०७,५०५ | ६०,९०,०६० | **५७२** | **३३,७५,७७५** | **४,०५,०९,३००** | ६०३ | ३८,८३,२८० | ४,६५,९९,३६० |

विदयुत विभाग,पाणी पुरवठा व बांधकाम या विभागाचे मेन्टेनन्स कामी लागणारे साहीत्याची यादी निविदा सोबत सदर करुन त्या साहीत्याचे प्रती नग वार्षिक दर घेवून, मंजुर केलेल्या दराने जे साहीत्य वापरले जाईल त्याचे बील कॉन्ट्रॅक्टरने दरमहा सादर केल्यानंतर त्यांची रक्कम त्यांना अदा करण्यात येईल.

या दोन्ही विभागासाठीचे स्थायी पदावरील कर्मचारी आस्थापना विभागाकडून उपलंब्ध होतील तथापी हाऊस किपींग व इतर मेन्टेनन्स (विदयुत,पाणी पुरवठा,बांधकाम-सुतारी) यासाठी लागणारे

कर्मचारी यासाठी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन साईआश्रम-१ व साईआश्रम-२ करिता दोन वेगवेगळया निविदा विक्री करुन दोन वेगवेगळया निविदा मागवाव्या लागतील.

सबब दोन्ही विभाग नव्याने सुरु होणार असल्याने आऊटसोर्स कर्मचारी आवश्यकते नुसार घेता येतील त्यासाठी संबधीत हाऊसकिंपीग कॉन्ट्रॅक्टर यांना लेबर अॅक्ट नुसार पगार निश्चित करून हाऊस किंपीग कामाची रक्कम निवेदेतून ठेकेदाराकडून मागवावी लागेल.

निविदा सादर करणा-या ठेकेदाराकडील मनुष्यबळ संख्या,कामाचा दर्जा,काम करण्याची पध्दती, मशिनरी व इतर साहीत्य केमिकल्सचा वापर व कामाचा अनुभव इत्यादी बाबीचा निविदेत उल्लेख करुन निविदा विक्रीस ठेवाव्या लागतील. तसेच सदरचे ठेकेदाराने निविदा भरल्यावर निविदेतील अटी शर्तीची पूर्तता करणा-या पात्र निविदा धारकास मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने काम देता येईल.

तरी सदर कामी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यास व दोन्ही विभागाच्या निविदा विक्री करुन मागविणे बाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत,पाणीपूरवठा व बांधकाम या विभागाचे मेंटेनन्स साहित्य संस्थाननेच पुरवावे फक्त मेंटेनन्स कामे तसेच साईआश्रम -०१ (खोल्या) साईआश्रम-०२ (हॉल) मधील हाऊसकिपींग कामासाठी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन, कोऱ्या निविदा विक्री करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

---

**विषय नं.७५ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी (अ) प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल, (ब) प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी, (क) प्रशिक्षणार्थ्यांसाठी कार्यशाळा गणवेष व शिक्षक कर्मचाऱ्यांना गणवेष, (ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई, (इ) प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने गणवेष, सेप्टी शुज-सॉक्स व केंद्रशासनाच्या NIMI संस्थेची पुस्तके खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट २०१२ पासून सुरु होत आहे, या सत्रामध्ये प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थी संख्या खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | युनीट | प्रथम वर्षव्यवसाय तुकडया |
|---|---|---|---|
| ०१ | टुल अॅण्ड डायमेकर | ०२ | २१ |
| ०२ | इलेक्ट्रीशियन | ०२ | २१ |
| ०३ | मोटर मेकॅनीक | ०२ | २१ |
| ०४ | फिटर | ०३ | ४२ (यामध्ये १ तुकडी प्रस्तावित आहे) |
| ०५ | मेकॅनीक आर.ए.सी. | ०२ | २१ |
| ०६ | मशिनीष्ट ग्राईंडर | ०२ | १६ |
| ०७ | टर्नर | ०२ | १६ |
| ०८ | आय.टी.अॅण्ड ई.एस.एम. | ०२ | २१ |
| ०९ | कॉम्पुटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामींग असिस्टंट | ०२ | ५२ |
| १० | वेल्डर (गॅस अॅण्ड इलेक्ट्रीक) | ०२ | ३२ |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ४२ |
| १२ | क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन | ०१ | २१ |
| | | | **३२६** |

संस्थेमार्फत प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल,प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी,कार्यशाळा गणवेष, शिक्षक कर्मचा-यांसाठी गणवेष, प्रवेश प्रकियेसाठी माहितीपुस्तिका -प्रवेशअर्ज तसेच प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने गणवेष,सेप्टी शुज-सॉक्स व केंद्रशासनाच्या NIMI संस्थेची पुस्तके यांची दरवर्षी खरेदी केली जाते. या सत्रासाठीही खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

**अ) प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी कच्चा माल खरेदी :-**

२०११-१२ शैक्षणिक वर्षासाठी लागणारा प्रात्यक्षिक कच्चा माल व भांडारमध्ये शिल्लक असलेला कच्चा माल यांची पडताळणी करुन खरेदीकरीता आवश्यक असलेल्या कच्चा माल खरेदीकामी अंदाजे रु. ५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी खरेदी:-**

| अ. क्र. | स्टेशनरी तपशिल | खरेदी आवश्यक | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही १५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम,११.७ कि.ग्रॅम दोन्ही बाजुंनी पुठ्ठाबायडींग ३४x२१ से.मि.(छपाई नमुन्या प्रमाणे) | ४७५ नग | ८५/- | ४०३७५.०० |
| ०२ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम दोन्ही | १९० नग | ४०/- | ७६००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४x२१ से.मि.११.७ कि .ग्रॅम (छपाई नमुन्या प्रमाणे) | | | |
| ०३ | थेअरी पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८०जीएसएम,११.७ कि .ग्रॅम ३४x२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | ८९० पॅड | ५०/- | ४४५०० |
| ०४ | स्केच पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद८० जीएसएम,११.७ कि .ग्रॅम३४x२१ से.मि. लेदर बायडींग(नमुन्या प्रमाणे) | ५० नग | ५०/- | २५००.०० |
| ०५ | दैनंदिनी छापील ७० पेजेस (नमुन्याप्रमाणे) जे.के. बॉण्ड पेपर | ५०० नग | ५०/- | २५०००.०० |
| ०६ | ड्रॉईंग शिट हाफ इंम्पेरीयल २५ नगाचा एक सेट सनशाईन कागद | ५० सेट | ६०/- | ३०००.०० |
| ०७ | २ क्वायर रजिष्टर ३४x२१ से.मि.(नमुन्या प्रमाणे) | ४५० नग | ४०/- | १८०००.०० |
| ०८ | ड्रॉईंग १/४ इंपेरीयल रजिष्टर ५० शिटचे एक रजिष्टर सन शाईन कागद ५६x३६ से.मि. (कागद व छपाई नमुन्या प्रमाणे ) | ४४० नग | ७०/- | ३०८००.०० |
| ०९ | CFP प्रॅक्टीकल जर्नल १०० पानी लेजर पेपर ७० जीएसएम,साईज ३४ x २१ से.मि. | १०० नग | ६०/- | ६०००.०० |
| १० | सेट स्क्वेअर ओमेगा कंपनी ४५ व ६० अंश | १०० नग | ३०/- | ३०००.०० |
| | | एकुण... | | १८०७७५.०० |

**क) प्रशिक्षणार्थ्यांसाठी कार्यशाळा गणवेष व शिक्षक कर्मचा-यांना गणवेष-**

| अ.क. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षक कर्मचारी नियमित गणवेष व दोन टाय | ३५ | ७० | १२५०/- | ८७,५००.०० |
| ०२ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी) | ३२६ | ३२६ | ६००/- | १,९५,६००.०० |
| ०३ | CFP प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | २१ | २१ | ६००/- | १२,६००.०० |
| ०४ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | ५२ | ५२ | २००/- | १०,४००.०० |
| ०५ | मुलींसाठी ॲप्रान | ३० | ३० | २००/- | ६,०००.०० |
| | | | | एकुण... | ३,१२,१००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

**ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई बाबत. :-**

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सत्र ऑगष्ट २०१२ मधील प्रवेश प्रक्रिया एस.एस.सी.चा निकाल घोषीत झालेच्या दुस-या दिवसापासुन सुरु होत असते. प्रवेशाबाबतची माहिती उमेदवारांना देणेकामी संस्थेची माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी लागते. त्यामध्ये संस्थेमध्ये चालविले जाणारे व्यवसाय, प्रवेश पध्दती, संस्थेची नियमावली व इतर माहिती उमेदवारांना माहिती पुस्तिकेतुन दिली जाते.या दृष्टीने या सर्व उपक्रमांची माहिती माहिती पुस्तिकेतुन उमेदवार व समाजापर्यंत पोहचविली जाते.

याकरीता यावर्षीच्या माहिती पुस्तिकेमध्ये वरील सर्व उपक्रमांची माहिती तसेच वेळोवेळी संकलीत केलेले फोटोग्राफ्स समाविष्ठ करुन माहिती पुस्तिका चांगल्या दर्जाची छपाई करुन घ्यावी असे मत आहे.

मागील वर्षी ३००० माहिती पुस्तिका,प्रवेश अर्ज व प्रवेश कार्यक्रम पत्रिका हे रु.१०.९० प्रती नग या दराने छपाई करुन रु.१५/- या दराने वितरीत केली. माहिती पुस्तिका छपाई करुन घेतलेस अंदाजे रु.१५/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार रु.१५/- या दराने ती वितरीत करता येईल. या प्रमाणे माहिती पुस्तिका व नियमावली ५००० नग पर्यंत छपाईसाठी रु.७५०००/- खर्च अपेक्षित आहे.

**इ) पुस्तके,गणवेष व शुज विद्यार्थ्यांच्या खर्चाने खरेदी :-**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष (प्रत्येकी दोन गणवेष) | ६५२ | ६५२ | ६००/- | ३,९१,२००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता (प्रत्येकी दोन गणवेष ) | ६० | ६० | ६००/- | ३६,०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी शुज, मोजे | ३२६ | ३२६ | ७००/- | २,२८,२००.०० |
| ०४ | केंद्र शासनाच्या नॅशनल इन्स्ट्रक्शनल मेडीया इन्स्टीटयूटने (NIMI) प्रकाशित केलेली पुस्तके | ३२६ | ३२६ | ६००/- | १,९५,६००.०० |
| | | | | एकुण. | ८,५१,०००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होऊ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.अशी वरील अ, ब, क व ड नुसार एकुण रु.०९,९२,८७५/-ची खरेदी ही न्युनतम दर असलेल्या पुरवठादारां कडून करता येईल. तसेच वरील (इ) चे बाबत मागील वर्षी पर्यंत प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमित गणवेष व शुजसाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेउन ती लेखाशखेत अनामत खाती ठेउन एकत्रित खरेदी प्रक्रिया करुन पुरविण्यात येत असत व त्यांची उर्वरित रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती अवलंबीलेली आहे. चालू वर्षी याकामी प्रशिक्षणार्थ्याकडून प्रत्येकी रु.२५००/-जमा घेता येतील. तसेच सदर रक्कम लेखाशाखेत कपडे ,पुस्तके व शुज अनामत खाती ठेउन खरेदी व वितरण प्रक्रिया पुर्ण करता येईल.

वरीलप्रमणणे खरेदी व कार्यवाहीस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे खरेदी व कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय)

---

**विषय नं.७६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट २०१२ चे प्रशिक्षणार्थी प्रवेशाबाबत**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २०१२ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २०१२ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २०१२ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश...

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक-२७/०२/२०११ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ३९ निर्णय क्रमांक १६३ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला.

१९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या खालील गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. याशिवाय क्वचीत प्रसंगी अर्जदारांचे बहुतांश शिक्षण १५ कि.मी.मधील गांवात झालेले असते,पैकी १० वी,१२ वी किंवा एखाद-दुसरे वर्ष परिसराबाहेर शिक्षण झालेले असेल त्यांचा अर्ज १५ कि.मी. साठीच्या जागांवर घेण्याचा प्रकरणपरत्वे निर्णय घेणेचे अधिकार मागील वर्षापासून प्राचार्य यांना उपरोक्त निर्णय क्रं.३८४ अन्वये दिले आहेत.

**शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव-देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाउच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाउच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेउर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेउर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठी जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते खालीलप्रमाणे

अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा (तक्ता क्र. २)

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१) (जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |
| | एकूण- | ५० % |

ब. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

क. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

ड. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

इ. संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

फ. सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

महिलांसाठी व्यवसाय निहाय आरक्षण ३०% झालेले आहे. तसेच सर्वांच्या प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा अट शासनानी काढून टाकली आहे.

१ ऑगस्ट २०१२ पासून सुरु होणा-या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी खालीलप्रमाणे असतील.

(तक्ता क्र. ४)

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता नियमित | सुपर न्युमररी जागा ३० % | एकूण | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| २ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| ३ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६+१६) | ०५ +०५ | २१+२१ | १७ + १७ | ४ + ४ |
| ४ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ५ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ६ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ७ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ८ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०७ | ३१ | २५ | ६ |
| ९ | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | १० | ४२ | ३३ | ९ |
| १० | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | १२ | ५२ | ४५ | ७ |
| ११ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| | | | | २३० | ७२ | ३०४ | २४८ | ५६ |

वरील पैकी अ.नं. १ ते ११ च्या सर्व व्यवसायांना व तुकडयांना केंद्र शासनाची कायमची मान्यता (संलग्नता) पुर्वीच मिळालेली आहे. तथापी क.४ वरील फिटर व्यवसायाची अतिरीक्त ३ री तुकडी सुरु करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन साहित्य खरेदी प्रक्रीया सुरू आहे.या तुकडीला शासनाची मान्यता वेळेत मिळाली तर प्रवेश देता येतील अन्यथा ऑगस्ट २०१३ पासून त्यात प्रवेश देता येतील.

टुल अँड डायमेकर हा व्यवसाय तीन वर्षे कालावधीचा असून केंद्र दोन सत्रांमध्ये चालत असल्याने ऑगस्ट -२०१० व २०११ पासूनच्या सत्रामध्ये या व्यवसायात प्रवेश दिला असल्याने दोन तुकडया दोन शिफ्ट मध्ये चालु आसल्याने ऑगस्ट २०१२ मध्ये या व्यावसायात प्रवेश देता येणार नाही . मागील वर्षी या जादा जागा २०% ऐवजी ३०% भरण्यास शासनानी मान्यता दिल्यामुळे ३०% प्रमाणे भरल्या आहेत.या पुढेही जादा जागा शासनाकडून मान्यता मिळेल त्याप्रमाणे भरता येईल.

तक्ता क्रं. ३ मध्ये दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही. तसा बदल झाल्यास संबधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. मागील वर्षी पासून सुपरन्युमररी जागेवर शासनाच्या मान्यतेनंतर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्याचे ठरले. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तकात देण्यात आली.त्या जागांना गुणानुक्रम व आरक्षण यांचे बंधन पाळता येत नाही. त्यामुळे आता या जागांसाठी गुणानुक्रम व आरक्षण याचे बंधन असणार नाही असे माहीती पूस्तकात नमुद केली आहे. तसे या पुढेही करता येईल.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकृतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

शैक्षणिक शुल्क व अनामत रक्कम :-

ऑगस्ट २००८ च्या सत्रापासून शैक्षणिक शुल्क तक्ता क्रं. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व अनामत रक्कम रु. ५०००/- मात्र एवढी आकरण्यात येत आहे. तसेच दि. ०७/०७/२००८ च्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.०२ निर्णय क्रं. ५६० नुसार, संस्थेच्या दर्जानुसार व व्यवसायाच्या (ट्रेडच्या) प्रकार गटानुसार वेगवेगळी प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आलेली आहे. आपले औ.प्र. केंद्राला शासनाचा "अ" दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व्यवसायांना खालीलप्रमाणे प्रशिक्षण शुल्क प्रतिविद्यार्थी प्रती वर्षी घेण्यात येते.

तक्ता क्र. ५

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागा ६+७ | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | रु. १२,०००/- |
| २ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | रु. १२,०००/- |
| ३ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६+१६ | ०५+०५ | ४२ | रु. ०८,४००/- |
| ४ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ५ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ६ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ७ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ८ | वेल्डर (गॅस ॲण्ड इलेक्ट्रीक) | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०७ | ३१ | रु. ०८,४००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ट्रॅक्टर मॅकेनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | १० | ४२ | रु. ०८,४००/- |
| १० | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | १२ | ५२ | रु. ०८,४००/- |
| ११ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०५ | २१ | रु. ०६,०००/- |
| | | | | २३२ | ७२ | ३०४ | |

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. तसेच संस्थेमध्ये ट्रेड किंवा तुकडया वाढू शकतात तसेच नियमित अभ्यासक्रमांबरोबरच MS-CIT, City & Guild, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ यांचेही अभ्यासक्रम चालतात. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किम (MES) या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. यांची तसेच संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करण्यात येतात. तसेच सुधारित शुल्काबाबत जो निर्णय होईल त्याचीही माहिती त्यामध्ये नमुद करावी लागेल. चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी वरीलप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २०१२ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश देणेकामी मा. व्यवस्थापन समितीमध्ये निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.२४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.७७** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या जागेस मुदतवाढ व करारनामा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** १)प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना दि.२१/०८/२००३ पासून संस्थानचे सर्व्हे नं.१४८/२ मध्ये (४ खोल्या ११४.३२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रासह व २६६.२८ चौ.मी. मोकळी जागा ) भाडेपट्टा तत्वावर देण्यात आलेली आहे. सदर जागेस वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दि.२०/०८/२०११ अखेर मुदत संपल्यावर दि.२१/०८/२०११ ते दि. २०/०८/२०१२ या एक वर्षासाठी प्रसार भारती यांना मुदतवाढ देणेबाबत दि. २४/०९/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ७३३ नुसार- प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इडिया, मुंबई यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या जागेस मासिक प्रस्तावित केलेली मासिक फी आकारुन श्री साईबाबांच्या आरत्या प्रक्षेपण करण्याचे अटीवर दि.२१/०८/२०११ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. याकामी करारनामा मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर, यांचे सल्याने करण्यात यावा, असे ठरले आहे.`

सदरच्या झालेल्या निर्णयानुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इडिया, मुंबई यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या जागेस मासिक प्रस्तावित केलेली रु.४,०२४/- मात्र मासिक फी आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन श्री साईबाबांच्या आरत्या प्रक्षेपण करण्याचे अटीवर दि.२१/०८/२०११ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे व याकामी करारनामा मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर, यांचे सल्याने करण्यात येणार आहे, असे संबंधीतांना जा नं. एसएसएस/ वशी -विधी/४०६६/२०११ दि.०९/११/२०११_रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉड कास्टींग यांना कळविणेत आलेले आहे.

मा.श्री.खांबेकरसो.यांनी दि.०२/०२/२०१२ रोजी प्रसारभारतीचे श्री.बारापात्रे, डे.डायरेक्टर, श्री बस्ते, इंजिनिअर, नाशिक, श्री बी.ए.जपे,असि.इंजिनिअर, शिर्डी यांचेबरोबर करारनाम्याबाबत व श्री साईबाबांचे आरती प्रक्षेपणाबाबत बोलणी झाली. त्यात प्रसारभारतीचे अधिका-यांनी - करारनाम्याचा मसुदाचे पत्र प्रसारभारतीचे महानिदेशक, न्यु दिल्ली यांचे मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून महानिदेशकांची परवानगी पत्र मिळताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, मात्र यासाठी अजून काही कालावधीची गरज आहे, असे सांगितले आहे. त्यांचेकडून तसे संस्थानला दि.१६/०१/२०१२, जा.क्र.५६४ चे पत्राने देखील कळविलेले आहे. मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकरसो. विश्वस्त यांना दि.२९/११/२०११ रोजीचे पत्रावर - A.O. - ६ महिने मुदत वाढवावी. सदर करारनामा या काळात पुर्ण करावा, असे यांनी सुचीत केलेले आहे.

करारनामा दि.२१/०८/२०११ ते दि.२०/०२/२०१२ या मुदतीचा Execute करणे आहे. सदरचा कालावधी संपुष्ठात येत असल्यामुळे तत्पुर्वी करारनामा तात्काळ करुन देणे आवश्यक असल्याचे प्रसारभारती दुरदर्शन यांना जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/५६८२/१२, दि.११/०२/१२ ने कळविणेत आलेले आहे. श्री साईबाबांचे आरत्या प्रक्षेपित करणेचे अटीवर त्यांना जागा वापराबाबत मुदतवाढ देणेत मा. व्यवस्थापन समितीकडून ठरावाने मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि अद्यापपावेतो प्रसार भारती हे करारनामा Execute करुन देत नाही. श्री साईबाबांचे आरती प्रक्षेपण करीत नाही. त्याचप्रमाणे पुढील मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव त्यांचेकडून प्राप्त होणे आहे.

प्रसार भारती, दुरदर्शन केंद्र यांना मुळतः जागा श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट लागू होणेपुर्वी १५ वर्षासाठीचे भाडेपट्याने जागा वापरांस दिली आहे. अधिनियम लागू झाल्यानंतर त्यांना वेळोवेळी १-१ वर्षाची वरीलप्रमाणे मुदतवाढ दिलेली आहे.

दि.०२/०२/२०१२ रोजी विश्वस्त श्री खांबेकरसाो. व प्रसारभारती, यांचे नाशिक येथील डेप्युटी डायरेक्टर श्री बारापत्रे यांची चर्चा झाली. त्यांचे झालेले चर्चेनुसार मा.विश्वस्त श्री. खांबेकरसाो. यांनी प्रसारभारती यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या जागेस सध्याचीच मासिक फी रु.४,०२४/- आकारुन दि.२१/०२/२०१२ पासून पुढे आणखी सहा महिने मुदतवाढ देणेबाबत सुचीत केलेले आहे. त्यानुसार सदरचा विषय मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या जागेस दि.२१.०२.२०१२ पासून पुढे ०६ महिने (विद्युत आकार वेगळे आकारुन) मुदतवाढ व करारनामा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**विषय नं.७८** **निर्मल ग्रामीण बहूउद्देशिय संस्था, हरेगांव ता.श्रीरामपूर यांना इमारत बांधकामास अर्थिक मदत देणे बाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, निर्मल ग्रामीण बहुउद्देशीय संस्था, हरेगांव, ता.श्रीरामपुर, जिल्हा-अहमदनगर यांनी दि.३०/१२/२०११ चे पत्राने, निर्मल ग्रामीण बहुउद्देशीय ही संस्था, एड्स बाधित रुग्णांचे कौटुंबिक पुनर्वसन, त्याच बरोबर विधवा परितक्ता आणि पिडीत महिला व मुले यांचे स्थायी पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आली आहे. सध्या संस्थेचे कार्य ग्राम पातळीवर सुरु असुन अशाप्रकारच्या महिला व मुलांचे प्रमाण या भागामध्ये लक्षणिय आहे.

आम्हाला लोक सहभागातुन जागा उपलब्ध झाली असुन इमारत बांधकामासाठी निधीची आवश्यकता आहे. तरी आम्हास या सामाजिक कामाकरीता मदत मिळावी, अशी त्यांनी विनंती केलेली असून अर्जासोबत त्यांनी संस्थेची नोंदणी दि.०१/०९/२०१० रोजी झाल्याचे नोंदणी पत्र जोडलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय, यांनी सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेववा, असे निर्देश दिलेले आहेत.

अधिनियमातील कलम २१ (दोन) मधील तरतुदीस अनुसरुन दि.२८/०६/२००९ चे मा.छाननी समितीचे सभेत अनुदान देणेबाबत नियमावली व पात्रतेचे निकष ठरविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये अनुदान मागणी करणाऱ्या संस्थेची नोंदणी होऊन १० वर्ष कार्यकाल पुर्ण झालेला असावा, असा नियम आहे. मात्र निर्मल ग्रामीण या संस्थेची नोंदणी होऊन १ वर्षे ५ महिने झाले आहे.

तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२४८ यावर सविस्तर चर्चा होऊन,निर्मल ग्रामीण बहूउद्देशिय संस्था, हरेगांव ता.श्रीरामपूर यांना इमारत बांधकामास अर्थिक मदत मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.७९** **श्री रामनवमी उत्सव २०१२ बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

श्री साईबाबांनी हयात असतांना शिर्डीत श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यानुसार रामनवमी उत्सव-२०१२ हा १०१ वा उत्सव आहे.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्रीरामनवमी उत्सव शनिवार दिनांक ३१/०३/२०१२ ते सोमवार दिनांक ०२/०४/२०१२ (चैत्र शुध्द ८ शके १९३४ ते चैत्र शुध्द १० शके १९३३) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | रामनवमी-२०१२ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | **उत्सव निमंत्रण पत्रिका व उत्सव उदिप्रसाद** | भक्त मंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन एक लाख बासष्ठ हजार दोनशे निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट( न्यूज अॅटम) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२. | **उत्सव व्यवस्था-** | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | **शनिवार, दिनांक-३१/०३/२०१२ ( प्रारंभ दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | **रविवार दिनांक ०१/०४/२०१२ ( मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>२) रात्री १०.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (०२/०४/२०१२) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **सोमवार दिनांक ०२/०४/२०१२ ( सांगता दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता स्वतंत्र अवलोनार्थ सादर केला जाईल. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | श्री रामनवमी कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, हे करीत असतात. त्यांचेकडून आलेल्या कीर्तनकारामार्फत कीर्तने होतील. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ०३. | **श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा** | गर्दीच्या व्यवस्थापनाच्या सोईच्या दृष्टीने उत्सवकाळात सत्यनारायण व अभिषेक पूजा बंद ठेवण्यात येतात. उत्सवकाळात दि. ३१/०३/२०१२ ते दि. ०२/०४/२०१२ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद ठेवता येतील. |
| ०४. | **अखंड पारायण व्यवस्था** | उत्सव काळात दिनांक ३१/०३/२०१२ रोजी सकाळी ०६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १/०४/२०१२ रोजी सकाळी ०५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक ३०/०४/२०१२ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई मंदींर रात्रभर उघडे राहील. |
| | | श्री रामनवमी उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्तांची नांवे ठरविणे आहेत. सोबत कोरा तक्ता जोडलेला आहे. तसेच सदरचे विश्वस्त मंडळ अधिकारारुढ झाल्या पासून श्री पुण्यतिथी उत्सव सन २०११ पर्यंत मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. विश्वस्तांचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे.<br>सदर कार्यक्रमात या उत्सवात कोणत्या विश्वस्तांचा सहभाग असावा याबाबत नावें निश्चिती करणे आहे. |
| ०५) | **पालखी व रथ मिरवणूक** | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दि.३१/०३/२०१२ रोजी ९.१५ वाजता श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक व मुख्य दिवशी रविवार दिनांक ०१/०४/२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता रथाची गांवातून मिरवणूक निघेल. |
| ०६) | **कावडी व निशाणांची मिरवणूक** | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक ०१/०४/२०१२ रोजी सकाळी ५.१५ वाजता कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणांची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षीण गेटच्या समोर अभिषेक मूर्ती ठेवून स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| **०७)** | **विद्युत रोषणाई** | श्री रामनवमी उत्सवात श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.<br>विद्युत विभागामार्फत त्यांना या उत्सवात रोषणाई करणेचे पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| **०८)** | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने नेहमीप्रमाणे जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात येईल. |
| **०९)** | **प्रसाद - भोजन व्यवस्था** | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्याचे कुटुंबिय तसेच निमंत्रीत कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन नेहमी प्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>सन २०११ चे पुण्यतिथी उत्सवात तिन्हीही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>(०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br>**याही उत्सवात मागील उत्सवा प्रमाणे तीन मिष्टांन्न देता येतील.** |
| **१०)** | **लिलाव** | श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तूंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने उत्सवाचे तिन्ही दिवशी विक्री करण्यात येईल. |
| **११)** | **देणगी काऊंटर्स** | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. तसेच देणगी काऊटर्सची वेळ सकाळी ४ ते रात्रौ ११ पर्यंत करण्यात येईल. |
| **१२)** | **जादा कंत्राटी कर्मचारी** | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. |
| **१३)** | **भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था** | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, धर्मशाळा नं. २, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व उन्हाळी मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार साईप्रसाद निवासस्थानाकडे तक्ता करण्यात येऊन त्यांचे निवासाबाबत सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| **१४)** | **प्रथमोपचार केंद्र** | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीत वाडा येथे तीनही दिवशी तिन शिप्ट मध्ये व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशद्वार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तिन शिप्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५) | **पालखी व्यवस्था** | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, धर्मशाळा इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे व धर्मशाळेच्या मोकळ्या जागेत मंडप/शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याच प्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या संबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी), खोपडी- दत्तमंदिर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईले. तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानमार्फत एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामूल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामूल्य देण्यात येईल. |
| १६) | **कुस्त्या हंगामा** | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गांवक-यां मार्फत भरविण्यात येतो. गेल्या वर्षी श्री रामनवमी उत्सवाचे १०० वर्ष असल्याने विशेष बाब म्हणून संस्थाने कुस्त्यांसाठी रुपये ३,००,०००=०० ( अक्षरी रुपये तिन लाख मात्र ) चे खर्चास मंजूरी देण्यात आलेली होती.<br>या वर्षी द्यावयाची रक्कम निश्चित करणे आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षाप्रमाणे् रु. ३ लाखांची तरतूद दर्शविण्यात आलेली आहे. व्यवस्थापन समितीचे मंजूरीनूसार सदर तरतूद कमी / जास्त करता येईल. |
| १७) | **पाणीपुरवठा** | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८) | **कार्यक्रमाची सांगता** | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १९) | **खर्चाचे अंदाज पत्रक** | श्री रामनवमी उत्सव -२०११ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५९,००,०००.०० (अक्षरी रु. एकोणसासाठ लाख मात्र)) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ५९,८४,९९३/-(अक्षरी रु. एकोणसाठ लाख चौ-याऐंशी हजार नऊशे त्रॅन्नव मात्र) इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी उत्सव- २०१२ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६७,००,०००.०० (अक्षरी रु. सदूसष्ठ लाख मात्र) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

तरी श्री रामनवमी उत्सव २०१२ साजरा करणेस, याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ६७,००,०००.०० (अक्षरी रू.सदुसष्ठ लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०१२ साजरा करण्यास व प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस तसेच याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.८० श्री पुण्यतिथी उत्सव, २०११ अंदाजपत्रक व झालेल्या प्रत्यक्ष खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २८/०८/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ६५७ अन्वये श्री पुण्यतिथी उत्सव २०११ साठी एकूण खर्च रु. ५२,००,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र एकूण अंदाजीत खर्चापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. परंतू काही बाबीवर अंदाजत्रकापेक्षा कमी खर्च झालेला आहे. तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | केलेली अंदाजपत्रकीय तरतूद | प्रत्यक्षात झालेला खर्च | तरतुदी पेक्षा कमी झालेला खर्च | तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप, कमानी ,स्टेज व इतर | ११०००००.०० | २७९२४०७.०० | ०.०० | १६९२४०७.०० |
| ०२. | कलाकार बिदागी , कीर्तनकार व निमंत्रीत कलाकार बिदागी खर्च | ५०००००.०० | १२२०५५.०० | ३७७९४५.०० | ०.०० |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न, अन्नदान कक्ष व श्रमपरिहारासह मजूरीसह गांवजेवण | ८०००००.०० | ४३६७९१.०० | ३६३२०९.०० | ०.०० |
| ०४. | विद्युत रोषणाई. जनसेट भाडे / इंधन खर्च . | ७५०००००.०० | ७६३२५९.०० | ०.०० | १३२५९.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **०५.** | निमंत्रण पत्रिका जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह.१ लाख ४७ हजार तहहयात, आश्रयदाते विदेशी भक्तांसह | १६०००००.०० | १४७७३६४.०० | १२२६३६.०० | ०.०० |
| **०६.** | जादा कर्मचारी खात्यांचे मागणी नुसार | २९००००.०० | १६८९८४.०० | १२१०१६.०० | ०.०० |
| **०७.** | इतर खर्च-मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, आराधना विधी (गणवेष समावेश), गेस्ट- हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग,पेंटर बीले | १०००००.०० | २४११९.०० | ७५८८१.०० | ०.०० |
| **०८.** | पालखी पिण्याच्या पाण्याची टँकर व्यवस्थाव दर्शनरागेंतील भक्तांना वाटण्यात येणारे पिण्याचे पाण्याचा पाऊच खर्च | ५००००.०० | ०.०० | ५००००.०० | ०.०० |
| **०९.** | मंदिर व मंदिर परिसर फुलांचे डोकारेशन खर्च | १००००.०० | ०.०० | १००००.०० | ०.०० |
| | | ५२,००,०००.०० | ५७८४९७९.०० | ११२०६८७.०० | १७०५६६६.०० |

अ.नं. ०१ म्हणजे मंडप कमानी , व स्टेज या बाबींवर रु.११,००,०००/- ची तरतूद करण्यात आलेली होती परंतू याकामी एकूण रु २७९२४०७/- इतका म्हणजे तरतूदी पेक्षा रु. **१६९२४०७/-** इतका जादा खर्च झालेला आहे. या खर्चास बांधकाम विभागाने व्यवस्थापन समितीची दिनांक २४/०९/२०११ चे सभेत निर्णय क्रं. ६८५ अन्वये मान्यता घेतलेली आहे.

तसेच अ.नं. ४ विद्युत रोषणाई. जनसेट भाडे / इंधन खर्च इ. करीता रु.७,५०,०००/- ची तरतूद करण्यात आलेली होती परंतू याकामी एकूण रु ७,६३,२५९/- इतका म्हणजे तरतूदी पेक्षा रु. **१३,२५९/-** इतका जादा खर्च झालेला आहे.

उर्वरीत बाबीवर मंजूर अंदाजपत्रकिय तरतूदी पेक्षा कमी खर्च झालेला आहे.

श्री पुण्यतिथी उत्सवा चे खर्चाकरीता एकुण रु. ५२,००,०००.०० अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली होती, परंतू प्रत्यक्षात मात्र रु. ५७,८४,९७९/- इतका एकूण खर्च झालेला आहे. म्हणजे अंदाजीत खर्चापेक्षा रु.५,८४,९७९/- मात्रने खर्च जादा झालेला आहे. त्यास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी झालेल्या खर्चाचे योग्य स्पष्टीकरणासह सविस्तर तपशिल पूढील व्यवस्थापन समितीपुढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.८१ श्री साई सत्च्चरित पारायण सोहळा-२०११ खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१२/०६/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. १२५, व निर्णय क्र.४६२ अन्वये श्री साई सत् चरित पारायण सोहळा -२०११ मधील श्री साईसच्चरित पारायणा करीता एकूण खर्च रु. ७,३०,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) आयोजित, नाट्य रसिक संच, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ, यांचे सहकार्याने श्री साईसच्चरीत पारायण सोहळा दि.३१/०७/२०११ ते दि. ०८/०८/२०११ अखेर नऊ दिवस हनुमान मंदिराचे शेजारील मैदानात साजरा करण्यात आला. यात ३३०० वाचकांनी सहभाग घेतला होता. सदर पारायण सोहळ्यासाठी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.नं. | तपशील | सन २०११ करीता अंदाजीत खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतूदी पेक्षा कमी खर्च | तरतूदी पेक्षा जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था, कमानी , स्टेज, सजावट व अनुशंगीक खर्च | २०००००.०० | ४२०५००.०० | ०.०० | २२०५००.०० |
| ०२. | निमंत्रण पत्रिका हॅन्डबील छपाई इ. खर्च तसेच प्लेक्स बोर्ड व इतर किरकोळ खर्च | ६५०००.०० | ६०५१४.०० | ४४८६.०० | ०.०० |
| ०३. | प्रवचनकार /कीर्तनकार इ. चे मानधन व प्रवासभाडे खर्च मिरवणुक, बँड, इत्यादी खर्च | २०००००.०० | २२३०७५.०० | ०.०० | २३०७५.०० |
| ०४. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ. तसेच कंत्राटी कामागार वेतन खर्च | २६५०००.०० | २६०६२४.०० | ४३७६.०० | ०.०० |
| | **एकूण खर्च** | **७३००००.००** | **९६४७१३.००** | **८८६२.००** | **२४३५७५.००** |

अ.नं.०१ - मंडप व्यवस्था, कमानी , स्टेज, सजावट व अनुशंगीक खर्च करीता रु. २,००,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली होती मात्र या कामी प्रत्यक्षात रु.४.२०,५००/- मात्र इतका खर्च झालेला आहे म्हणेजच या कामी रु. २,२०,५००/- इतका खर्च जादा झालेला आहे.

अ.नं.०३ - प्रवचनकार /कीर्तनकार इ. चे मानधन व प्रवासभाडे खर्च मिरवणुक, बँड, इत्यादी करीता रु. २,००,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली होती मात्र या कामी प्रत्यक्षात रु.२,२३,०७५ /-मात्र इतका खर्च झालेला आहे म्हणेजच या कामी रु. २३,०७५ /- इतका खर्च जादा झालेला आहे. इतर बाबीवर तरतूदीपेक्षा कमी खर्च झालेला आहे.

श्री साई सत् च्चरित पारायण सोहळ्यासाठी एकूण अंदाजीत खर्च रु. ७,३०,०००.०० इतका धरण्यात आला होता मात्र प्रत्यक्षात एकूण रु. ९,६४,७१३/- खर्च आलेला आहे. म्हणजेच एकूण तरतुदीपेक्षा रु.२,३४,७१३.०० इतका जास्त खर्च झालेला आहे.

तरी उपरोक्त कामी झालेल्या एकूण खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी झालेल्या खर्चाचे योग्य स्पष्टीकरणासह सविस्तर तपशिल पूढील व्यवस्थापन समितीपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.८२ श्री गुरुपौर्णिमा उत्सव,२०११ अंदाजपत्रक व झालेल्या प्रत्यक्ष खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२/०५/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५१४ अन्वये श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०११ साठी एकूण खर्च रु. ३६,००,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा काही बाबीवर कमी खर्च तर काही बाबीवर अंदाजत्रकापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | मान्य केलेली अंदाजपत्रकीय रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | तरतुदी पेक्षा कमी झालेला खर्च | तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ८०००००.०० | १६९९८३४.०० | ०० | ८९९८३४.०० |
| ०२) | कलाकार बिदागी -(कीर्तनकार व निमंत्रीत कलाकार , कलाकार हजेरी कार्यक्रमासह) | २०००००.०० | १२१९१८.०० | ७८०८२.०० | -- |
| ०३) | भक्तांना मिष्टान्न अन्नदान कक्ष, व श्रमपरिहार -मजूरीसह | ५०००००.०० | ४५६८३१.०० | ४३१६९.०० | -- |
| ०४) | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | १२५०००.०० | १०७५०८.०० | १७४९२.०० | -- |
| ०५) | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह १ लाख ५५ हजार तहहयात, आश्रयदाते विदेशी भक्तांसह | १६०००००.०० | १५०१५९९.०० | ९८१०४.०० | -- |
| ०६) | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | २०००००.०० | १५१४४९.०० | ४८५५१.०० | -- |
| ०७) | इतर खर्च- मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादालय फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले | १०००००.०० | ८५५००.०० | १४५००.०० | -- |
| ०८) | पालख्याचे ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च- टँकर व डिझेल सह. | ४५०००.०० | १४०९५.०० | ३०९०५.०० | -- |
| ०९) | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च. | १००००.०० | -- | १००००.०० | -- |
| १० | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | १००००.०० | -- | १००००.०० | -- |
| ११ | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | १००००.०० | -- | १००००.०० | -- |
| | **एकूण** | ३६०००००.०० | ४१३८७३४.०० | ३६०८०३.०० | ८९९८३४.०० |

प्रत्येक तरतूदीवरील खर्च विचारात घेता , अ.नं. ०१ मंडप, कमानी, स्टेज, भाडे इत्यादी करीता रु. ८,००,०००/- तरतूद करण्यात आली होती मात्र प्रत्यक्षात मंडपांची संख्या आकार व दर वाढल्याने रु. १६,९९,८३४/- इतका म्हणजे तरतूदीपेक्षा रु. ८,९९,८३४/- इतका जास्त झालेला आहे. या खर्चास बांधकाम विभागाने व्यवस्थापन समितीची दिनांक १२/०६/२०११ चे सभेत निर्णय क्रं. ३९४ अन्वये मान्यता घेतलेली आहे.

अ.नं. २ ते ११ चे बाबतीत तरतुदी पेक्षा कमी खर्च आलेला आहे.

गुरुपौर्णिमा उत्सव-२०११ करीता रु. ३६,००,०००/- अंदाजपत्रक मंजूर करण्यात आलेले होते प्रत्यक्षात सर्व बाबीमिळून एकूण तरतूदी पेक्षा कमी म्हणजे एकूण रु. ८,९९,८३४/-इतका खर्च जादा झालेला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ करीता झालेल्या एकूण रु ४१,३८,७३४/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी झालेल्या खर्चाचे योग्य स्पष्टीकरणासह सविस्तर तपशिल पूढील व्यवस्थापन समितीपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** माहे **मार्च, २०१२** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १४/०३/२०१२ | ९,९४,४९,८१५/- |
| ०२ | युनियन बँक ऑफ इंडीया | १६/०३/२०१२ | ११,९२,५४,९३०/- |
| ०३ | युनियन बँक ऑफ इंडीया | १६/०३/२०१२ | १४,१६,१५,२२८/- |
| ०५ | युनियन बँक ऑफ इंडीया | १९/०३/२०१२ | ३,५४,०३,८०७/- |
| ०६ | युनियन बँक ऑफ इंडीया | १९/०३/२०१२ | ८०,७४,५५२/- |
| ०७ | युको बँक, शिर्डी | २८/०३/२०१२ | २,२१,५८,२१५/- |
| ०८ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | २९/०३/२०१२ | ५७,९०,९९६/- |
| ०९ | ाता माहे मार्च २०१२ अखेर<br>गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | एकूण रक्कम - | ५३,१७,४७,५४३/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ५३.१७ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ५३.१७ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२५३ यावर सविस्तर चर्चा होऊन,दैनंदिन व इतर आवश्यक खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु. ५३.१७ कोटी वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १२ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ गहु खरेदीकरिता ५० किलो क्षमतेचे रिकामे पोते खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४.०१.२०१२ चे सभेतील निर्णयानुसार सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असणारा गहू, हरबरा, मोहरी, मेथी, सफेद तिळ व भाजीपाला इत्यादीची मा.विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव/राहाता इ. ठिकाणाहुन लिलावाने खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम अंदाजे रु.३,८३,४७,५००/- (अक्षरी रुपये तीन कोटी त्र्याऐंशी लाख सत्तेचाळीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली आहे. पैकी गहु, हरबरा, मोहरी, मेथी इ. ची खरेदी ही मार्च महिन्याचे शेवटच्या आठवडयापासून पासून सुरु करण्यात येऊन एप्रिल किंवा मे महिन्याअखेर मालाच्या उपलब्धतेनुसार चालू राहील. त्यासाठी नियमानुसार हमाली, वाराई व साठवणूक भाडे देण्यात येते. सन २०११-१२ पासून कोपरगांव कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी गहु व हरबरा खरेदीकरिता १०० किलो ऐवजी, ५० किलो वजनाचे पोते असावे असे कळविले होते. त्यानुसार मागील वर्षी ५० किलोच्या पोत्यामध्ये गहु व हरबरा खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच चालु वर्षी राहाता कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी देखील १०० किलो ऐवजी, ५० किलो वजन क्षमतेचे पोते असावे असे कळविलेले आहे.

हमाल पंचायतीचे नियमानुसार सन २०१२-१३ करिता एकुण १३,००० क्विंटल गहु व ११०० क्विंटल हरबरा खरेदी करणेकामी २८,२०० नग बारदाना (पोते) तसेच काही बारदाणा (पोते) खराब निघाल्यास अथवा कमी पडल्यास राखीव म्हणून अंदाजे २,००० नग असे पुर्णांकित एकुण ३०,००० नग ५० किलो क्षमतेचे नवीन रिकामा बारदाणा (पोते) खरेदी करावा लागेल.

त्यानुसार कोपरगांव/अहमदनगर येथील बारदाणा विक्रेत्यांकडे ५० किलो क्षमतेच्या नवीन रिकामा बारदाण्याचे दराबाबत विचारणा केली असता, सदर रिकाम्या पोत्याचा सरासरी दर रु.२४/- ते २५/- प्रती नग असा आहे.

उपरोक्तप्रमाणे ५० किलो क्षमतेचे ३०,००० नग नवीन रिकामा बारदाणा खरेदी करणेकामी रु.२५/- प्रती नग प्रमाणे साधारणतः अंदाजे रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च सालाबादाप्रमाणे सन २०१२-१३ प्रसादालय किराणा माल खर्च बजेट मध्ये वर्ग करण्यात येईल.

तरी ५० किलो क्षमतेचे ३०,००० नग नवीन रिकामा बारदाणा (पोते) खरेदीस व याकामी पुरवठाधारकांकडून सिलबंद दरपत्रके मागविणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२५४ यावर सविस्तर चर्चा होऊन,५० किलो क्षमतेचे ३०,००० नग नवीन रिकामा बारदाणा (पोते) पुरवठाधारकांकडून सिलबंद दरपत्रके मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ७,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ विश्वस्तांच्या सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.२५५** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०२) श्री साईचरित्राचे पारायण करण्यासाठी श्री साईचरित्र ग्रंथ खरेदीची मागणी आल्यास सदर ग्रंथ किंमतीचे ५० टक्के सवलतीचे दरात देण्यात यावेत. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

०३) आय.टी.आय मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या फी मध्ये दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

०४) शैक्षणिक संस्थावर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न या बाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे सभेपूढे दरवर्षी सादर करण्यात यावी. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

०५) संस्थानतर्फे बेंगलोर व चेन्नई येथे सुरु करण्यात आलेल्या माहिती केंद्राचे उद्घाटन समारंभ अनुक्रमे ०८ मार्च,२०१२ व ०६ मे २०१२ रोजी करण्यात यावे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०६) अन्नपाकीटे तयार करण्यासाठी प्रति नगास सुमारे रु.७.५० पर्यंत उत्पादन खर्च येतो. सदर अन्नपाकीटे व्यवस्था ही साईभक्तांचे सोई / सुविधेचा भाग असल्याने नफा/तोट्याचा विचार करता सध्याचे दरात फक्त रु.१/- ची वाढ करुन अन्नपाकीटांचे दर प्रति पाकीटास रुपये ३/- ऐवजी रुपये ४/- करण्यात यावेत. (कार्यवाही-अधिक्षक,कँटीन विभाग/अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

वरील निर्णय क्र १७१ ते २५५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे )
कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)